अंतिम अद्ययावतीकरण: 01 जुलै 2021

**क्रेडिट कार्ड सुविधांचे नियमन करणाऱ्या अटी व शर्ती**

या अटी व शर्ती आयसीआयसीआय बँक लिमिटेडद्वारे क्रेडिट कार्ड सुविधांच्या तरतुदींसाठी लागू आहेत व त्यांचे नियमन करतात.

।. 'ॲफिलिएट' ची व्याख्या व अर्थ आणि त्यामध्ये पुढील समाविष्ट:

- अशी कोणताही कंपनी जी आयसीआयसीआय बँकेची होल्डिंग किंवा सबसिडियरी कंपनी आहे– आयसीआयसीआय बँकेची नियंत्रण असणारी किंवा आयसीआयसीआय बँकेच्या सर्वसामान्य नियंत्रणाखाली असणारी एक व्यक्ती, किंवा
- आयसीआयसीआय बँकेचे थेट किंवा लाभदायी हितसंबंध किंवा नियंत्रण आहे अशा, 26% किंवा त्यापेक्षा अधिक मतदान सिक्युरिटीजमधील, कोणतीही व्यक्ती.

ॲफिलिएटच्या व्याख्येच्या हेतूसाठी, कोणत्याही व्यक्तीच्या संबंधात 'नियंत्रण' याचा वापर करण्यात आल्यास, त्याचा अर्थ कंत्राटाद्वारे किंवा अन्यथा, मतदान वाहक सिक्युरिटीजच्या मालकीद्वारे असो वा नसो, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, अशा व्यक्तीचा व्यवस्थापनाला व पॉलिसीजना निर्देशित करण्याचा अधिकार आणि व्यक्ती म्हणजे कोणतीही व्यक्ती, कंपनी, संस्था, कॉरपोरेशन, भागीदारी, न्यास किंवा इतर कोणतीही एन्टिटी किंवा इतर नैसर्गिक किंवा कायदेशीर व्यक्ती.

'अर्जदार' म्हणजे एक व्यक्ती (अनेक व्यक्ती) ज्यांनी आयसीआयसीआय बँकेमध्ये कार्डासाठी अर्ज केलेला आहे.

'प्राधिकृत डीलर' म्हणजे विदेशी व्यवस्थापन अधिनियम, 1999 मध्ये, वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे, वर्णन करण्यात आल्याप्रमाणे प्राधिकृत डीलर.

'कामकाजाचा दिवस' म्हणजे असा दिवस, ज्या दिवशी आवेदन फॉर्ममध्ये नमूद करण्यात आलेल्या आयसीआयसीआय बँकेचे संबंधित कार्यालय किंवा कार्ड सदस्याला आयसीआयसीआय बँकेद्वारे कळवण्यात आलेले ज्याद्वारे कार्ड प्रदान करण्यात येते किंवा असे इतर कार्यालय हे कामकाज व्यवहारासाठी खुले असते.

'कार्ड' किंवा 'क्रेडिट कार्ड' किंवा 'ईएमआय कार्ड' किंवा 'ऑनलाइन क्रेडिट कार्ड' किंवा 'बिझनेस कार्ड' किंवा 'व्हिसा एमचेक क्रेडिट कार्ड' म्हणजे अर्जदाराच्या विनंतीनुसार आयसीआयसीआय बँकेने जारी केलेले आयसीआयसीआय बँक व्हिसा/ॲमेक्स/मास्टरकार्ड क्रेडिट कार्ड किंवा इतर कोणतेही क्रेडिट कार्ड.

'एपीआयन' म्हणजे कार्डाच्या संबंधात, आयसीआयसीआय बँकेद्वारे कार्ड सदस्याला नेमून देण्यात आलेला किंवा वेळोवेळी कार्ड सदस्याद्वारे/आयसीआयसीआय बँकेद्वारे निवडण्यात आलेला व्यक्तिगत ओळख क्रमांक. (व्हिसा एमचेक कार्डावर लागू नाही)

'कार्ड खाते' म्हणजे येथे समाविष्ट अटी व शर्तींप्रमाणे क्रेडिट कार्डाच्या वापराच्या हेतूसाठी कार्ड सदस्याच्या नावे उघडण्यात आलेले आणि आयसीआयसीआय बँकेद्वारे बाळगण्यात आलेले खाते.

'कॅश-लिमिट' (रोख-मर्यादा) म्हणजे आयसीआयसीआय बँकेद्वारे निश्चित करण्यात आल्याप्रमाणे किंवा विहित करण्यात आल्याप्रमाणे कमाल रोख रक्कम किंवा रोख सममूल्य रक्कम, जी कार्ड सदस्य त्याच्या कार्ड खात्यावर वापरू शकतो. रोख-मर्यादा ही कार्ड सदस्याच्या क्रेडिट मर्यादेचा/खरेदी मर्यादेचा सबसेट स्थापन करते. (व्हिसा एमचेक कार्डावर लागू नाही)

'प्रभार' किंवा 'प्रभार' म्हणजे याच्या खंड VI मध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे किंवा या अटी व शर्तींमध्ये अन्यत्र कुठेही उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे असणारे सदर प्रभार. कार्ड सदस्याला नेमकेपणाने कळवण्यात आले नसेल तर, येथे उल्लेख करण्यात आलेल्या प्रभारांचा सर्व तपशील हा टॅरिफ परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे असेल, वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे.

'कंपनी' म्हणजे कंपनी अधिनियम, 1956 मध्ये निश्चित करण्यात आलेली एक कंपनी, वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे.

'पत-मर्यादा (क्रेडिट-लिमिट)/खरेदी मर्यादा' म्हणजे कार्ड सदस्याला त्याच्या क्रेडिट कार्डावर खर्च करण्यासाठी अनुमती असलेली रकमेची मर्यादा.

'आयसीआयसीआय लिमिट' म्हणजे आयसीआयसीआय बँक लिमिटेड, क्रेडिट कार्डाचे मालक, त्यांचे उत्तराधिकारी आणि अनुमतीप्राप्त अभिहस्तांकित.

'आयसीआयसीआय बँक कस्टमर केअर सेंटर' म्हणजे आयसीआयसीआय बँकेद्वारे कार्ड सदस्यांना देण्यात येणारी आयसीआयसीआय बँक-फोन बँकिंग सेवा.

'इन्फिनिटी' म्हणजे www.icicibank.com या यूआरएलवर आयसीआयसीआय बँकेच्या मालकीची, त्यांच्याद्वारे स्थापित व देखभाल करण्यात येणारी आयसीआयसीआय बँकेची इंटरनेट बँकिंग सेवा/वेबसाइट याचे व्यापारी नाव होय.(व्हिसा एमचेक कार्डावर लागू नाही)

'विमा कंपनी' म्हणजे आयसीआयसीआय लॉम्बर्ड जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड किंवा आयसीआयसीआय बँकेद्वारे, वेळोवेळी ठरवण्यात आल्याप्रमाणे, इतर कोणतीही विमा कंपनी.

'सदस्य' किंवा 'कार्डधारक' किंवा 'कार्ड सदस्य' म्हणजे असा अर्जदार ज्याला त्याचे नाव असलेले कार्ड जारी करण्यात आलेले आहे व सदर कार्ड तो बाळगतो.

'व्यापारी आस्थापना' म्हणजे कार्डाचा आदर करणाऱ्या कोठेही स्थित असलेली आस्थापना आणि यामध्ये इतरांसोबत, स्टोअर्स, दुकाने, रेस्टॉरन्ट्स, हॉटेल्, एअरलाइन्स, एटीएम्ससह कॅश ॲडव्हान्स पॉइंट्स आणि मेल ऑर्डर ॲडव्हायटझर्स (रिटेलर्स, वितरक किंवा मॅन्युफॅक्चरर्स) यांचा समावेश असेल.

'मर्चन्ट्स' (व्यापारी) म्हणजे जो मर्चन्ट आस्थापनेचा मालक आहे किंवा तिचे व्यवस्थापन करतो किंवा चालवतो, त्याचे उत्तराधिकारी व अनुमतीप्राप्त अभिहस्तांकित.

‘किमान देय रक्कम’ किंवा ‘एमएडी’ म्हणजे विवरणामध्ये अशा प्रकारे नमूद करण्यात आलेली रक्कम.

‘एकूण देय रक्कम’ किंवा ‘टीएडी’ म्हणजे विवरणामध्ये अशा प्रकारे नमूद करण्यात आलेली रक्कम.

‘पेमेन्ट देय दिनांक’ म्हणजे दर महिन्याची अशी तारीख, ज्या दिवशी विवरणाद्वारे कळवण्यात आल्याप्रमाणे, कार्ड सदस्याद्वारे कार्डाच्या वापराद्वारे उद्भवलेल्या प्रभारांच्या संबंधात पेमेन्ट देय असेल.

‘प्रायमरी कार्ड सदस्य’ म्हणजे अशी व्यक्ती ज्याच्या नावे कार्ड खाते उघडण्यात आलेले आहे आणि ज्याला कार्ड जारी करण्यात आलेले आहे.

‘आरबीआय’ म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँक.

‘विवरण’ म्हणजे कार्ड खात्याच्या संबंधात आयसीआयसीआय बँकेप्रती प्रायमरी कार्ड सदस्याची व कोणत्याही सप्लिमेन्टरी कार्ड सदस्याची, त्या तारखेला वित्तीय दायित्वे स्थापित करणारे, कार्ड सदस्याला आयसीआयसीआय बँकेद्वारे पाठवण्यात आलेले मासिक विवरण/विवरणे.

‘सप्लिमेन्टरी कार्ड सदस्य’ म्हणजे प्रायमरी कार्ड सदस्याचा कौटुंबिक सदस्य जो प्रायमरी कार्ड सदस्यासोबतच्या त्याच्या नात्यामुळे कार्ड सदस्य बनतो. (एमचेकवर सप्लिमेन्टरी कार्ड लागू नाही)

‘टॅरिफ परिशिष्ट’ म्हणजे कार्डावर देऊ करण्यात येणाऱ्या सेवांसाठी लागू असणाऱ्या प्रभारांचा तपशील देणारे परिशिष्ट होय. हे प्रभार आयसीआयसीआय बँकेच्या स्वेच्छानिर्णयानुसार बदलांच्या अधीन आहेत. तथापि, प्रभारांमधील सदर बदल हे कार्ड सदस्याला 30 दिवसांची पूर्व सूचना देऊन केवळ भविष्यलक्षी परिणामासह करण्यात येऊ शकतील.

‘व्यवहार सूचना’ म्हणजे व्यवहार प्रभावी करण्यासाठी, आयसीआयसीआय बँकेद्वारे आणि/किंवा आयसीआयसीआय बँक कस्टमर केअर सेंटरद्वारे आणि/किंवा इन्फिनिटीद्वारे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कार्ड सदस्याला देण्यात येणारी कोणतीही सूचना होय. व्यवहार सूचनेमध्ये चार्ज स्लिप, कॅश ॲडव्हान्स स्लिप किंवा मेल ऑर्डर कुपन यांचा समावेश असू शकेल.

या ‘अटी व शर्ती’ म्हणजे येथे नमूद करण्यात आलेल्या आणि/किंवा आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी निर्धारित करण्यात आलेल्या, सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे, अटी व शर्ती. विरुद्ध हेतू दिसून येत नाही तोपर्यंत, या अटी व शर्तींमध्ये: –

(ए) ‘सुधारणा’ (अमेन्डमेन्ट) या शब्दाच्या संदर्भामध्ये पुरवणी, सुधारणा, नवीनीकरण, पुनःस्थापन किंवा पुनरधिनियमिती यांचा समावेश आहे आणि ‘सुधारणा करण्यात आल्या’ (अमेन्डेड) याचा अर्थ त्यानुसार घेण्यात येईल; ‘परवानगी’ किंवा ‘मंजुरी’ यामध्ये परवानगी, संमती, समाशोधन, मान्यता, परवानगी, निवारण, अनुज्ञप्ती, सूट, फायलिंग व नोंदणी यांचा समावेश आहे; कायदा यामध्ये कोणतीही संविधान, संविधी, कायदा, नियम, नियमन, अध्यादेश, न्यायनिर्णय, आदेश, डिक्री, परवानगी, किंवा कोणतेही प्रकाशित, निर्देश, मार्गदर्शक तत्त्वे,

आवश्यकता किंवा कायद्याच्या बळाद्वारे असणारे शासकीय निर्बंध समाविष्ट आहेत, किंवा कोणत्याही न्यायिक प्राधिकरणाद्वारे, कोणत्याही पूर्वगामीचे कोणतेही निर्धारण, किंवा अर्थाविष्कार, आवेदन फॉर्मच्या स्वाक्षरीच्या/सादरीकरणाच्या तारखेला किंवा त्यानंतर प्रभावी असो वा नसो आणि प्रत्येक बाब वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे.

(बी) एकवचनीमध्ये बहुवचनी समाविष्ट (आणि त्या उलटसुद्धा);

(सी) या अटी व शर्तींमधील शीर्षके ही केवळ संदर्भासाठी देण्यात आलेली आहेत आणि अटी व शर्ती स्पष्ट करताना व त्यांचा अर्थ लावताना त्यांच्याकडे दुर्लक्ष करायचे आहे.

(डी) ‘समाविष्ट’ किंवा ‘सामील’ या शब्दांचा अर्थ कोणत्याही मर्यादेशिवाय अशा प्रकारे विचारात घेण्यात येईल.

(ई) लिंगाच्या संदर्भामध्ये स्त्री, पुरुष व नपुंसकलिंगी यांसाठीचे संदर्भ समाविष्ट आहेत.

(एफ) कोणत्याही प्रकरणासाठी आयसीआयसीआय बँकेकडून आवश्यक सर्व मंजुऱ्या, परवानग्या, संमती किंवा स्वीकृती यांकरिता आयसीआयसीआय बँकेची पूर्व, लिखित मंजुरी, परवानगी, संमती किंवा स्वीकृती आवश्यक आहे.

(जी) व्हिसा/मास्टर कार्ड नियमने यांचा संदर्भ हा व्हिसा/मास्टर कार्ड यांच्याद्वारे त्यांच्या नेटवर्कमधील सर्व सदस्य बँकांना जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक निर्देशांच्या संबंधात आहे.

(एच) कोणतीही घटना, प्रसंग, परिस्थिती, बदल, तथ्य, माहिती, दस्तऐवज, परवानगी, कामकाज, कृती, माहिती, वगळणूक, दावे, उल्लंघन, डिफॉल्ट किंवा अन्यथा यांसह कोणत्याही प्रकरणाच्या भौतिकत्वाच्या संबंधात आयसीआयसीआय बँक व कार्ड सदस्य यांच्यामध्ये कोणतीही मतविभिन्नता किंवा विवाद होण्याच्या बाबतीत, कोणत्याही पूर्वगामीच्या भौतिकत्वाबाबत आयसीआयसीआय बँकेचे मत हे अंतिम राहील व कार्ड सदस्यावर बंधनकारक राहील.

(i) कार्डावर किंवा अन्यत्र आयसीआयसीआय बँक क्रेडिट कार्ड करार या शब्दांचा वापर, म्हणजे या अटी व शर्ती.

II. कार्ड सेवा

हे कार्ड आयसीआयसीआय बँकेची मालमत्ता आहे. आयसीआयसीआय बँक ही (1) क्रेडिट ब्युरो रिपोर्ट किंवा आवश्यक वाटेल असे इतर अहवाल प्राप्त करून अर्जदाराची क्रेडिट (पत) योग्यता निश्चित करण्याचा

(2) कोणत्याही अर्जदाराला स्वतःच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार कार्ड जारी करण्यास नकार देण्याचा, हक्क राखून ठेवत आहेत. कार्ड हस्तांतरणीय नाही आणि त्याचा वापर हा येथे उल्लेख करण्यात आलेल्या अटींच्या व वेळोवेळी आयसीआयसीआय बँकेद्वारे निर्धारित करण्यात आलेल्या कोणत्याही अतिरिक्त शर्तींच्या सापेक्ष आहे. कार्ड सदस्य हा त्याला कार्ड प्राप्त झाल्यावर लगेचच कार्डाच्या मागच्या बाजूला स्वाक्षरी करेल. कार्ड सदस्यांना आयसीआयसीआय बँक कस्टमर केअर सेंटर आणि/किंवा इन्फिनिटी उपलब्ध आहे. कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँक कस्टमर केअर

सेंटरद्वारे आणि/किंवा इन्फिनिटीद्वारे कोणत्याही सेवा/सुविधा प्राप्त करणे हे, यामध्ये क्रेडिट मर्यादेमध्ये वृद्धी करणे, व्यवहार, एकूण देय रक्कम, विवरण तपशील, पेमेन्ट नियत तारीख, इत्यादी समाविष्ट परंतु तिथपर्यंतच मर्यादित नाही, सेवांच्या/सुविधांच्या व सदर सेवा/सुविधा प्राप्त करण्याच्या प्रकाराच्या संबंधात, वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे, आयसीआयसीआय बँकेद्वारे निर्धारीत करण्यात आलेल्या अटी व शर्तींद्वारे सदैव बद्ध असेल.

III. कार्डाचा वापर

(ए) आंतरराष्ट्रीयदृष्ट्या वैध कार्ड असण्याच्या बाबतीत, येथे खाली खंड III (एच) मध्ये प्रदान करण्यात आल्याप्रमाणे वगळता कार्ड जगभर वैध आहे. इतर कार्डांच्या बाबतीत, त्यांचा वापर हा भारतामध्ये व्हिसा/व्हिसा इलेक्ट्रॉन क्रेडिट कार्ड्स/मास्टर कार्ड/ॲमेक्स स्वीकारणाऱ्या मर्चन्ट आस्थापनांपर्यंतच मर्यादित आहे. तथापि, आयसीआयसीआय बँक किंवा संबंधित व्यापारी आस्थापना हे कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही वेळी, व्यापारी आस्थापनेच्या ठिकाणी क्रेडिट कार्डाच्या वापरास नकार देण्याचा हक्क राखून ठेवत आहेत. क्रेडिट कार्ड हे केवळ वास्तविक व्यक्तिगत किंवा अधिकृत हेतूंसाठी वापरता येऊ शकते आणि कार्ड सदस्याद्वारे त्याच्या वापराचा अयोग्य फायदा घेण्यास अनुमती नाही. खरेदीसाठी किंवा इतर सुविधा घेण्यासाठी व्यापारी आस्थापनेद्वारे कार्ड सदस्याला कोणताही प्रभार आकारण्यात आल्यास, व्यापारी आस्थापनेसोबत सदरची हिशेबपूर्ती करायची आहे आणि आयसीआयसीआय बँक ही सदरसाठी कोणत्याही प्रकारे उत्तरदायी असणार नाही. व्यापारी आस्थापनेच्या ठिकाणी कार्डाचा वापर केल्यावर, कार्ड सदस्याने चार्ज–,स्लिपवर स्वाक्षरी करण्याच्या वेळी चार्ज–स्लिप्सची प्रत गोळा करणे आवश्यक आहे. कार्ड सदस्य हा चार्ज–स्लिपवर स्वाक्षरी करण्यासाठी जबाबदार असेल; कार्ड सदस्याने चार्ज–स्लिपवर स्वाक्षरी न करण्याच्या बाबतीत, कार्ड सदस्य हा व्यवहारासाठी/व्यवहारांसाठी आणि त्यासंबंधातील सर्व प्रभारांसाठी जबाबदार राहील. आयसीआयसीआय बँक ही कार्ड सदस्याला चार्ज स्लिप्सच्या प्रती प्रदान करणार नाही, परंतु संबंधित व्यवहाराच्या पंचेचाळीस दिवसांच्या आत कार्ड सदस्याने अशी विनंती केल्यास, आयसीआयसीआय बँक ही संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार, टॅरिफ परिशिष्टामध्ये उल्लेख करण्यात आलेल्या प्रभाराला चार्ज स्लिप्सच्या प्रती प्रदान करेल. आयसीआयसीआय बँक ही मेल ऑर्डर किंवा टेलिफोन ऑर्डर खरेदीसाठी कार्ड सदस्याला सुविधा प्रदान करण्याचे मान्य करू शकते.

ऑनलाइन क्रेडिट कार्डाचा वापर हा केवळ ऑनलाइन व्यवहार/मेल ऑर्डर्स यांपर्यत मर्यादित आहे. ऑनलाइन क्रेडिट कार्ड हे केवळ सप्लिमेन्टरी कार्ड/ॲड–ऑन कार्ड म्हणून किंवा वेळोवेळी, आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार, त्यांच्याद्वारे सूचित करण्यात आल्याप्रमाणे जारी करण्यात येईल आणि ते प्रायमरी कार्ड म्हणून जारी करण्यात येणार नाही. व्हिसा एमचेक कार्डाचा वापर हा मोबाइलद्वारे करण्यात आलेल्या पेमेन्टपर्यंत आणि/किंवा खरेदीपर्यंत मर्यादित असेल. व्हिसा एमचेककार्ड हे केवळ सप्लिमेन्टरी कार्डऑन कार्ड म्हणून किंवा

वेळोवेळी, आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार, त्यांच्याद्वारे सूचित करण्यात आल्याप्रमाणे जारी करण्यात येईल आणि ते प्रायमरी कार्ड म्हणून जारी करण्यात येणार नाही. कार्ड सदस्याला याची जाणीव आहे की मेल ऑर्डर टेलिफोन ऑर्डर किंवा मोबाइलद्वारे खरेदी यांच्या बाबतीत, खरेदीच्या वेळी कार्ड सदस्याद्वारे चार्ज–स्लिप्सवर स्वाक्षरी करण्यात येणार नाही. त्यानुसार, कार्ड सदस्य हे स्वीकारतो की, कोणत्याही कारणास्तव, अशा खरेदीची किंवा प्रभाराची अधिकृतता किंवा वैधता यांच्या संबंधात कोणत्याही विवादाच्या बाबतीत, कार्ड सदस्य हा सर्व स्थायी देय रकमेचा आयसीआयसीआय बँकेकडे भरणा करेल.

(बी) सर्व विवाद हे कार्ड सदस्य व संबंधित व्यापारी आस्थापना यांच्यामधील प्रकरण असेल आणि संबंधित व्यापारी आस्थापनेसोबत कार्ड सदस्याद्वारे त्याची हिशेबपूर्ती करण्यात येईल. आयसीआयसीआय बँक ही सदरसाठी कोणत्याही प्रकारे उत्तरदायी असणार नाही.

(सी) कार्ड हे पुढील मर्यादांमध्ये वापरता येऊ शकते: (i) कार्ड सदस्याला आयसीआयसीआय बँकेद्वारे सूचित करण्यात आलेल्या क्रेडिट मर्यादेच्या आत; आणि (ii) कार्डाच्या पुढच्या भागी नमूद केलेल्या महिन्याच्या शेवटच्या तारखेनंतर नाही.

(डी) कार्ड सदस्याचा कार्ड वापरण्याचा हक्क तत्काळ निश्चित करण्यात येईल: (i) खालील खंड त नुसार समाप्त होण्याच्या बाबतीत; किंवा (ii) कार्ड गहाळ होण्याच्या/कार्डाचा गैरवापर होण्याच्या किंवा त्याची चोरी होण्याच्या बाबतीत.

(ई) कार्डाच्या वापराद्वारे, कार्ड सदस्य अशी स्थायी विनंती करत असल्याचे मानण्यात येते की, कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँक कस्मटर केअर सेंटरला/इन्फिनिटीला अन्यथा कळवेपर्यंत, कार्ड कालावधीचे नूतनीकरण करता येईल आणि/किंवा प्रत्येक कार्ड सदस्याला बदली कार्ड जारी करता येईल, आणि असे नूतनीकरण आणि/किंवा रिप्लेसमेन्ट ही आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार असेल.

(एफ) क्रेडिट कार्ड प्रोग्रॅम बंद होण्याच्या बाबतीत किंवा क्रेडिट कार्डाचे नूतनीकरण करण्याच्या वेळी, आयसीआयसीआय बँक लिमिटेड आपल्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार कार्ड सदस्याने बाळगलेल्या विद्यमान कार्ड प्रकारापेक्षा वेगळा असा कार्डाचा प्रकार प्रदान करण्याचा हक्क राखून ठेवत आहे. कोणत्याही वेळी कोणत्याही क्रेडिट कार्डावरील क्रेडिट मर्यादा किंवा रोख मर्यादा ही आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयाप्रमाणे आहे.

(जी) कार्ड सदस्याने कार्ड व आयसीआयसीआय बँक यांच्यासोबत सर्व व्यवहारांच्या संबंधात सदैव सद्भावनेने वर्तन करायला हवे.

(एच) कार्ड सदस्याला जारी करण्यात आलेले आंतरराष्ट्रीयदृष्ट्या वैध कार्ड हे नेपाळ व भूतान येथील मर्चन्ट आस्थापनाच्या ठिकाणी विदेशी चलनामधील पेमेन्टसाठी वगळता जगभर वैध आहे. कार्डांच्या संबंधात, ज्याचा वापर केवळ भारत/नेपाळ/भूतान येथे मर्यादित आहे, भारत/नेपाळ/भूतान यांच्याबाहेर वापर करणे हे विदेशी चलन व्यवस्थापन

अधिनियम (एफईएमए) याचे किंवा इतर कोणत्याही संबंधित कायद्याचे उल्लंघन आहे. कार्ड सदस्य हा या शर्तींचे उल्लंघन करून कार्डाचा चुकीचा वापर करण्यासंबंधी संपूर्ण जबाबदारी स्वीकारतो आणि कार्ड सदस्याने शर्तींमधील तरतुदींचे उल्लंघन केल्याच्या परिणामी आयसीआयसीआय बँकेला उद्भवलेली आणि/किंवा सोसावी लागलेली कोणतीही हानी, नुकसान, व्याज, रुपांतरण, इतर कोणताही वित्तीय प्रभार यांची भरपाई करण्याची हमी देतो व तसे मान्य करतो.

(आय) आंतरराष्ट्रीयदृष्ट्या वैध कार्ड हे ज्याच्यासाठी भारतामधील प्राधिकृत डीलरकडून चलन खरेदी करता येऊ शकते अशा कोणत्याही हेतूसाठी इंटरनेटवर वापरता येऊ शकते.

(जे) आंतरराष्ट्रीयदृष्ट्या वैध कार्ड व इतर सर्व कार्डे यांचा लॉटरी तिकीटे, प्रतिबंधित किंवा बंदी असलेली नियतकालिके, स्वीपस्टेक्समधील सहभाग, कॉलबॅक सेवांसाठी पेमेन्ट, विदेशी फॉरेक्स ट्रेडिंगप्रती कोणत्याही स्वरुपातील वित्तप्रेषणे, विदेशी एक्स्चेंजेस/विदेशी काउंटरपार्टी यांच्याप्रती मार्जिन कॉल्स, देशी/विदेशी मार्केट्स इत्यादींमधील विदेशी चलनामधील ट्रेडिंग यांच्या खरेदीसाठी इंटरनेटवर किंवा अन्यथा वापर करता येऊ शकत नाही.

(के) प्राधिकृत डीलर्स हे इम्पोर्टर (आयातदार) क्लायंट हा भारतामध्ये भेटीसाठी आलेला असो वा नसो, भारतातून होणाऱ्या निर्यातीसाठी क्रेडिट कार्डाप्रती डेबिटद्वारे पेमेन्ट स्वीकारू शकतात. म्हणून, जेथे कार्ड जारीकर्त्या बँकेकडून/संस्थेकडून विदेशी चलनामध्ये प्रतिपूर्ती प्राप्त होईल तेथे, प्राधिकृत डीलर्स हे इम्पोर्टरच्या (आयातदाराच्या) क्रेडिट कार्डाप्रती डेबिट करून भारतातून करण्यात आलेल्या निर्यातीसाठी पेमेन्ट प्राप्त करू शकतात.

(एल) आयसीआयसीआय बँक हे कोणतेही कारण न देता कार्डावरील परवानगी विनंत्या नाकारण्याचा किंवा त्यांचा आदर करण्याचा संपूर्ण स्वेच्छानिर्णय व स्वातंत्र्य राखून ठेवत आहे. काही बाबतीत, संपूर्ण स्वेच्छानिर्णयाच्या सापेक्ष, आयसीआयसीआय बँकेला व्यवहाराला मंजुरी मिळण्यापूर्वी आणि कार्ड खात्यावर त्याची आकारणी करण्यात येण्यापूर्वी, कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँक कस्टमर केअर सेंटरशी संपर्क साधावा अशी आयसीआयसीआय बँकेची आवश्यकता असू शकते.

(i) कार्ड सदस्य मान्य करतो की तो कोणत्याही बेकायदेशीर/विधिबाह्य खरेदीसाठी/हेतूंसाठी कार्डाचा वापर करणार नाही.

(ii) क्रेडिट कार्ड हे केवळ व्यक्तिगत खर्चासाठी व हेतूंसाठी जारी करण्यात येते. कार्डधारकाने पुनर्विक्रीसाठी, व्यापारी किंवा व्यावसायिक हेतूंसाठी क्रेडिट कार्डाचा वापर न करणे आवश्यक आहे. क्रेडिट कार्ड हे केवळ कायदेशीर, वास्तविक व्यक्तिगत हेतूंसाठी वापरायला हवे आणि त्याचा कोणत्याही मनी लॉन्डरिंगसाठी,

समाजविरोधी किंवा सट्टेबाजीच्या कार्यांसाठी वापर न करणे आवश्यक आहे किंवा व्यवसायामध्ये व्यापारीदृष्ट्या त्याचा समुपयोग न करणे आवश्यक आहे (उदा. खेळत्या भांडवलाच्या हेतूंसाठी).

(एम) प्रतिबंधित, निर्बंधित, व्यापारी हेतूंसाठी किंवा वर उल्लेख करण्यात आलेल्या कोणत्याही हेतूंसाठी क्रेडिट कार्डाचा वापर होत असल्याचे आढळल्यास, आयसीआयसीआय बँक, आपल्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार, कार्डधारकाला कोणतीही सूचना न देता, संबंधित क्रेडिट कार्ड व अतिरिक्त/अ‍ॅड–ऑन कार्ड्स बंद करण्याचा आपला हक्क वापरू शक. क्रेडिट कार्डाचे व्यवहार, वापराचे स्वरुप इत्यादींविषयी तपशील, माहिती, पुरावे इत्यादी प्राप्त करण्यासाठी दूरध्वनीद्वारे किंवा औपचारिक संपर्कव्यवहाराच्या इतर पद्धतींद्वारे चौकशी करण्याचा आयसीआयसीआय बँकेला हक्क आहे आणि आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी विचारणा करण्यात येणारी माहिती प्रदान करण्यासाटी कार्डधारक हा कराराने बद्ध आहे. कार्डधारकाने असमाधानकारक प्रतिसाद देण्याच्या किंवा कोणताही प्रतिसाद न देण्याच्या बाबतीत, त्याची परिणती आयसीआयसीआय बँकेद्वारे क्रेडिट कार्ड रोखण्यामध्ये/बंद करण्यामध्ये होऊ शकते. (।) क्रेडिट कार्डासोबत याआधी खरेदी करण्यात आलेल्या कोणत्याही वस्तूंसाठी किंवा सेवांसाठी परताव्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी कार्डधारकाने कार्ड खात्यामध्ये क्रेडिट प्राप्त न करणे किंवा सादर न करणे आवश्यक आहे. क्रेडिट कार्डावरील व्यवहारांना कार्ड खात्यावरील एकूण क्रेडिट मर्यादेच्या न वापरलेल्या रकमेपर्यंतच अनुमती असेल.

IV. विद्यमान बचत खात्यासह कार्डाची जोडणी, जर असल्यास.

अर्जदार हे अभिस्वीकृत करतो व मान्य करतो की आयसीआयसीआय बँकेच्या स्वेच्छानिर्णयानुसार, त्याचे/तिचे कार्ड हे त्याच्या/तिच्या विद्यमान आयसीआयसीआय बँक बचत खात्यासोबत, जर असल्यास, जोडण्यात येईल. अर्जदार पुढे अभिस्वीकृत करतो व समजतो की यामुळे इंटरनेट बँकिंग सेवा व आयमोबाइल सुविधा यांमार्फत, आयसीआयसीआय बँक बचत खात्याच्या अंतर्गत, जर असल्यास, त्याला/तिला दिलेल्या विद्यमान युजर आयडीचा वापर करून त्याला/तिला त्याचे कार्ड खाते हाताळता येऊ शकेल. पुर्वोक्त हेतूसाठी अर्जदाराद्वारे प्रदान केलेल्या केवायसी तपशीलांचा वापर करण्यासाठी अर्जदार पुढे संमती प्रदान करतो व आयसीआयसीआय बँकेला परवानगी देतो. अर्जदार हे जाणतो की तो/तो आयसीआयसीआय बँकेच्या कस्टमर केअरशी संपर्क साधून त्याच्या/तिच्या कार्डामधून त्याचे/तिचे आयसीआयसीआय बँक बचत खाते डीलिंक करू शकतो.

V. व्यक्तिगत ओळख क्रमांक

कार्ड सदस्याला कार्डाचा वापर करता येण्यासाठी, त्याला व्यक्तिगत ओळख क्रमांक (एपीआयएन) जारी करण्यात येईल. त्याला एपीआयएन मेल करण्यात येईल आणि सदर एपीआयएन सील्ड लिफाफ्यामध्ये* प्राप्त न झाल्यास कार्ड सदस्य हा आयसीआयसीआय बँकेच्या शाखेशी किंवा आयसीआयसीआय बँकेच्या कस्टमर केअर सेंटरशी संपर्क साधेल. तदनंतर ही

एपीआयएन कार्ड सदस्याला, त्याच्या स्वतःच्या जोखमीवर, एटीएममध्ये किंवा आयसीआयसीआय बँकेच्या शाखेमध्ये किंवा आयसीआयसीआय बँकेच्या कस्टमर केअर सेंटरमध्ये बदलता येऊ शकते. ही एपीआयएन कार्ड सदस्याला ॲक्सेस प्रदान करते आणि कार्ड सदस्य हा एपीआयएनचा वापर, गोपनीयता व संरक्षण यांसाठी, तसेच सदर एपीआयएनचा वापर करून कार्ड खात्यावर दाखल करण्यात आलेल्या सर्व आदेशांसाठी व माहितीसाठी पूर्ण जबाबदारी स्वीकारतो. त्रयस्थ पक्षकाराला एपीआयएन माहीत होईल अशा प्रकारे कार्ड सदस्य हा कोणत्याही स्वरुपात एपीआयएनची नोंद करणार नाही. एपीआयएनद्वारे अधिप्रमाणित करण्यात आलेले व्यवहार व सूचना पार पाडण्यासाठी कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँकेला परवानगी दिलेली आहे आणि सदर परवानगी तो मागे घेणार नाही. कार्ड सदस्याच्या एपीआयएनच्या पडताळणी व्यतिरिक्त कार्ड सदस्याने पाठवलेल्या किंवा त्याने पाठवल्याचे अभिप्रेत असलेल्या व्यवहार सूचनेच्या अधिकृततेची पडताळणी करण्याचे आयसीआयसीआय बँकेवर आबंधन असणार नाही. कार्ड सदस्य हा एपीआयएनची सुरक्षितता राखण्यासाठी, येथे उल्लेख करण्यात आलेल्या पावलांसह, नेहमी योग्य ती सर्व पावले उचलेल. कार्ड सदस्य हा सुरक्षितता आवश्यकतांचे पालन करण्यामध्ये असमर्थ ठरल्यास, त्याचे आयसीआयसीआय बँकेप्रती दायित्व उद्भवू शकेल. आयसीआयसीआय बँक ही तिच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार, विद्यमान कार्डावर नवीन एपीआयएन जारी करू शकते. येथे नमूद करण्यात आलेल्या व आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी नमूद करण्यात आलेल्या तरतुदींच्या सापेक्ष, कार्ड सदस्य हा कार्डाच्या आणि/किंवा एपीआयएनच्या कोणत्याही अयोग्य/ फसवणुकीच्या/अप्राधिकृत/ड्युप्लिकेट/चुकीच्या वापरासाठी आयसीआयसीआय बँकेला जबाबदार धरणार नाही. कार्ड कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराच्या हाती पडणे किंवा कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराला एपीआयएन कळणे यामुळे कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराने कार्डाचा वापर/गैरवापर करण्याशी संबंधित कोणत्याही परिणामांसाठीही आयसीआयसीआय बँक जबाबदार असणार नाही. कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराला सेवा उपलब्ध झाल्यास (ॲक्सेस मिळाल्यास), यामध्ये कार्ड खाते समाविष्ट, त्यासाठी कार्ड सदस्य जबाबदार असेल आणि अशा ॲक्सेसमुळे व वापरामुळे अथवा त्यासंबंधात, किंवा अन्यथा, त्रयस्थ पक्षकारांने गैरवापर/वापर केल्यामुळे उद्भवलेल्या कोणत्याही दायित्वाच्या, खर्चाच्या किंवा हानीच्या विरोधात कार्ड सदस्य हा आयसीआयसीआय बँकेचे हानिरक्षण करेल. व्हिसा एमचेक क्रेडिट कार्डधारकांना पिन जारी करण्यात येत नाही.

क्रेडिट कार्ड सदस्यांना एसएमएसद्वारे किंवा नोंदणीकृत मोबाइल क्रमांकाद्वारे एपीआयएन पाठवण्यात येईल.

मोबाइल क्रमांक नोंदणीकृत नसल्यास, एपीआयएन टपाल पत्त्यावर स्वतंत्रपणे पाठवण्यात येईल. एपीआयएन प्राप्त न होण्याच्या बाबतीत, आयसीआयसीआय बँक कस्टमर केअरशी संपर्क साधून इंटरॲक्टिव्ह व्हॉइस रिस्पॉन्स प्रणालीद्वारे (आयव्हीआर) किंवा इंटरनेट बँकिंगमार्फत/मोबाइलमार्फत कार्ड सदस्य सदर एपीआयएन प्राप्त करू शकेल. कार्ड सदस्याने चुकीचा नोंदणीकृत मोबाइल क्रमांक प्रदान केल्यास, त्यासाठी आयसीआयसीआय बँक जबाबदार असणार नाही.

VI. उल्लंघन/समाप्ती/माघार (विड्रॉअल)

(ए) उल्लंघन: कार्ड सदस्याद्वारे यांपैकी कोणत्याही अटी व शर्तींचे उल्लंघन होण्याच्या बाबतीत; (i) या अटी व शर्तींची इतर कोणतीही तरतूद असतानासुद्धा, कार्ड सदस्य हा अशा उल्लंघनामुळे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उद्भवलेल्या कोणत्याही हानीसाठी उत्तरदायी असणार नाही; आणि (ii) कार्ड सदस्याकडून आयसीआयसीआय बँकेकडे थकित असलेली सर्व रक्कम, मागणी केल्यावर, सदर मागणीच्या तारखेला आयसीआयसीआय बँकेप्रती देय व प्रदेय असो वा नसो, कार्ड सदस्य हा आयसीआयसीआय बँकेला रकमेचा भरणा करण्यासाठी उत्तरदायी असेल. (बी) समाप्ती/माघार: कार्ड सदस्य हा कोणत्याही वेळी, आयसीआयसीआय बँक लिमिटेड, आयसीआयसीआय फोन बँकिंग सेंटर, आयसीआयसीआय बँक टॉवर, 7 वा मजला, सर्वेक्षण क्र: 115/27, प्लॉट क्र.12, नानाक्रामगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद-500032, इंडिया येथे लिखित स्वरुपात कळवून कार्ड खाते समाप्त करण्याची विनंती करू शकतात.

(i) कार्डावरील होलोग्राम व मॅग्नेटिक स्ट्रिप कापण्यात आलेली आहे (ऑनलाइन क्रेडिट कार्ड व व्हिसा एमचेक क्रेडिट कार्ड वगळता) याची खातरजमा करून वरचा उजव्या बाजूचा कोपरा कापून कार्ड विरुपित करण्यात येईपर्यंत आणि ते आयसीआयसीआय बँकेला प्राप्त होईपर्यंत पुर्वोक्त नोटीस प्रभावी होणार नाही. पुर्वोक्तखेरीज, कार्ड खाते किंवा कोणतेही खाते संपुष्टात येऊ शकणार नाही.

(ii) कार्ड सदस्याने कार्ड नष्ट केल्याचा दावा केल्यानंतर कार्डावर प्रभार उद्भवण्याच्या, परंतु आयसीआयसीआय बँकेला कार्ड प्राप्त न होण्याच्या बाबतीत, कार्डावर उद्भवलेल्या प्रभारांसाठी, मग ते कार्डाचा गैरवापर केल्याने उद्भवलेले असो वा नसो आणि आयसीआयसीआय बँकेला कार्ड नष्ट केल्याचे कळवण्यात आलेले असो वा नसो, कार्ड सदस्य हा पूर्णतः जबाबदार असेल.

(iii) आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयाद्वारे आवश्यक परिस्थितीनुसार, आयसीआयसीआय बँक कोणत्याही वेळी, कार्ड खाते व कार्ड समाप्त करू शकते. कार्ड सदस्य हा स्पष्टपणे अभिस्वीकृत करतो व स्वीकारतो की कार्ड सदस्य हा आयसीआयसीआय बँकेसोबत दोन किंवा अधिक कार्ड खाती बाळगत असल्यास, ज्यांचे या अटी व शर्तींच्या अंतर्गत नियमन करण्यात येत आहे आणि एका कार्ड खात्याअंतर्गत आयसीआयसीआय बँकेला देय असणारे पेमेन्ट भरण्यामध्ये डिफॉल्ट झाल्यास, कार्ड सदस्याने डिफॉल्ट झालेले कार्ड खाते पुन्हा नियमित करेपर्यंत, आयसीआयसीआय बँकेच्या इतर सर्व कार्ड खात्याच्या/खात्यांच्या अंतर्गत कार्ड सदस्याला उपलब्ध करण्यात आलेली क्रेडिट मर्यादा आयसीआयसीआय बँकेद्वारे रोखण्यात येईल तसेच सदर सर्व कार्ड खात्याच्या/खात्यांच्या अंतर्गत उपलब्ध करण्यात आलेलले सदर प्रिव्हिलेजेस/लाभ मागे घेण्यात येतील. कार्ड सदस्य हे मान्य करतो व

अभिस्वीकृत करतो की आयसीआयसीआय बँकेने वरीलसाठी कोणतीही अतिरिक्त सूचना प्रदान करणे आवश्यक नाही.

(iv) कार्ड खाते समाप्त झाल्यावर आणि उलट आयसीआयसीआय बँक व कार्ड सदस्य यांच्यामध्ये कोणताही पूर्व करार असतानासुद्धा: (ए) तेव्हा थकित असणारी सर्व प्रभारांची बेरीज ही, विवरणामध्ये प्रतिबिंबित झालेली असो वा नसो, (बी) समाप्तीनंतर उद्भवलेली कोणतीही ऐच्छिक प्रभारांची रक्कम (संबंधित व्यवहार रकमेच्या तारखेपासून प्रभावी), जणू ती प्रतिबिंबित झाली आहे असे मानून कार्ड सदस्याद्वारे ताबोडतोब देय व प्रदेय असेल, आणि असे प्रभार जेव्हापासून उद्भवले त्या तारखेपासून त्यावर व्याज ऊपार्जित होईल, वेळोवेळी लागू असल्याप्रमाणे.

(v) आयसीआयसीआय बँक, तिच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार, कोणतीही सूचना न देता किंवा त्यासंबंधी कोणतेही कारण न देता, कोणत्याही वेळी कार्डावरील प्रिव्हिलेजेस एकतर तात्पुरते किंवा कायमस्वरुपी मागे घेण्याचा आणि कार्ड रद्द करण्याचा हक्क राखून ठेवत आहे. तात्पुरत्या विड्रॉअलच्या बाबतीत, आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार प्रिव्हिलेजेस पुन्हा स्थापित करण्यात येऊ शकतील. कायमस्वरुपी विड्रॉअलच्या बाबतीत, कार्ड सदस्याला कायमस्वरुपी सभासदत्व नाकारण्याचा हक्क आयसीआयसीआय बँकेकडे आहे. तथापि, हे सुस्पष्ट करण्यात येते की विड्रॉअल (तात्पुरते किंवा कायमस्वरुपी) हे कार्डाला जोडलेले सर्व लाभ, प्रिव्हिलेजेस आणि सेवा यांचे स्वयंचलित विड्रॉअल स्थापित करेल. अशा तात्पुरत्या किंवा कायमस्वरुपी विड्रॉअलच्या बाबतीत, आयसीआयसीआय बँकेने अन्यथा नमूद केले नसेल तर, कार्ड सदस्य हा अशा विड्रॉअलआधी कार्डावर उद्भवलेल्या सर्व प्रभारांसाठी, त्यावरील इतर सर्व लागू प्रभारांसह एकत्रितपणे, पूर्णतः उत्तरदायी असणे चालू राहील. कार्डावर नमूद करण्यात आलेल्या वैधता कालावधीच्या कोणत्याही संदर्भाशिवाय कोणत्याही वेळी कार्ड मागे घेता येऊ शकते व कार्ड खाते बंद करता येऊ शकते. कार्ड स्वाधीन करण्याची विनंती करण्यात आल्यास, कार्ड सदस्य हा आयसीआयसीआय बँकेकडे, किंवा त्यांच्या प्रतिनिधीकडे कार्ड स्वाधीन करण्याचे मान्य करतो. कार्डाच्या प्रिव्हिलेजेसच्या विड्रॉअलची नोटीस दिल्यानंतर कार्डाचा वापर करणे हे फसवणुकीचे कृत्य आहे आणि हे कार्ड सदस्याला कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागण्याच्या अधीन आहे.

VII. प्रभार व पेमेन्ट्स

प्रभार हे पुढील प्रत्येक बाबीने युक्त आहे:

(ए) ऐच्छिक प्रभारामध्ये पुढीलचा समावेश असेल: व्यवहार सूचनेद्वारे करण्यात आलेल्या सामानाच्या आणि/किंवा सेवेच्या कोणत्याही खरेदीची रक्कम; व्यवहार सूचनेच्या अनुरोधाने प्रदान केलेली कोणतीही रोख अग्रिम रक्कम;

व्यवहार सूचनेच्या माध्यमातून कार्डामधून डेबिट करण्यासाठी कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँकेकडे विनंती केलेली कोणतीही रक्कम.

(बी) अनैच्छिक प्रभारामध्ये पुढीलचा समावेश असेल: कार्ड खात्याच्या किंवा कार्डाच्या संबंधात आयसीआयसीआय बँकेद्वारे आकारण्यात आलेले कोणतेही शुल्क, यामध्ये जॉइनिंग, वार्षिक, बदली, नूतनीकरण, हाताळणी, विलंबित भरणा आणि इतर शुल्क समाविष्ट. आयसीआयसीआय बँकेच्या प्रचलित दराने कार्ड खात्यामधून जॉइनिगं/वार्षिक शुल्क डेबिट करण्यात येईल. हे शुल्क परतावायोग्य असणार नाही. सभासदत्वाच्या नूतनीकरणाप्रतीचे वार्षिक शुल्क हे कार्डाच्या पहिल्या ॲनिव्हर्सरीला किंवा त्यापूर्वी कार्ड सदस्याद्वारे प्रदेय असेल. आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी ठरवण्यात आलेल्या विशिष्ट प्रकारच्या व्यवहारांसाठीचे सेवा प्रभार आकारण्यात येऊ शकतात. अनैच्छिक प्रभारांच्या परिगणनेची पद्धत वेळोवेळी आयसीआयसीआय बँकेकडून सूचित करण्यात येईल.

(सी) आयसीआयसीआय बँकेच्या कोणत्याही प्रभाराच्या रकमेची नोंद, येथे वर नमूद केलेली, उघड चुकीच्या अनुपस्थितीत, अंतिम असेल व कार्ड सदस्यावर बंधनकारक असेल, आणि आयसीआयसीआय बँकेने ऐच्छिक प्रभाराच्या अनुरोधाने कोणतेही पेमेन्ट प्रभावी करण्याच्या बाबतीत निर्णायक असेल. कार्डाच्या बाबतीत किंवा कार्डाच्या संबंधात वेळोवेळी लागू करण्यात आल्याप्रमाणे शासनाद्वारे किंवा इतर प्राधिकरणाद्वारे सर्व सांविधिक कर, जीएसटी, इतर सर्व प्रकर, शुल्क (यामध्ये मुद्रांक शुल्क व संबंधित नोंदणी प्रभार, जर असल्यास, कार्डाच्या संबंधात) आणि कर (कोणत्याही स्वरुपाच्या वर्णनाच्या) आकारण्यात येतील.

(डी) विलंबित किंवा सुधारित प्रभार

ए) हॉटेल, कार रेन्टल कंपनी, किंवा क्रुझ लाइन व्यवहार किंवा इतर कोणतेही व्यवहार यांसाठी विलंबित किंवा सुधारित प्रभारांकरिता जबाबदार असल्याची कार्ड सदस्याने संमती दिल्यास, मर्चन्ट हा विलंबित किंवा सुधारित प्रभारांवर प्रकिया करू शकतो.

बी) संबंधित व्यवहाराच्या व्यवहार तारखेच्या 90 कॅलेंडर दिवसांच्या आत कार्ड खात्यावर विलंबित किंवा सुधारित प्रभारांची प्रक्रिया करण्यात येईल.

सी) या व्यवहारांमध्ये रुम, अन्न किंवा पेय प्रभार, कर, इंधन, विमा, रेन्टल शुल्क, भाड्याच्या वाहनांना हानी पोहोचणे, पार्किंग तिकिटे आणि ट्रॅफिकसंबंधी इतर उल्लंघन, आणि क्रुझ लाइन व्हेसलवर वस्तू व सेवांची खरेदी यांचा समावेश असू शकतो.

(ई) आंतरराष्ट्रीयदृष्ट्या वैध कार्डांव्यतिरिक्त कार्डांच्या संबंधातील विदेशी चलनामधील प्रभारांच्या बाबतीत, आयसीआयसीआय बँक ही अधिकारक्षेत्र म्हणून सदर बाब लक्षात घेण्यास बांधील नाही, आणि नेपाळ व भूतान या प्रदेशामध्ये विदेशी चलनामध्ये उद्भवलेल्या कोणत्याही प्रभारांच्या संबंधात कोणत्याही प्रकारे उत्तरदायी असणार

नाही. पुर्वोक्तला हानी न पोहोचता, अशा प्रभारांचा आयसीआयसीआय बँकेकडून करण्यात आलेला कोणताही भरणा हा कार्ड सदस्याच्या पूर्ण रिकोर्ससह (आधारासह) असेल, आणि अशा प्रभारांच्या किंवा आयसीआयसीआय बँकेकडून करण्यात आलेल्या त्यांच्या पेमेन्ट्सच्या संबंधात कोणत्याही दायित्वापासून कार्ड सदस्य मुक्त झाल्याचे मानण्यात येत नाही. कार्ड सदस्याद्वारे आयसीआयसीआय बँकेचे अशा पेमेन्ट्सच्या सर्व परिणामांपासून पूर्णतः हानिरक्षण करण्यात येईल आणि तिला निर्धोक ठेवण्यात येईल.

(एफ) रेल्वेजसोबत व्यवहार:

क्रेडिट कार्डाने तिकीट बुक केल्यास, कार्ड सदस्याला तिकीटाच्या खरेदीसाठी, कोणत्याही अतिरिक्त प्रभारांच्या सापेक्ष, लागू असल्यास, भरणा करावा लागेल. त्यानंतर कोणतेही तिकीट रद्द करण्यात आल्यास, आयसीआयसीआय बँकेला सदरसाठी क्रेडिट प्राप्त झाल्यावर, कार्ड खात्यामध्ये रक्कम जमा करण्यात येईल (कॅन्सलेशन प्रभार वगळता).

तथापि, कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँकेकडे चार्ज स्लिप यशस्वीपणे सादर केल्यावर, कॅन्सलेशनच्या तारखेपासून 150 दिवसांच्या आत, खरेदीच्या तारखेची, कॅन्सलेशनच्या तारखेची पुष्टी करणाऱ्या पत्रासह आणि जेथे तिकिटाच्या खरेदीसाठीचे डेबिट दिसून आले आहे त्या विवरणाची प्रत यासह, कार्ड सदस्याच्या कार्ड खात्यावर क्रेडिट पाठवण्यात येईल. लागू असल्याप्रमाणे व्यवहार शुल्क आकारण्यात येईल.

(जी) इंधन स्थानकांच्या ठिकाणी व्यवहार:

कार्ड सदस्याने इंधनासाठी कार्डाचा वापर केल्यावर, त्याला टॅरिफ परिशिष्टामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे व्यवहार शुल्क आकारण्यात येईल.

Off us टर्मिनल्सच्या ठिकाणी आणि नॉन एचपीसीएल आउटलेट्सच्या ठिकाणी इंधनाच्या खरेदीवर, अधिभार प्रत्यावर्तनामध्ये (सरचार्ज रिव्हर्सलमध्ये) जीएसटी समाविष्ट असणार नाही.

(एच) क्रेडिट कार्डाच्या वापरावर प्रभार उद्भवल्यावर लगेचच कार्ड सदस्य त्यासाठी जबाबदार असेल. पेमेन्ट नियत तारखेला कोणत्याही थकित रकमेचा (बिल केलेली असो किंवा नसो) भरणा केलेला नसल्यास, अशी थकित रक्कम ही टॅरिफ परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे सदर प्रभार धारण करेल व सोसेल. प्रभार हा दैनंदिन सरासरी शिल्लक पद्धतीवर परिगणित करण्यात येतो आणि तो पुढीलपैकी एका तारखेला आकारण्यात येईल: जेथे प्रभार हा वस्तूंच्या व सेवांच्या खरेदीच्या संबंधात आहे, तेथे तो आयसीआयसीआय बँकेच्या नोंदींमध्ये समाविष्ट करण्यात येण्याच्या तारखेपासून. जेथे प्रभार हा रोख रकमेच्या विड्रॉअलच्या संबंधात आहे, तेथे अशा विड्रॉअलच्या तारखेपासून आयसीआयसीआय बँकेद्वारे पेमेन्ट प्राप्त होण्याच्या तारखेपर्यंत.

(I) पेमेन्ट नियत तारखेला किंवा त्यापूर्वी सर्व प्रभार तत्काळ भरण्याच्या कार्ड सदस्याच्या दायित्वाला हानी न पोहोचता, विवरणामध्ये कळवण्यात आल्याप्रमाणे, कार्ड सदस्य हा पेमेन्ट देय तारखेला किंवा त्यापूर्वी, विवरणामध्ये दर्शवलेली किमान देय रक्कम (एमएडी) भरण्याच्या पर्यायाची अंमलबजावणी करू शकतो. एमएडी रक्कम ही एकूण देय रकमेच्या 5% इतकी असेल, किंवा आयसीआयसीआय बँकेने तिच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार निश्चित केलेली इतर कोणतीही रक्कम असू शकेल. हप्त्यांद्वारे कोणतीही परतफेड करण्याच्या बाबतीत, विवरण कालावधीदरम्यान देय असणारी हप्त्याची रक्कम ही किमान देय रकमेमध्ये समाविष्ट करण्यात येईल. एकूण थकित रक्कम ही क्रेडिट किंवा रोख मर्यादेपेक्षा अधिक असल्यास, क्रेडिट किंवा रोख मर्यादा ही जितक्या रकमेने अधिक झाले आहे, ती रक्कम एमएडीमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

किमान देय रकमेमध्ये मागील विवरणामधील, जर असल्यास, न भरलेली किमान देय रक्कमही समाविष्ट असेल.

जेथे केवळ एमएडी रक्कम भरण्यात आलेली आहे त्या बाबतीत, व्यवहाराच्या तारखेपासून एकूण देय रकमेच्या उर्वरित रकमेवर व्याज आकारण्यात येईल. कार्ड सदस्याने केवळ एमएडी रक्कम भरण्याचा पर्याय वापरल्यास, सदर हे अतिरिक्तपणे पुढील विशेष अटी व शर्तींच्या सापेक्ष असेल:

ए) विवरण प्राप्त झाल्यावर, कार्ड सदस्य हा पेमेन्ट नियत तारखेपर्यंत विवरणामध्ये निर्देशित करण्यात आल्याप्रमाणे एकूण देय रकमेसाठी किंवा किमान देय रकमेइतक्या (एमएडी) किंवा त्यापेक्षा अधिक रकमेसाठी आयसीआयसीआय बँकेला, इन्फिनिटी पेमेन्ट, धनादेश पेमेन्ट, ड्राफ्ट पेमेन्ट, कॅश पेमेन्ट, ऑटो डेबिट पेमेन्ट, आरटीजीएस पेमेन्ट, क्लिक टू पे पेमेन्ट किंवा एनईएफटी पेमेन्ट यांपैकी कोणत्याही मार्गांनी पेमेन्ट करू शकतो.

बी) कार्डाच्या वापराद्वारे उद्भवलेले सर्व प्रभार हे (वरील खंड (एच)) अंतर्गत नमूद करण्यात आल्याप्रमाणे सेवा प्रभार धारण करतील व सोसतील.

सी) एमएडीसाठी किंवा एकूण देय रकमेपेक्षा कमी रकमेसाठी पेमेन्ट करण्यात आल्यास, खरेदीच्या तारखेपासून थकित असलेल्या एकूण रकमेवर, आणि त्यानंतर उद्भवलेल्या ताज्या खरेदींवर, तदनंतरच्या पेमेन्टच्या तारखेपर्यंत, सेवा कर आकारण्यात येईल. येथे वर निर्धारित करण्यात आलेल्या प्रभारांखेरीज, पेमेन्टच्या नियत तारखेपर्यंत किमान देय रक्कम (एमएडी) न भरल्यास, भरणा विलंब शुल्क लागू होईल. भरणा करण्यात आलेली एमएडी किंवा तिचा काही भाग यावर, कार्ड सदस्याकडून आयसीआयसीआय बँकेला सदर प्राप्त झाल्यास, पेमेन्टच्या तारखेनंतर व्याज आकारणे थांबेल.

*आयसीआयसीआय बँक, तिच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार, कोणत्याही वेळी, कोणतीही पूर्व सूचना न देता, कार्ड सदस्याच्या संबंधात, पूर्वगामी खंडांमध्ये वर्णन करण्यात आल्याप्रमाणे केवळ एमएडी भरण्याचा पर्याय मागे

घेऊ शकते. आयसीआयसीआय बँकेने अन्यथा मान्य केले नसेल तर, विशिष्ट विवरणामध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमेप्रती कार्ड सदस्याद्वारे प्राप्त झालेल्या कोणत्याही पेमेन्ट्सचे 20 ऑक्टोबर 2008 पासून प्रभावी पुढील आदेशामध्ये सदर देय रकमेप्रती विनियोजन करण्यात येईल:

1. सर्व कर, शुल्क, व्याज, परिव्यय, प्रभार, खर्च;
2. क्रेडिट कार्डांवरील व्यक्तिगत कर्जांप्रती पेमेन्ट आणि शिल्लक हस्तांतरण सुविधेवर प्रदेय हप्ते;
3. रिटेल खरेदीच्या हप्त्यांचे पेमेन्ट (ज्यामध्ये रिटेल खरेदीचे पेमेन्ट हे हप्त्यांमध्ये रुपांतरीत करण्यात आलेले आहे);
4. कॅश विड्रॉअल्सप्रती पेमेन्ट आणि दूरध्वनी सुविधेवर ड्राफ्ट;
5. कार्ड सदस्याने घेतलेल्या शिल्लक हस्तांतरण सुविधेच्या इतर प्रकारांप्रती पेमेन्ट;
6. रिटेल खरेदींप्रती पेमेन्ट.

येथे वर काहीही अंतर्भूत केलेले असले तरीही: (i) आयसीआयसीआय बँक, तिच्या निर्णयानुसार, आयसीआयसीआय बँकेकडून कार्ड सदस्याने घेतलेल्या इतर सुविधांच्या संबंधात कार्ड सदस्याद्वारे प्रदेय असणाऱ्या देय रकमेप्रती, जर असल्यास, संबंधित दस्तऐवजामध्ये किंवा अन्यथा नमूद करण्यात आलेल्या क्रमामध्ये सदर पेमेन्ट्सचे विनियोजन करेल; (ii) आयसीआयसीआय बँकेकडून तिच्या निर्णयानुसार विनियोजनाच्या क्रमामध्ये सुधारणा करण्यात येऊ शकते. सदर विनियोजनानंतर शिल्लक राहिलेल्या अतिरिक्त रकमेचे, जर असल्यास, आयसीआयसीआय बँकेद्वारे तयार करण्यात येणाऱ्या पुढील विवरणामध्ये/विवरणांमध्ये लगेचच नमूद करायच्या रकमेप्रती तिचे विनियोजन करण्यात येऊ शकते. आयसीआयसीआय बँक ही कार्ड खात्यासाठी क्रेडिट-लिमिट (पत-मर्यादा) नेमून देईल, जिचे कोणत्याही वेळी उल्लंघन न होणे आवश्यक आहे.

तथापि, एकूण थकित रक्कम ही पत-मर्यादेपेक्षा अधिक झाल्यास, अतिरिक्त रकमेवर अतिरिक्त प्रभार आकारण्यात येईल.

कार्ड सदस्याने त्याच्या सभासदत्वाचे 12 महिने पूर्ण केल्यावर, तो पत मर्यादेचा आणि/किंवा रोख मर्यादेचा आढावा घेण्यासाठी/तिच्यामध्ये वृद्धी करण्यासाठी/घट करण्यासाठी (आयसीआयसीआय बँकेने प्रदान केलेली असल्यास) अर्ज करण्याकरिता हक्कदार असेल.

पत मर्यादा आणि/किंवा रोख मर्यादा यांच्या सदर आढाव्यामधील बदल हे, जर असल्यास, आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयावर अवलंबून असतील. कार्डावर नेमून देण्यात आलेल्या पत मर्यादेचा आणि/किंवा रोख मर्यादेचा आढावा (यामध्ये वृद्धी किंवा घट समाविष्ट) घेण्यासाठी

आयसीआयसीआय बँक ही तिच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार हक्कदार असेल आणि केवळ पत मर्यादेमध्ये आणि/किंवा रोख मर्यादेमध्ये वृद्धी करण्याची प्रक्रिया ही कार्ड सदस्याच्या संमतीसह आयसीआयसीआय बँकेद्वारे प्रभावी करण्यात येईल.

टीप: पेमेन्ट नियत तारखेला एकूण देय रकमेसाठीचे पेमेन्ट आयसीआयसीआय बँकेला प्राप्त झाल्यास, कोणतेही सेवा प्रभार आकारण्यात येणार नाही. तथापि, सर्व कॅश व्यवहार व ड्राफ्ट्स (धनाकर्ष) यांच्यावर व्यवहाराच्या तारखेपासून सदरसाठी आयसीआयसीआय बँकेला पेमेन्ट प्राप्त होईपर्यंत प्रचलित दराने सेवा प्रभार आकारण्यात येईल.

(जे) कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँकेसोबत स्थापित केलेल्या असू शकणाऱ्या अशा इतर खात्यातून, समान रक्कम डेबिट करून आणि त्याच्या कार्ड खात्यावर ती क्रेडिट करून त्याचे क्रेडिट कार्ड पेमेन्ट्स प्रभावी करण्यासाठी कार्ड सदस्याने दिलेल्या कोणत्याही सूचना प्रभावी करण्यासाठी आयसीआयसीआय बँक हक्कदार असेल, परंतु ती त्यासाठी बद्ध असणार नाही. कार्ड खात्यावरील संपूर्ण थकित शिल्लक, कोणत्याही थकित कार्ड व्यवहारांच्या रकमेसह एकत्रितपणे, कार्ड खात्यावर प्रभावी असलेली परंतु अद्याप आकारण्यात न आलेली, कार्ड सदस्याच्या मृत्यूच्या बाबतीत (क्रेडिट शील्ड लाभाची जुळवणी केल्यानंतर*) किंवा कार्ड सदस्याच्या व्यवसायाच्या दिवाळखोरीच्या किंवा समापनाच्या बाबतीत कार्ड सदस्याद्वारे, त्याच्या उत्तराधिकाराद्वारे, नामनिर्देशित व्यक्तीद्वारे, कायदेशीर वारसासाद्वारे आयसीआयसीआय बँकेला लगेचच देय व प्रदेय होईल. * तपशीलासाठी, कृपया icicibank.com ला भेट द्या.

(के) कार्ड सदस्य स्पष्टपणे स्वीकारतो की तो देय असणारी कोणतीही रक्कम, किंवा अन्यथा देय झाली असती त्या तारखेपूर्वी देय असल्याचे घोषित करण्यात आलेली कोणतीही रक्कम भरण्यात असमर्थ ठरल्यास, किंवा कार्ड सदस्य हा आयसीआयसीआय बँकेसोबत ज्या कराराअंतर्गत कोणतीही वित्तीय/क्रेडिट/इतर सुविधा उपभोगत आहे त्या कराराअंतर्गत त्याने कोणताही डिफॉल्ट केल्यास, आयसीआयसीआय बँक, तिच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार, कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय, या अटी व शर्तींमध्ये आणि/किंवा लागू कायद्यांमध्ये उपलब्ध तिचे सर्व किंवा कोणतेही हक्क आणि उपाययोजना यांचा वापर करेल.

(एल) येथे याखालील आयसीआयसीआय बँकेच्या इतर हक्कांप्रती कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय, पेमेन्ट भरण्यामध्ये विलंब होण्याच्या बाबतीत, बँक ही क्रेडिट कार्डाचा आदर न करण्याची व्यापारी आस्थापनांना सूचना देऊन क्रेडिट कार्डाचे प्रिव्हिलेजेस मागे घेण्याचा हक्क राखून ठेवत आहे. कार्ड सदस्य हे स्वीकारतो की, आपल्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार, आयसीआयसीआय बँक किंवा तिचे नियुक्त प्रतिनिधी/एजन्ट्स हे, कार्डावर पूर्वी उद्भवलेल्या प्रभारांप्रती पेमेन्टसाठी त्याच्याकडे कोणत्याही वेळी पाठपुरावा करू शकतील. कार्ड सदस्य हा सर्व देय रकमेच्या

संकलनासाठीचे सर्व खर्च (यामध्ये कायदेशीर खर्च समाविष्ट), संबंधित आणि आनुषंगिक प्रकरणांसाठी आयसीआयसीआय बँकेला उद्भवलेले सर्व प्रभार, यामध्ये कार्डाचे नूतनीकरण/कार्ड बदली करणे, ड्युप्लिकेट विवरण/चार्ज–स्लिप यांसाठीचे प्रभार, रोख अग्रिम रकमेसाठी व्यवहार शुल्क, नगरबाह्य धनादेशांसाठी संकलन प्रभार, परत आलेल्या पेमेन्ट्ससाठी दंडात्मक शुल्क आणि तशा स्वरुपाचे खर्च आणि कायदेशीर कारवाई सुरू करण्याच्या बाबतीत, सर्व कायदेशीर खर्च आणि व्याजासह डिक्रीची रक्कम समाविष्ट, भरण्यासही सहमती दर्शवतो.

सर्व प्रभारांसंबंधी तपशीलासाठी, टॅरिफ परिशिष्टाचा संदर्भ घ्या.

(एम) संबंधित नियत तारखांना कार्डधारकाने/कार्ड सदस्याने त्याची थकित रक्कम न भरल्यास, येथील खंडांमध्ये संदर्भ देण्यात आल्याप्रमाणे आयसीआयसीआय बँकेचे विविध हक्क व उपाययोजना यांच्याखेरीज, आयसीआयसीआय बँक ही कार्डधारकाला/कार्ड सदस्याला इम्प्लॉयरकडून प्रदेय वेतनामधून/पगारामधून रक्कम वजा करून घेण्यासाठी कार्डधारकाच्या/कार्ड सदस्याच्या इम्प्लॉयरशी संपर्क साधण्यासाठी आणि कार्डधारकाने/कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँकेला थकित रक्कम पूर्णतः प्रदान करेपर्यंत आयसीआयसीआय बँकेला सदर रक्कम वित्तप्रेषित करण्यासाठी, इरिव्होकेबली (रद्द करता न येण्याजोगे) हक्कदार व प्राधिकृत असेल. आयसीआयसीआय बँक ही कार्डधारकाच्या/कार्ड सदस्याच्या इम्प्लॉयर्सना कळवेल (आणि सूचित करेल), त्या रकमेसाठी, आणि त्या प्रमाणात वजावट असेल. कार्डधारकाचा/कार्ड सदस्याचा अशा वजावटींबाबत कोणताही आक्षेप असणार नाही, किंवा तो आक्षेप उपस्थित/निर्माण करणार नाही. कार्डधारकाचे/कार्ड सदस्याचे आणि/किंवा कार्डधारकाच्या/कार्ड सदस्याच्या इम्प्लॉयरचे नियमन करणारा कोणताही कायदा किंवा करार हा कार्डधारकाच्या/कार्ड सदस्याच्या इम्प्लॉयरद्वारे आयसीआयसीआय बँकेप्रती सदर वजावटीसाठी व पेमेन्टसाठी आवश्यक असणाऱ्या आयसीआयसीआय बँकेच्या पुर्वोक्त हक्काला कोणत्याही स्वरुपात प्रतिबंधित किंवा निर्बंधित करणार नाही.

VIII. कॅश विड्रॉअल (रोख रक्कम काढणे)

आयसीआयसीआय बँकेद्वारे ठरावीक कालावधीने ठरवण्यात आल्याप्रमाणे आणि आयसीआयसीआय बँकेने कार्ड सदस्याला वेळोवेळी नमूद केल्याप्रमाणे, कार्ड सदस्य हा आयसीआयसीआय बँकेच्या शाखेमधील टेलर काउंटर्समधून/आयसीआयसीआय बँकेच्या निवडक ठिकाणांच्या किंवा संबंधित बँकांच्या/इतर ठिकाणांच्या ऑटोमेटेड टेलर मशीन्समधून (एटीएम्स) आपात्कालीन रोख रक्कम प्राप्त करण्यासाठी कार्डाचा वापर करू शकतो. या सुविधेअंतर्गत काढता येणारी कोणतीही रक्कम ही प्रत्येक कार्ड सदस्याला आयसीआयसीआय बँकेद्वारे नमूद करण्यात आलेल्या उपलब्ध रोख रकमेपेक्षा कोणत्याही वेळी अधिक होऊ नये.

कार्ड सदस्याने एटीएमद्वारे तयार झालेली व्यवहाराची नोंद त्याच्यासोबत बाळगणे आवश्यक असेल. सर्व प्रभारांवर व्यवहार शुल्क लावण्यात येईल आणि त्यानंतर कळवण्यात येणाऱ्या विवरणामध्ये कार्ड सदस्याला ते आकारण्यात येईल. तसेच, सर्व कॅश विड्रॉअल्सवर अशा विड्रॉअलच्या तारखेपासून आयसीआयसीआय बँकेला पेमेन्ट प्राप्त होईपर्यंत सरासरी दैनंदिन थकित शिल्लक पद्धतीवर परिगणित करण्यात आलेला सेवा प्रभार लावण्यात येईल. हा सेवा प्रभार कार्ड खात्यामधून वजा करण्यात येईल. वर उल्लेख करण्यात आलेले व्यवहार शुल्क व सेवा प्रभार हे नॉन–रिफंडेबल (ना–परतावायोग्य) आहेत. निवडक कार्डांवरील रोख मर्यादा ही, आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी नमूद करण्यात आल्याप्रमाणे, कार्ड जारी करण्याच्या तारखेपासून पहिल्या एकशे ऐंशी (180) दिवसांसाठी शून्य असेल. पहिला 180 दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, आयसीआयसीआय बँकेद्वारे तिच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार व आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी कळवण्यात आलेल्या अटी व शर्तींनुसार, कार्ड सदस्याला रोख मर्यादा उपलब्ध करून देण्यात येईल.

IX. फोनवर ड्राफ्ट (धनाकर्ष)

ड्राफ्ट्स जारी करण्यासाठीची विनंती ही आयसीआयसीआय बँक कस्टमर केअर सेंटरमार्फत दूरध्वनीद्वारे कार्ड खात्यावर करण्यात येऊ शकते. सर्व ड्राफ्ट्स हे उपलब्ध रोख मर्यादेपेक्षा अधिक नसणाऱ्या रकमेसाठी जारी करण्यात येतील आणि सर्व ड्राफ्ट्सवर व्यवहार शुल्क लावण्यात येईल आणि कार्ड सदस्याना विवरणामध्ये ते आकारण्यात येईल. व्यवहार शुल्काखेरीज, सर्व ड्राफ्ट्सवर सेवा प्रभार लावण्यात येईल आणि सदर प्रभार हा ड्राफ्ट जारी करण्याच्या तारखेपासून आयसीआयसीआय बँकेला कार्ड सदस्याद्वारे परतफेड करण्यात येण्याच्या तारखेपर्यंत प्रदेय असेल. आयसीआयसीआय बँकेच्या प्रचलित दराने कार्ड खात्यामधून सेवा प्रभार डेबिट करण्यात येईल.

वर उल्लेख करण्यात आलेले व्यवहार शुल्क व सेवा प्रभार हे नॉन–रिफंडेबल (ना–परतावायोग्य) आहेत. आयसीआयसीआय बँक कोणतीही पूर्व सूचना न देता आणि कार्ड सदस्याप्रती कोणत्याही दायित्वाशिवाय कोणत्याही वेळी ही सुविधा खंडित करण्याचा हक्क राखून ठेवत आहे. ड्राफ्ट जारी केल्यानंतर तो आयसीआयसीआय बँकेच्या नोंदीमध्ये शेवटी नोंद करण्यात आलेल्या कार्ड सदस्याच्या टपाल पत्त्यावर पाठवण्यात येईल/कुरियर करण्यात येईल. आयसीआयसीआय बँकेच्या–कस्टमर केअर सेंटरला विनंती प्राप्त होण्याच्या वेळेपासून 4 कामकाज दिवसांच्या आत ड्राफ्ट सुपुर्द करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत असले, तरीही या बाबतीत कोणतेही आश्वासन देण्यात येत नाही. ड्राफ्ट्सची डिलिव्हरी न होणे किंवा डिलिव्हरीमध्ये विलंब होणे किंवा ड्राफ्ट्स प्राप्त न केले जाणे या बाबतीत आयसीआयसीआय बँक जबाबदार असणार नाही. ड्राफ्ट गहाळ झाल्यास किंवा तो रद्द करायचा असल्यास, आयसीआयसीआय बँकेच्या कस्टमर केअर सेंटरला त्याबाबत ताबोडतोब कळवणे आवश्यक आहे. कार्ड सदस्याकडून यथोचितरीत्या भरलेले हानिरक्षण (आयसीआयसीआय बँकेला स्वीकारार्ह स्वरुपात) प्राप्त झाल्यानंतर, केवळ कार्ड खात्यावर जमा करून आयसीआयसीआय बँक ड्राफ्टची मुद्दल परत करेल. रद्द करावयाच्या ड्राफ्ट्ससाठी, ड्राफ्ट परत

करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी कॅन्सलेशन प्रभार आकारण्यात येईल. ड्राफ्ट गहाळ झाल्यास/चोरण्यात आल्यास, आयसीआयसीआय बँक बदली ड्राफ्ट देण्यासाठी किंवा भरपाई देण्यासाठी जबाबदार असणार नाही.

X. विमा लाभ

आयसीआयसीआय बँकेद्वारे विमा कंपनीशी टाय अप करून वेळोवेळी विविध विमा लाभ देऊ करण्यात येतात. दाव्यांच्या सर्व प्रकरणांच्या बाबतीत, विमा कंपनी ही दाव्याच्या हिशेबपूर्तीसाठी पूर्णतः उत्तरदायी असेल, आणि मोबदला, मोबदल्याची वसुली, दाव्याची प्रकिया किंवा इतर कोणत्याही कारणासाठी, कार्ड सदस्य कोणत्याही स्वरुपात आयसीआयसीआय बँकेला जबाबदार धरणार नाही. वरील उताऱ्याच्या अटींच्या सापेक्ष, आयसीआयसीआय बँकेद्वारे थेटपणे किंवा तिच्यामार्फत विमा कंपनीला आयसीआयसीआय बँकेद्वारे पाठवण्यात आलेल्या विमा नामनिर्देशन प्रपत्रावर कार्ड सदस्याच्या ज्या नामनिर्देशित व्यक्तीचे नाव व स्वाक्षरी आहे, यथोचितरीत्या साक्ष असल्याप्रमाणे, त्याला मान्यताप्राप्त देय रक्कम सादर केल्यानंतर विमा कंपनी तिच्या सर्व दायित्वांपासून मुक्त होईल. नामनिर्देशनामधील कोणत्याही बदलाबाबत कार्ड सदस्याद्वारे आयसीआयसीआय बँकेला लिखित स्वरुपात कळवण्यात येईल.

कार्ड सदस्य हे अभिस्वीकृत करतो की कार्ड सदस्याने कार्ड खाते चांगले व नियमित राखण्यासह तो आयसीआयसीआय बँकेचा कार्ड सदस्य आहे व राहतो तोपर्यंत आणि डिफॉल्टची कोणतीही घटना होत नाही तोपर्यंत, अशा प्रकारे प्रदान केलेले सर्व विमा लाभ हे कार्ड सदस्याला उपलब्ध राहतील.

कार्ड सदस्य हे याला सहमती दर्शवतो की कार्ड सदस्य कार्डावरील सर्व दायित्वे समाधानकारकपणे फेडेपर्यंत आयसीआयसीआय बँकेच्या निर्णयानुसार विमा कंपनीद्वारे इस्क्रो खात्यामध्ये विमा दावा उत्पन्न ठेवण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, कार्ड सुविधा संपुष्टात आणण्याच्या बाबतीत, सदस्यत्व थांबवण्याच्या सदर तारखेपासून सर्व सदर विमा लाभ स्वयंचलितपणे व वस्तुतः उपलब्ध होणे थांबेल. आयसीआयसीआय बँक कोणत्याही वेळी (आपल्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार त्यासंबंधी कोणतीही पूर्वसूचना न देता), या विमा लाभांमध्ये सुधारणा करणे, ते स्थगित करणे, मागे घेणे किंवा ते रद्द करणे अशा गोष्टी करू शकतात आणि हे लाभ चालू ठेवण्यासाठी आयसीआयसीआय बँकेवर कोणतेही आबंधन असणार नाही.

XI. क्रेडिट कार्ड गहाळ होणे, चोरले जाणे किंवा त्याचा गैरवापर होणे.

कार्ड गहाळा झाल्यास किंवा ते चोरले गेल्यास, त्याबाबत आयसीआयसीआय बँक कस्टमर केअरला त्वरित कळवणे आवश्यक आहे. तथापि, चोरीमुळे कार्ड गहाळ होण्याच्या बाबतीत, कार्ड सदस्याने स्थानिक पोलीस स्थानकामध्ये रिपोर्ट दाखल करणेही आवश्यक आहे आणि आयसीआयसीआय बँकेने मागणी केल्यावर त्याची प्रत सादर करता यायला हवी. आयसीआयसीआय बँक ही पुरेशी पडताळणी केल्यावर, कार्ड खाते स्थगित करू शकेल आणि त्यासंबधीच्या सर्व सुविधा समाप्त करू शकेल आणि कार्ड सदस्याला उद्भवणाऱ्या कोणत्याही गैरसोयीसाठी आयसीआयसीआय बँक जबाबदार असणार

नाही. कार्ड सदस्याने हे लक्षात घ्यायला हवे की कार्ड गहाळ झाल्याचे, चोरण्यात आल्याचे किंवा त्याची हानी झाल्याने कळवण्यात आल्यावर, सदर कार्ड तदनंतर सापडले तरीही, ते पुन्हा वापरता येऊ शकणार नाही. कार्ड सदस्य घोषित करतो की कार्ड गहाळ झाल्याचे, त्याची हानी झाल्याने किंवा ते चोरण्यात आल्याचे कळवण्यात आल्यास, जरी ते नंतर पुन्हा सापडले किंवा चांगल्या स्थितीत असल्याचे म्हटले तरीही, सदर कार्ड पुन्हा वापरता येणार नाही. अशा बाबतीत, कार्ड सदस्य तत्परतेने कार्डाचे 4 तुकडे करेल आणि कार्ड रद्द करण्यासाठी ते आयसीआयसीआय बँकेकडे परत करेल. कार्डाच्या सुरक्षिततेसाठी कार्ड सदस्य जबाबदार आहे आणि कार्डाचा गैरवापर होऊ नये याची खातरजमा करण्यासाठी तो आवश्यक ती सर्व पावले उचलेल. आयसीआयसीआय बँकेने असे निश्चित केले की कार्ड गहाळ होणे/त्याची चोरी होणे/कार्ड नष्ट होणे अशा बाबतीत कार्ड सदस्य आवश्यक ती पावले उचलण्यामध्ये असमर्थ ठरल्यास आणि सदर हे संदेहास्पद असल्यास, गहाळ झालेल्या, चोरण्यात आलेल्या किंवा हानी झालेल्या कार्डाचे वित्तीय दायित्व कार्ड सदस्यावर असेल आणि त्याची परिणती कार्ड खाते रद्द करण्यामध्येही होऊ शकेल.

कार्ड गहाळ झाल्याचे/कार्डाची चोरी झाल्याचे/कार्डाची हानी झाल्याचे कळवण्यात आल्यानंतर आणि आयसीआयसीआय बँकेने कार्ड खाते स्थगित केल्यानंतर, कार्डावर करण्यात आलेल्या कोणत्याही अप्राधिकृत व्यवहारांसाठी कार्ड सदस्यावर कोणतेही दायित्व जोडले जाणार नाही. कार्ड गहाळ होणे/चोरी होणे/त्याची हानी होणे यापश्चात कार्डावर करण्यात आलेल्या कोणत्याही व्यवहारांचे दायित्व बँकेवर असेल. तथापि, सदर कार्ड गहाळ झाल्याचे/चोरी झाल्याचे/त्याचा गैरवापर झाल्याचे कळवण्यात आल्यानंतर, सदर कळवण्याची वेळ आणि/किंवा कार्डावर करण्यात आलेले व्यवहार यांच्यासंबंधात कोणताही वाद असल्यास, विवादीत व्यवहाराची वेळ आणि/किंवा अधिकृतता निश्चित करण्याचा हक्क आयसीआयसीआय बँक राखून ठेवत आहे. आयसीआयसीआय बँक ही कार्ड सदस्याच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी आणि कार्ड खात्यावर कोणत्याही प्रकारचा गैरवापर होणे टाळण्यासाठी, तडजोडीच्या (कॉम्प्रमाइझच्या) संशयित जोखमीच्या आधारावर क्रेडिट कार्डाला अटकाव करण्याचा हक्क राखून ठेवत आहे. कार्ड सदस्य हा अशा अटकाव करण्यात आलेल्या कार्डाचा वापर कोणत्याही व्यवहारासाठी/व्यवहारांसाठी करणार नाही आणि त्याला 7 (सात) कार्यकारी दिवसांच्या आत बदली कार्ड मिळेल.

कार्ड सदस्य हा, आयसीआयसीआय बँकेद्वारे संभाव्य फसवणुकीच्या जोखमीबाबत कळवल्यानंतरही, कार्ड अनब्लॉक करण्याची विनंती करू शकतो, कार्डाच्या फसवणुकीच्या वापराबाबत किंवा अन्यथा त्यानंतर आयसीआयसीआय बँकेला कळवण्यात आलेल्या कोणत्याही फसवणुकींच्या व्यवहारासाठी कोणत्याही प्रकारे आयसीआयसीआय बँक उत्तरदायी किंवा जबाबदार असणार नाही.

XII. दायित्वाची वगळणूक

आयसीआयसीआय बँकेला उपलब्ध उपाययोजना व या अटी यांच्या पूर्वग्रहाशिवाय, पुढीलद्वारे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उद्भवलेल्या कोणत्याही हानीच्या किंवा नुकसानाच्या बाबतीत कार्ड सदस्याप्रती आयसीआयसीआय बँक कोणत्याही प्रकारे कोणत्याही दायित्वाखाली असणार नाही.

ए) पुरवण्यात आलेल्या वस्तू किंवा सेवा यांच्यामधील कोणताही दोष;

बी) कार्डाचा आदर करण्यासाठी किंवा स्वीकारण्यासाठी कोणत्याही व्यक्तीने/व्यापारी आस्थापनेने नकार देणे; सी) कोणत्याही कॉम्प्युटर टर्मिनलचा बिघाड;

डी) कार्ड सदस्याव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीने व्यवहार सूचना देणे; ई) आयसीआयसीआय बँक किंवा तिचे प्रतिनिधी यांच्याव्यतिरिक्त कार्ड सदस्याद्वारे इतर कोणाला कार्ड सुपुर्द करणे;

एफ) कार्डाच्या दर्शनी भागावर नमूद केलेल्या मुदतसमाप्ती तारखेआधी कार्ड स्वाधीन करण्याची मागणी करण्याच्या आणि ते संपादीत करण्याच्या हक्काची आयसीआयसीआय बँकेने अंमलबजावणी करणे;

जी) आयसीआयसीआय बँकेला कोणतेही कार्ड किंवा कार्ड खाते संपुष्टात आणण्याच्या असणाऱ्या हक्काची आयसीआयसीआय बँकेने अंमलबजावणी करणे;

एच) कार्डाच्या पुनर्ताबा घेतल्यामुळे उद्भवल्याचे अभिकथित असल्यामुळे आणि/किंवा, कार्ड सदस्य परत करण्यासाठीची कोणतीही विनंती किंवा कार्डाचा आदर करण्यासाठी किंवा स्वीकार करण्यासाठी कोणत्याही व्यापारी आस्थापनेद्वारे/मेल ऑर्डरद्वारे नकार देण्यात येणे यांमुळे कार्ड सदस्याच्या क्रेडिट कॅरेक्टरची व प्रतिष्ठेची हानी होणे;

आय) आयसीआयसीआय बँकेद्वारे उघड करण्यात आलेल्या कोणत्याही तपशीलामधील चुकीचे कथन, विपर्यास, चूक किंवा वगळणूक; एकतर आयसीआयसीआय बँकेकडून किंवा आयसीआयसीआय बँकेच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून, कार्ड सदस्याला थकित देय रकमेच्या हिशेबपूर्तीसाठी मागणी किंवा दावा करण्यात आल्यास, कार्ड सदस्य हे मान्य व अभिस्वीकृत करतो की सदर मागणी किंवा दावा हा कोणत्याही स्वरुपात, मानहानीचे कृत्य किंवा कार्ड सदस्याच्या चारित्र्याप्रती पूर्वग्रह ठेवण्याचे किंवा ते दर्शवण्याचे कृत्य मानण्यात येणार नाही.

कार्डधारक हे अभिस्वीकृत करतो की क्रेडिट कार्ड सुविधेसाठी अर्ज करताना कार्डधारकाने दिलेल्या मोबाइल क्रमांकावर किंवा ई-मेलवर अलर्ट्स प्राप्त करण्याच्या सुविधेची तरतूद ही आयसीआयसीआय बँकेने किंवा अन्यथा नियुक्त केलेल्या सेवा प्रदात्याद्वारे देण्यात येणारे इन्फ्रास्ट्रक्चर, कनेक्टिव्हिटी आणि सेवा यांच्यावर अवलंबून आहे. कार्डधारक हे स्वीकारतो की आयसीआयसीआय बँकेद्वारे पाठवण्यात येणाऱ्या अलर्ट्सची कालमर्यादा, अचूकता आणि वाचनीयता ही आयसीआयसीआय बँकेद्वारे किंवा अन्यथा नियुक्त करण्यात आलेल्या इतर सेवा प्रदात्यावर परिणाम करणाऱ्या घटकांवर अवलंबून असेल. आयसीआयसीआय बँक ही पाठवण्यात आलेले अलर्ट्स न मिळणे किंवा

विलंबाने मिळणे, तसेच कार्डधारकांना पाठवण्यात आलेल्या अलर्ट्सच्या वहनामध्ये चूक होणे, हानी होणे किंवा विपर्यास होणे या बाबींसाठी उत्तरदायी असणार नाही.

XIII. शिल्लक हस्तांतरण सुविधा

'फॅसिलिटी' म्हणजे आयसीआयसीआय बँकेच्या स्वेच्छानिर्णयानुसार, कार्ड सदस्याच्या इतर बँकाच्या क्रेडिट कार्डावरील थकित शिल्लक रक्कम ही आयसीआयसीआय बँकेने प्रदान केलेल्या/प्रदान करण्याचे मान्य केलेल्या कार्ड सदस्याच्या कार्डावर हस्तांतरीत करणे होय, यामध्ये उपलब्ध पत मर्यादेचे उल्लंघन करण्यात येणार नाही. 'ईझी बीटी' म्हणजे अशी फॅसिलिटी ज्यामध्ये कार्ड सदस्य फॅसिलिटीच्या परतफेडीचा प्रकार समान मासिक हप्त्यांमध्ये रुपांतरीत करू शकतो.

'ईएमआय' किंवा 'समान मासिक हप्ता' म्हणजे फॅसिलिटीची मुद्दल रक्कम किंवा त्यावरील व्याज यांनी युक्त, फॅसिलिटीच्या संबंधात आयसीआयसीआय बँकेकडून कार्ड सदस्याला प्रदेय रकमेचे समान मासिक हप्ते.

'इंट्रेस्ट फ्री बॅलन्स ट्रान्सफर' म्हणजे कार्डधारक हा आयसीआयसीआय बँकेने नमूद केलेल्या निश्चित कालावधीसाठी 0% व्याज दराने फॅसिलिटी प्राप्त करतो.

'एलटीबीटी' (लाइफ टाइम बॅलन्स ट्रान्सफर) म्हणजे कार्डधारक हा फॅसिलिटी घेण्याच्या वेळी आयसीआयसीआय बँकेद्वारे नमूद करण्यात आलेल्या दराने अनस्पेसिफाइड (नमूद न केलेल्या) कालावधीसाठी फॅसिलिटी प्राप्त करतो.

फॅसिलिटीचा वापर:

फॅसिलिटीअंतर्गत, आयसीआयसीआय बँक आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, आयसीआयसीआय बँक आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, कार्ड सदस्याला त्याच्या कार्ड खात्यावर, इतर बँकाद्वारे/एन्टिटीजद्वारे जारी करण्यात आलेल्या क्रेडिट कार्डांवर त्याची सर्व किंवा काही थकित शिल्लक हस्तांतरीत करण्यास अनुमती देते. सदर हस्तांतरण हे मंजूर केलेल्या फॅसिलिटी रकमेसाठी अशा इतर बँकांसह/एन्टिटीसह कार्ड सदस्याच्या कार्ड खात्यावर जमा करण्यासाठी क्रेडिट कार्ड जारीकर्त्या इतर बँकाच्या/एन्टिटीच्या नावे, आयसीआयसीआय बँकेकडे शेवटचा नोंदणीकृत असणाऱ्या, कार्ड सदस्याच्या टपाल पत्त्यावर पाठवण्यात येणाऱ्या डिमांड ड्राफ्टद्वारे प्रभावी करण्यात येईल.

आयसीआयसीआय बँकेने फॅसिलिटी मंजूर केल्यानंतर/मंजूर करण्याचे मान्य केल्यानंतर त्याच्या इतर क्रेडिट कार्डाच्या संबंधात कार्ड सदस्याला उद्भवलेल्या कोणत्याही थकित पेमेन्ट्साठी किंवा सेवा प्रभारांसाठी आयसीआयसीआय बँक उत्तरदायी असणार नाही. इतर क्रेडिट कार्ड जारीकर्त्या बँकांद्वारे/एन्टिटीद्वारे फॅसिलिटीची हस्तांतरीत रक्कम प्राप्त होईपर्यंत, कार्ड सदस्य हा इतर क्रेडिट कार्ड जारीकर्त्या बँकांना/एन्टिटीना पेमेन्ट्स करणे चालू ठेवण्यासाठी उत्तरदायी असेल. अतिरिक्तपणे, कार्ड सदस्याला त्याच्या इतर क्रेडिट कार्ड जारीकर्त्या बँकेसोबतच्या/एन्टिटीसोबतच्या कार्ड खात्यावर क्रेडिट झाल्याचे सांगणाऱ्या भविष्यकालीन विवरणामधील पुष्टीदेखील प्राप्त होईल. सदर फॅसिलिटी ही उपलब्ध रोख-मर्यादा

आणि/किंवा पत मर्यादा यांच्या सापेक्ष, प्रायमरी कार्ड सदस्य तसेच सप्लिमेन्टरी कार्ड सदस्य यांनाही उपलब्ध असेल आणि फॅसिलिटीसाठी विनंती केल्यावर कार्ड सदस्याला ती प्रदान करण्यात येईल.

कार्ड सदस्याला मंजूर करण्यात आलेल्या रकमेद्वारे रोख–मर्यादा आणि/किंवा पत–मर्यादा निर्बंधित करण्यात येईल. टॅरिफ परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे, आयसीआयसीआय बँकेने कार्ड सदस्याला नमूद केलेल्या टक्केवारीपर्यंत कार्ड सदस्याने फॅसिलिटीसाठी ना–परतावायोग्य (नॉनरिफंडेबल) प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक असेल. आयसीआयसीआय बँकेच्या प्रचलित दराने प्रक्रिया शुल्क व व्याजाची रक्कम यावर जीएसटी लागू असेल. सदर रक्कम ही त्या विशिष्ट महिन्यासाठी विवरणामध्ये प्रतिबिंबित होईल. कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँकेकडे फॅसिलिटीसाठी आवेदन केल्यावर, कार्ड सदस्याने ज्यासाठी फॅसिलिटी घेतलेली आहे त्या इतर बँकेच्या क्रेडिट कार्डावर रु. दहा (10) चे डमी ऑथरायझेशन पार पाडेल. ऑथरायझेशन यशस्वी झाल्यास, आयसीआयसीआय बँकेच्या स्वेच्छानिर्णयानुसार इतर अटी व शर्तींच्या सापेक्ष शिल्लक हस्तांतरण व्यवहारावर प्रक्रिया करण्यात येईल.

परतफेड:

ईझी बीटी फॅसिलिटी असण्याच्या बाबतीत, कार्ड सदस्य हा फॅसिलिटीची व त्यावरील व्याजाची परतफेड ईएमआय स्वरुपात करेल. सदर व्याज हे फॅसिलिटीसाठी प्रस्ताव देण्याच्या वेळी आयसीआयसीआय बँकेद्वारे कार्ड सदस्याला निर्देशित करण्यात आलेल्या तसेच त्यानंतर कार्ड सदस्याला कळवण्यात आलेल्या सदर दराने असेल. कार्ड सदस्याने ईझी बीटीसंबंधात विनंतीची पुष्टी करण्याच्या वेळेपासून व्याजाच्या मोजणीला सुरुवात होईल. ईएमआयची रक्कम तसेच फॅसिलिटीचा इतर तपशील (यामध्ये व्याज दर समाविष्ट) हे कार्ड सदस्याला त्याच्या/तिच्या टपाल पत्त्यावरही कळवण्यात येतील.

विशिष्ट महिन्यासाठी देय असणारी ईएमआयची रक्कम ही तदनंतर त्या विशिष्ट महिन्यासाठी विवरणामध्ये प्रतिबिंबित होईल. आयसीआयसीआय बँक ही विवरणाद्वारे कार्ड सदस्याला कळवण्यात आल्याप्रमाणे, विशिष्ट महिन्यासाठी देय ईएमआयच्या रकमेसाठी मासिक तत्त्वावर कार्ड सदस्याचे कार्ड खाते डेबिट करण्यासाठी कार्ड सदस्याद्वारे हक्कदार/प्राधिकृत करण्यात आलेली आहे. कार्ड सदस्याद्वारे परतफेड करण्यात आल्यावर, कार्ड सदस्याद्वारे परतफेड करण्यात आलेल्या ईएमआय रकमेच्या व्याप्तीमध्ये रोख मर्यादा/पत मर्यादा पुनःस्थापित करण्यात येईल.

विवरणामध्ये दर्शवण्यात आल्याप्रमाणे, कार्ड सदस्याने पेमेन्ट नियत तारखेला विशिष्ट महिन्यासाठी ईएमआयची संपूर्ण रक्कम भरणे आवश्यक असेल आणि सदर रक्कम पुढील विवरणामध्ये नेण्यास/समाविष्ट करण्यास अनुमती असणार नाही. नमूद केलेल्या पेमेन्ट नियत तारखेला पेमेन्ट प्रदान न करण्याच्या बाबतीत, त्याला कार्ड सदस्याद्वारे डिफॉल्ट केल्याचे मानण्यात येईल आणि कार्ड सदस्य हा त्याच्या फॅसिलिटीवर आकारणीयोग्य असल्याप्रमाणे आणि टॅरिफ परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे भरणा विलंब शुल्क यांसह रकमेचा भरणा करण्यासाठी जबाबदार असेल.

ईझी बीटीच्या प्रकरणांव्यतिरिक्त फॅसिलिटीची रक्कम ही एकूण देय रकमेचा किंवा ईएमआय देय रकमेचा भाग असेल आणि/किंवा अनुक्रमे खंड VI आणि XXXIV मध्ये प्रदान करण्यात आलेल्या स्वरुपात परतफेडयोग्य असेल.

कार्ड सदस्याने व्याज मुक्त शिल्लक हस्तांतरण करण्याच्या बाबतीत, केवळ हस्तांतरीत केलेली मुद्दल शिल्लक रक्कम ही नमूद कालावधीसाठी व्याजमुक्त आहे. कार्ड सदस्याने फॅसिलिटी प्राप्त केल्यानंतर एकूण देय रकमेच्या केवळ काही भागाचे पेमेन्ट करण्याच्या बाबतीत, कार्ड सदस्याने भरलेल्या रकमेचे विनियोजन करण्यात येईल आणि वरील खंड VI (I) मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तींप्रमाणे व्याज व सेवा प्रभार आकारण्यात येतील.

कार्ड सदस्याने एलटीबीटी फॅसिलिटी प्राप्त केल्यास, आयसीआयसीआय बँकेद्वारे नमूद करण्यात आलेला दर केवळ हस्तांतरीत करण्यात आलेल्या मुद्दल शिलकीवर लागू असेल. फॅसिलिटी प्राप्त केल्यानंतर एकूण देय रकमेच्या केवळ काही भागाचे पेमेन्ट करण्याच्या बाबतीत, कार्ड सदस्याने भरलेल्या रकमेचे विनियोजन करण्यात येईल आणि वरील खंड VI (I)(C) मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तींप्रमाणे व्याज व सेवा प्रभार आकारण्यात येतील. हस्तांतरीत करण्यात आलेल्या मुद्दल शिलकीच्या 5% रक्कम ही किमान देय रक्कम परिगणित करताना विचारात घेण्यात येईल.

फॅसिलिटीचे फॉरक्लोजर:

ईझी बीटी फॅसिलिटी असण्याच्या बाबतीत, फॅसिलिटीच्या परतफेडीच्या कालावधीपूर्वी फॅसिलिटी फॉरक्लोज करण्याच्या/संपुष्टात आणण्याच्या बाबतीत, फॉरक्लोजरच्या/समाप्तीच्या वेळी फॅसिलिटीची थकित रक्कम तसेच त्यावरील व्याज व फॅसिलिटीच्या संबंधात इतर सर्व रक्कम ही कार्ड सदस्याद्वारे त्वरित परतफेडयोग्य असेल. फॉरक्लोजर घेण्यासाठी आयसीआयसीआय बँकेच्या कस्टमर केअर सेंटरशी संपर्क साधून कार्ड सदस्य कोणत्याही वेळी फॅसिलिटी फॉरक्लोज करण्यात येऊ शकते. कार्ड सदस्य हा फॅसिलिटी मंजूर करण्याच्या वेळी कार्ड सदस्याला पाठवण्यात आलेल्या संपर्कव्यवहारामध्ये आयसीआयसीआय बँकद्वारे दर्शवण्यात आल्याप्रमाणे फोरक्लोजर प्रभाराचा भरणा करेल.

कार्ड सदस्याने सलग दोन महिने ईएमआयचा भरणा करण्यामध्ये डिफॉल्ट करण्याच्या बाबतीत, फॅसिलिटी, त्यावरील सर्व व्याज आणि फॅसिलिटीच्या संबंधातीतल इतर सर्व रक्कम यांची ताबोडतोब परतफेड करायची आहे आणि कार्ड सदस्याकडे मागणी केल्यावर तो अशा सर्व रकमेची परतफेड करण्यासाठी उत्तरदायी असेल.

फॅसिलिटी रद्द करणे:

कार्ड सदस्य हा आयसीआयसीआय बँकेच्या कस्टमर सेंटरशी संपर्क साधून, फॅसिलिटी मंजूर करण्याच्या 15 दिवसांच्या आत फॅसिलिटी रद्द करू शकेल. फॅसिलिटी रद्द करणे हे क्रेडिट कार्ड ऑपरेशन्स, आयसीआयसीआय बँक लि., सी विंग, ऑटम इस्टेट्स. चांदिवली फार्म रोड, चांदिवली. चांदिवली स्टुडिओच्या बाजूला, म्हाडा अंधेरी– पूर्व, मुंबई– 400072 येथे डिमांड ड्राफ्ट परत करणे व कार्ड सदस्याद्वारे किंवा लाभार्थीद्वारे डिमांड ड्राफ्टची वटवणी न करणे यांच्या सापेक्ष असेल.

XIV. सप्लिमेन्टरी कार्ड

प्रायमरी कार्ड सदस्याच्या कौटुंबिक सदस्याला (सदस्यांना) ॲड–ऑन कार्ड जारी करण्यासाठी प्रायमरी कार्ड सदस्याकडून विनंती प्राप्त झाल्यास, आयसीआयसीआय बँकेने वेळोवेळी ठरवलेल्या सदर अटी व शर्तींवर आयसीआयसीआय बँक आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार प्रायमरी कार्ड सदस्याच्या कौटुंबिक सदस्याला सप्लिमेन्टरी कार्ड जारी करेल.

सप्लिमेन्टरी कार्डाचा वापर करणे हे या अटी व शर्तींचा स्वीकार केल्याचे मानण्यात येईल. सप्लिमेन्टरी कार्डाचा धारक आणि, कार्ड जारी करण्यासाठी परवानगी देणारा प्रायमरी कार्ड सदस्य हे या अटी व शर्तींद्वारे/पेमेन्टसाठी संयुक्तपणे व वेगवेगळेपणे बद्ध/उत्तरदायी असतील, तथापि, सप्लिमेन्टरी कार्डच्या अंतर्गत देय व प्रदेय असणाऱ्या सर्व प्रभारांची खातरजमा करण्याची जबाबदारी प्रायमरी कार्ड सदस्याची असेल. सप्लिमेन्टरी कार्डाची फॅसिलिटी ही एक विशेष फॅसिलिटी असून ती आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी निर्धारित करण्यात आलेल्या सदर शुल्कासह/दरासह असेल, सप्लिमेन्टरी कार्ड सदस्याचे सदस्यत्व चालू राहणे हे प्रूणपणे प्रायमरी कार्ड सदस्याचे सदस्यत्व चालू राहण्यावर अवलंबून असेल.

XV. बिलिंग

सर्व कार्ड सदस्यांना कार्डाच्या वापराद्वारे उद्भवलेल्या सर्व प्रभारांसाठी आणि कार्ड खात्यावर लागू सर्व प्रभारांसाठी मासिक तत्त्वावर बिल आकारणी करण्यात येईल. आयसीआयसीआय बँक ही कार्ड सदस्याला विवरण पाठवण्यामध्ये कोणताही विलंब होऊ नये यासाठी प्रयत्न करेल. तथापि, मागील महिन्यामध्ये कार्ड खात्यावर कोणतीही शिल्लक नसण्याच्या किंवा त्यावर कोणताही व्यवहार न होण्याच्या बाबतीत, त्या कालावधीसाठी कोणतेही विवरण तयार होऊ शकणार नाही.

विवरण केवळ कार्ड सदस्याद्वारे हाताळण्यात येत असल्याची खातरजमा करण्यासाठी आयसीआयसीआय बँक सुयोग्य सुरक्षिततेसह विवरण ऑनलाइन प्रदान करण्याचा प्रयत्न करेल. कोणत्याही कारणास्तव, विवरण प्राप्त न होण्याच्या बाबतीत, विवरण पाठवण्यामध्ये आयसीआयसीआय बँकेने कोणताही विलंब न करण्याच्या बाबतीत, पेमेन्ट नियत तारखेपर्यंत त्याच्या ताब्यातील चार्ज स्लिप्सच्या प्रतींचा वापर करून परिगणित करण्यात आलेल्या सर्व देय रकमांची बेरीज किंवा आयसीआयसीआय बँकेच्या कस्टमर केअर सेंटरशी संपर्क साधून सदर रकमेची चौकशी करून कार्ड सदस्याने सदर रक्कम भरायची आहे.

XVI. इन्स्टंट मर्चन्ट आधारित इन्स्टॉलमेंट कार्यक्रमासाठी अटी

‘ईएमआय’ किंवा ‘समान मासिक हप्ता’ म्हणजे मुद्दल रक्कम, व्याज आणि/किंवा इतर प्रभार, लागू असल्याप्रमाणे, यांनी युक्त आयसीआयसीआय बँकेला कार्ड सदस्याने प्रदेय समान मासिक हप्त्याची रक्कम आहे.

'इन्स्टंट ईएमआय' हा कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँकेच्या ईडीसी (इलेक्ट्रॉनिक डेटा कॅप्चर) टर्मिनलच्या ठिकाणी आणि/किंवा अशा ऑनलाइन व्यवहारांसाठी, जेथे सदर रुपांतरण उपलब्ध आहे, कार्डाच्या वापराद्वारे केलेल्या व्यवहारांसाठी कार्ड सदस्याच्या विनंतींवरून रकमेचे ईएमआयमध्ये रुपांतरण करण्याच्या संदर्भात आहे. आयसीआयसीआय बँक ही आपल्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार, वैयक्तिक कार्ड सदस्याला, प्रभार उद्भवल्यावर लगेचच पेमेन्ट करण्यासाठी कार्ड सदस्याच्या आबंधनाबाबत कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय, क्रेडिट कार्डावर इन्स्टंट ईएमआयची सुविधा उपलब्ध करण्यास हक्कदार आहे, कार्ड सदस्य आयसीआयसीआय बँक कस्टमर केअर सेंटरद्वारे कळवण्यात आल्याप्रमाणे आणि कार्ड सदस्याला पाठवण्यात आलेल्या विवरणामध्ये दर्शवण्यात आल्याप्रमाणे ठरावीक खरेदींसाठी समान मासिक हप्त्यांचा (ईएमआयचा) पर्याय स्वीकारू शकतो, जे पुढील अटींच्या सापेक्ष असेल:

(i) एकदा का कार्ड सदस्याने इन्स्टंट ईएमआय्जद्वारे पेमेन्ट करण्याचा स्वीकार केल्यास, त्यानंतरचा कोणताही बदल हा खरेदीच्या स्वरुपानुसार आयसीआयसीआय बँकेद्वारे वेळोवेळी निश्चित करण्यात आल्याप्रमाणे पूर्वसमाप्ती प्रभार आकर्षित करेल. ईएमआयचे फॉरक्लोजर करण्यासाठी आयसीआयसीआय बँकेच्या कस्टमर केअर सेंटरशी संपर्क साधून कार्ड सदस्य कोणत्याही वेळी फॅसिलिटी (थकित रकमेचा पूर्वभरणा) बंद करू शकतो. थकित मुद्दल रकमेवर 3% इतके फॉरक्लोजर प्रभार अधिक पुढील महिन्याचे व्याज कार्ड खात्यावर आकारण्यात येईल. कार्ड सदस्याने फॅसिलिटीचा पूर्वभरणा पूर्ण करण्यासाठी आयसीआयसीआय बँकेच्या कस्टमर केअरशी संपर्क साधणे जरुरीचे आहे.;

(ii) बिल करण्यात आलेल्या आणि थकित प्रभारांचा कोणताही भाग हा इन्स्टंट ईएमआय्जमध्ये भरण्यास अनुमती नसल्यास आणि पेमेन्ट नियत तारखेला सदर भागाचा भरणा करण्यात न आल्यास, खंड VI मध्ये नमूद करण्यात आलेल्या दराने व स्वरुपात सदरवर व्याज, सेवा प्रभार आणि भरणा विलंब शुल्क आकारण्यात येईल.

(iii) क्रेडिट कार्डाच्या संबंधातील इन्स्टंट ईएमआय सुविधा ही सध्याच्या घडीला पुढील खरेदींनी युक्त हे, म्हणजेच., (ए) व्यापारी आस्थापनेच्या ठिकाणी नवीन खरेदी; (बी) आयसीआयसीआय बँक कस्टमर केअर सेंटरमार्फत व्यापारी आस्थापनेच्या ठिकाणी केलेल्या गत खरेदींचे रुपांतरण.

(iv) इन्स्टंट ईएमआय सुविधा ही आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार कार्ड सदस्याला उपलब्ध आहे आणि सदर सुविधा पुढीलसह उपलब्ध असेल:

    (ए) आयसीआयसीआय बँकेकडून ठरवण्यात येणाऱ्या सदर कालावधीसाठी आणि सदर व्यापारी आस्थापनांच्या ठिकाणी.

(बी) इन्स्टंट ईएमआय्जचा व्याज घटक हा आयसीआयसीआय बँकेद्वारे ठरवण्यात आल्याप्रमाणे कार्ड सदस्य व व्यापारी विशिष्ट असेल.

(सी) डाउन पेमेन्टची रक्कम, व्यवहार शुल्काची रक्कम, इन्स्टंट ईएमआय्जच्या पेमेन्टचा कालावधी आणि पेमेन्टचे इतर तपशील हे आयसीआयसीआय बँकेद्वारे ठरवण्यात आल्याप्रमाणे कार्ड सदस्य व व्यापारी विशिष्ट असतील. इन्स्टंट ईएमआयची ही सुविधा बिझनेस कार्ड, कॉरपोरेट कार्ड, ईएमआय कार्ड आणि अमेरिकन एक्स्प्रेस कार्ड यांवर उपलब्ध नाही.

XVII. ऑटो डेबिट सुविधा

कार्ड सदस्य हा कार्डावरील देय रकमेचा भरणा करण्यासाठी ऑटो डेबिट सुविधेचा वापर करू शकतो. ऑटो डेबिट सुविधा प्राप्त केल्यावर, कार्ड सदस्याला पाठवण्यात आलेल्या विवरणामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे पेमेन्ट नियत तारखेला, उपरोल्लिखित रकमेसाठी, कार्ड सदस्याच्या बँक खात्यावर डेबिट करण्यात येईल (ज्याचा तपशील आयसीआयसीआय बँकेला प्रदान करण्यात येईल). परंतु त्यासाठी, पेमेन्ट नियत तारीख ही कामकाजाची तारीख असायला हवी अन्यथा बँक खात्यावर पुढील कामकाजाच्या दिवशी डेबिट करण्यात येईल. पेमेन्ट नियत तारखेला सदर बँक खात्यामध्ये पुरेशी रक्कम नसण्याच्या बाबतीत, कार्ड सदस्य हा कार्डावरील देय रकमेसोबत लागू इतर सर्व प्रभार भरण्यासाठी उत्तरदायी असेल. कार्ड सदस्य हे मान्य करतो व पुष्टी करतो की ऑटो डेबिट सुविधा प्राप्त करण्यासाटी कार्ड सदस्याद्वारे आयसीआयसीआय बँकेला सादर करण्यात आलेला सर्व तपशील अचूक व पूर्ण असेल. अपूर्ण किंवा चुकीच्या माहितीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणासाठी ऑटो डेबिट व्यवहाराला विलंब झाल्यास किंवा तो प्रभावी न झाल्यास, त्याकरिता आयसीआयसीआय बँक उत्तरदायी असणार नाही. आयसीआयसीआय बँकेच्या नावे जारी करण्यात आलेल्या ऑटो डेबिट सूचनांबाबत कार्ड सदस्याच्या बँकेला कळवण्याचे आणि आयसीआयसीआय बँकेच्या पूर्व संमतीशिवाय सदर बँक खाते बंद न करण्याचे मान्य करतो व त्याची हमी देतो. अशा सूचना या आयसीआयसीआय बँकेच्या लिखित संमतीशिवाय मागे घेता येऊ शकत नाहीत/रद्द करता येऊ शकत नाहीत.

XVIII. परत आलेले पेमेन्ट्स

कार्ड सदस्याने दिलेल्या धनादेशाचा, इतर कोणत्याही पेमेन्ट संलेखाचा किंवा सूचनेचा, त्याच्या कार्डाच्या देय रकमेचे पेमेन्ट करण्याप्रती, आदर न झाल्यास, किंवा त्यावर प्रक्रिया होऊ शकत नसल्यामुळे कार्ड सदस्याला सदर संलेख परत करणे आवश्यक असल्यास, आयसीआयसीआय बँक ही कार्ड सदस्याविरोधात कायदेशीर कारवाई सुरू करण्याचा हक्क राखून ठेवते आणि आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार त्याबाबत शुल्क आकारू शकेल आणि कार्ड तात्पुरते/कायमस्वरुपी रद्द करू शकेल. कार्ड सदस्य हा आयसीआयसीआय बँकेद्वारे ठरवण्यात आल्याप्रमाणे धनादेश परत येण्यासंबंधी प्रभार आणि भरणा विलंब प्रभार किंवा इतर कोणतेही प्रभार प्रदान करण्यासाठी उत्तरदायीही असेल.

XIX. विवाद

पेमेन्टसाठी आयसीआयसीआय बँकेला प्राप्त झालेली कोणतीही चार्ज स्लिप, किंवा इतर पेमेन्टविषयक माहिती ही निर्णायक पुरावा असेल की सदर चार्ज स्लिपवर किंवा इतर रिक्विझिशनवर नोंद करण्यात आलेला प्रभार हा कार्ड सदस्याला योग्य प्रकारे उद्भवलेला होता, क्रेडिट कार्ड गहाळ झालेले नसल्यास, चोरीला गेलेला नसल्यास किंवा फसवणुकीने त्याचा गैरवापर करण्यात आलेला नसल्यास आणि सदरबाबत येथील खंड IX मध्ये नमूद केल्याप्रमाणे कळवण्यात आलेले आहे, त्यासाठीच्या पुराव्याची जबाबदारी कार्ड सदस्याची असेल. या खंडामध्ये संदर्भ देण्यात आलेले इतर पेमेन्ट रिक्विझिशन म्हणजे कार्डाच्या वापराद्वारे व्यापारी आस्थापनेच्या ठिकाणी कार्डधारकाला उद्भवलेल्या सर्व अनुज्ञेय खर्चांच्या संबंधातील कोणतीही किंवा सर्व पेमेन्ट्स समाविष्ट आहेत ज्याची प्रभार म्हणून नोंद करण्यात आलेली नाही. सदर चार्ज स्लिप्सवर कार्ड सदस्याने केलेली स्वाक्षरी तसेच त्यावर नोंद केलेला कार्ड क्रमांक हे कार्ड सदस्याला उद्भवलेल्या दायित्वाचा निर्णायक पुरावा असेल. आयसीआयसीआय बँक कस्टमर केअर सेंटर/इन्फिनिटी यामार्फत सुविधा प्राप्त करण्याच्या बाबतीत, एपीआयएन/पासवर्ड/यूजर आयडी यांचा वापर करून आयसीआयसीआय बँक कस्टमर केअर सेंटर/इन्फिनिटी अॅक्सेस करणे हा कार्ड सदस्याने व्यवहार प्रभावी केल्याचा निर्णायक पुरावा असेल. कार्ड सदस्याने खरेदी केलेल्या वस्तू व सेवा त्याला यथोचितरीत्या प्राप्त झालेल्या आहेत याची आयसीआयसीआय बँकेने खातरजमा करण्याची आवश्यकता नाही. विवरणामध्ये दर्शवण्यात आलेल्या प्रभाराबाबत कार्ड सदस्य सहमत नसण्याच्या बाबतीत, विवरण प्राप्त होण्याच्या 60 (साठ) दिवसांच्या आत सदर बाब आयसीआयसीआय बँकेला कळणे गरजेचे आहे, असे करण्यास असमर्थ ठरल्यास, विवरणामध्ये दर्शवलेले सर्व प्रभार योग्य असल्याचे मानण्यात येईल.

XX. सिक्युरिटी

सिक्युअर्ड क्रेडिट कार्डाच्या बाबतीत, कार्ड खात्यावरील थकित शिल्लक ही, सोबत व्याज व इतर सर्व खर्चासह कोणत्याही थकित कार्ड व्यवहाराची रक्कम, येथे याखाली उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे प्रभार, कार्ड सदस्याद्वारे क्रेडिट कार्डाच्या वापरादरम्यान कार्ड खात्यावर प्रभावी करण्यात आलेले परंतु अद्याप आकारण्यात न आलेले, आयसीआयसीआय बँकेद्वारे विहित केलेल्या स्वरुपामध्ये व पद्धतीमध्ये, एकट्या कार्ड सदस्याच्या नावे स्थित असणाऱ्या किंवा त्रयस्थ पक्षाच्या नावे स्थित असणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीसोबत किंवा सिक्युरिटीजसोबत संयुक्तपणे, आयसीआयसीआय बँकेद्वारे मंजूर करण्यात आल्याप्रमाणे सदर सिक्युरिटीजच्या/फिक्स्ड डिपॉझिटच्या/अशा इतर मालमत्तेच्या ताबेगहाणद्वारे/जंगमगहाणाद्वारे सुरक्षित करण्यात येईल. कार्ड सदस्य हा सिक्युरिटीच्या निर्मितीसाठी आयसीआयसीआय बँकेचे समाधान होईल अशा स्वरुपामध्ये व पद्धतीमध्ये सदर सर्व दस्तऐवजांची अंमलबजावणी करेल. सिक्युरिटीची निर्मिती करणे आणि इतर सर्व

औपचारिकता पूर्ण करणे, यामध्ये मुद्रांक शुल्क समाविष्ट परंतु तिथपर्यंतच मर्यादित नाही, याच्याशी संबंधित सर्व खर्च हे कार्ड सदस्याने करायचे आहेत.

XXI. संकलन (कलेक्शन्स)

आयसीआयसीआय बँक ही कार्ड सदस्याच्या संपूर्ण जोखमीद्वारे व खर्चाद्वारे, कार्ड सदस्याच्यी देय रक्कम गोळा करण्यासाठी आणि/किंवा कार्ड सदस्याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही सिक्युरिटीची अंमलबजावणी करण्यासाठी एक किंवा, अधिक व्यक्तींची सेवा घेऊ शकते, आणि आयसीआयसीआय बँकेला योग्य वाटेल त्याप्रमाणे आयसीआयसीआय बँक (अशा हेतूंसाठी) कार्ड सदस्याशी संबंधित सदर माहिती, तथ्ये व आकडे व सिक्युरिटी अशा व्यक्तीला (व्यक्तींना) सादर करू शकते. आयसीआयसीआय बँकेला योग्य वाटेल त्याप्रमाणे, ती यासंबंधातील, किंवा त्याच्याशी आनुषंगिक अशी सर्व कृत्ये, विलेख, प्रकरणे आणि गोष्टी पार पाडण्यासाठी व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी सदर व्यक्तीला (व्यक्तींना) हक्क व अधिकार सोपवूदेखील शकते.

XXII. वस्तू व सेवा यांचा दर्जा

आयसीआयसीआय बँक ही कार्ड सदस्याने व्यापारी आस्थापनांकडून खरेदी केलेल्या, किंवा घेतलेल्या मर्चन्डाइझ, मर्चन्डाइझ वॉरन्टी किंवा सेवा यांसाठी, यामध्ये कार्ड सदस्याला डिलिव्हरी विलंबाने मिळणे, डिलिव्हरी न मिळणे, वस्तू प्राप्त न होणे किंवा सदोष वस्तू प्राप्त होणे समाविष्ट, कोणत्याही प्रकारे, जबाबदार असणार नाही. हे स्पष्टपणे समजणे आवश्यक आहे की क्रेडिट कार्ड ही वस्तू खरेदी करण्यासाठी आणि/किंवा सेवा घेण्यासाठी कार्ड सदस्याला देण्यात येणारी एक सुविधा आहे, आयसीआयसीआय बँक ही मर्चन्डाइझची गुणवत्ता, डिलिव्हरी किंवा अन्यथा त्याविषयी कोणतीही हमी धारण करत नाही आणि कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही. कार्ड सदस्याने मर्चन्डाइझसंबंधी कोणत्याही विवादाचे किंवा दाव्याचे निवारण हे व्यापारी आस्थापनेसोबत करणे आवश्यक आहे. दावा किंवा विवाद असल्यामुळे कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँकेप्रती देय असणाऱ्या सर्व प्रभारांचा भरणा करण्यापासून त्याची मुक्तता होत नाही आणि कार्ड सदस्य सदर प्रभारांचा ताबोडतोब भरणा करण्याचे मान्य करतो.

XXIII. क्रेडिट व्यवहार

खरेदीसाठीचे डेबिट आणि वस्तू/सेवा रद्द करण्यासाठीचे तदनंतरचे क्रेडिट हे दोन स्वतंत्र व्यवहार आहेत. कोणत्याही अतिरिक्त प्रभारांची आकारणी होणे टाळण्यासाठी कार्ड सदस्याने विवरणामध्ये दिसून आल्याप्रमाणे खरेदीच्या व्यवहारासाठी भरणा करणे आवश्यक आहे. रद्द करण्यात आल्यावर, आयसीआयसीआय बँकेला सदरसाठी क्रेडिट प्राप्त झाल्यावरच, कार्ड खात्यामध्ये परतावा जमा करण्यात येईल (कॅन्सलेशन प्रभार वगळता). तथापि, कार्ड सदस्याने क्रेडिट चार्ज स्लिप यशस्वीपणे सादर केल्यावर, कार्ड खात्यावर क्रेडिट दाखल करण्यात येईल. रास्त वेळेमध्ये क्रेडिट हे कार्ड खात्यावर दाखल करण्यात न आल्यास, त्याबाबत कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँकेला त्वरित कळवणे आवश्यक आहे.

XXIV. विदेशांमध्ये प्रदान करण्यात आलेले प्रभार

कार्ड सदस्य हे घोषित करतो की त्याला जारी करण्यात आलेले क्रेडिट कार्ड हे विदेशामध्ये वापरण्यात आल्यास, असा वापर हा काटेकोरपणे आरबीआयने वेळोवेळी जारी केल्याप्रमाणे व सुधारणा केल्याप्रमाणे संबंधित चलन नियंत्रण नियमनांनुसार करायचा आहे. कार्ड सदस्याने आरबीआयच्या चलन नियंत्रण मार्गदर्शक निर्देशांप्रमाणे त्याला असणाऱ्या एन्टायटलमेन्ट्सचे (हक्कांचे) उल्लंघन केल्यास, कार्ड सदस्याने लिखित स्वरुपात त्याबाबत आयसीआयसीआय बँकेला त्वरित कळवायचे आहे. आरबीआयद्वारे निर्धारित करण्यात आल्याप्रमाणे उद्भवलेल्या अशा कोणत्याही प्रभारांच्या पुष्टीसाठी पारपत्राची आवश्यकता असल्यास, पासपोर्टची पुष्टी प्राप्त करण्याची जबाबदारी पूर्णतः कार्ड सदस्यावर असेल. आरबीआयद्वारे जारी करण्यात आलेल्या प्रचलित चलन नियंत्रण मार्गदर्शक निर्देशांचे अनुपालन करण्यामध्ये कार्ड सदस्याला कोणतेही अपयश येण्याच्या बाबतीत, तो विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम, 1999 अंतर्गत, वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे, कोणत्याही कारवाईसाठी उत्तरदायी असेल, आणि त्याला आयसीआयसीआय बँकद्वारे किंवा आरबीआयद्वारे कार्ड सुविधा घेण्यास मनाई करण्यात येईल. आयसीआयसीआय बँकेला कार्ड सदस्याने त्याच्या एन्टायटलमेन्ट्सचे (हक्कांचे) उल्लंघन केल्याचे लक्षात आल्यावर, वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आरबीआयच्या मार्गदर्शक निर्देशांद्वारे विहित केल्याप्रमाणे विदेशी चलन एन्टायटलमेन्ट्सचे उल्लंघन केल्यामुळे प्रभारामध्ये घट होण्याद्वारे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उद्भवलेल्या कोणत्याही हानीच्या किंवा नुकसानाच्या संबंधात आयसीआयसीआय बँकेचे कोणतेही दायित्व असणार नाही. भारतीय चलनाव्यतिरिक्त इतर चलनामध्ये व्यवहार करण्याच्या बाबतीत, व्यवहार हा भारतीय रुपयांमध्ये रुपांतरीत करण्यात येईल. रुपांतरण हे आयसीआयसीआय बँकेसोबत व्यवहाराची हिशेबपूर्ती होण्याच्या तारखेला पार पडेल, सदर तारीख ही कदाचित ज्या तारखेला व्यवहार करण्यात आलेला ती तारीख असणार नाही. व्यवहार यूएस डॉलर्समध्ये नसल्यास, आकारण्यात आलेली रक्कम यूएस डॉलर्समध्ये रुपांतरीत करून आणि नंतर यूएस डॉलरमधील रक्कम भारतीय रुपयांमध्ये रुपांतरीत करून, यूएस डॉलर्समार्फत रुपांतरण करण्यात येईल.

लागू कायद्यानुसार विशिष्ट दर आवश्यक नसेल तर, सदर व्यवहारांवर चलन रुपांतरण घटकाच्या मूल्यनिर्धारणाद्वारे वाढ करून, यूएस डॉलरमधून भारतीय रुपयामधील रुपांतरण दर हा हिशेबपूर्तीच्या तारखेला व्हिसा, मास्टरकार्ड व ॲमेक्स यांद्वारे देण्यात आलेल्या दरांप्रमाणे असेल.

XXV. आयसीआयसीआय बँक क्रेडिट कार्ड रिवॉर्ड्स

आयसीआयसीआय बँक ही कार्ड सदस्याला/सदस्यांना पुढील क्रेडिट कार्ड रिवॉर्ड पॉइंट स्कीम देऊ करेल:

1. 'आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स स्कीम' म्हणजे आयसीआयसीआय बँकेची रिवॉर्ड स्कीम असेल.

'आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड पॉइंट्स' हे आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स स्कीमअंतर्गत देण्यात आलेले रिवॉर्ड पॉइंट्स असतील.

2. 'हँड-पिक्ड रिवॉर्ड्स स्कीम' म्हणजे आयसीआयसीआय बँकेची प्रीमियम रिवॉर्ड स्कीम आहे. हँडपिक्ड रिवॉर्ड पॉइंट्स हे हँड-पिक्ड रिवॉर्ड्स स्कीमअंतर्गत देण्यात येणारे रिवॉर्ड पॉइंट्स असतील.

3. 'आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पॉवर्ड बाय पेबॅक' म्हणजे पेबॅकच्या सहयोगामध्ये आयसीआयसीआय बँकेची रिवॉर्ड स्कीम होय.

'पेबॅक पॉइंट्स' म्हणजे आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पावर्ड बाय पेबॅक अंतर्गत देण्यात येणारे रिवॉर्ड पॉइंट्स असतील.

'पेबॅक'चा संदर्भ एलएसआरपीएल या ब्रँड नावाच्या अंतर्गत असणाऱ्या रिवॉर्ड कार्यक्रमाशी आहे. 'एलएसआरपीएल' म्हणजे लॉयल्टी सोल्युशन्स अँड रिसर्च लिमिटेड, कंपनी अधिनियम, 1956 च्या अंतर्गत विधिसंस्थापित कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालय हे जे.एल.नेहरू रोड, वाकोला, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई 400055 येथे आहे (येथे यानंतर 'एलएसआरपीएल' म्हणून संबोधले जाते, याच्या अभिव्यक्तीमध्ये, त्याच्या विषयाशी किंवा संदर्भाशी प्रतिकूल नसेल तर, यामध्ये त्यांचे उत्तराधिकारी व अभिहस्तांकिती समाविष्ट आहेत); पेबॅक या ब्रँड नावाच्या अंतर्गत. 'पेबॅक कार्ड' म्हणजे आणि त्यामध्ये एलएसआरपीएलद्वारे नमूद अटी व शर्तींप्रमाणे पेबॅक पॉइंट्स रिडीम करण्यासाठी एलएसआरपीएलद्वारे जारी कार्ड समाविष्ट असेल.

'पेबॅक सदस्य' म्हणजे पेबॅक कार्ड धारण करणारी व पेबॅक वेबसाइटवर विहित केलेल्या स्वरुपामध्ये पेबॅकसोबत नोंदणीकृत असणारी व्यक्ती होय.

'पेबॅक सदस्यत्व डेटा' म्हणजे आयसीआयसीआय बँकेच्या क्रेडिट कार्डाशी संबंधित कार्ड सदस्याचा डेटा किंवा माहिती, म्हणजेच (i) नाव (ii) ईमेल अॅड्रेस (iii) मोबाइल क्रमांक (iv) जन्मदिनांक (v) पत्ता (vi) क्रेडिट कार्ड खाते क्रमांक.

'पेबॅक वेबसाइट' म्हणजे www.payback.in या यूआरएलवरील वेबसाइट.

'कसूरदार (डिलिक्वन्ट) खाते' म्हणजे असे कार्ड खाते ज्यामध्ये या अटी व शर्तींच्या अंतर्गत पेमेन्ट खंडामध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे पेमेन्ट करण्यात आलेले नाही.

'प्रभावी तारीख' म्हणजे आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पावर्ड बाय पेबॅक स्कीम (स्कीम्स) ज्या तारखेला सुरू होते ती तारीख, जी आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी कार्ड सदस्याला/कार्ड सदस्यांना कळवण्यात येईल. तथापि, कार्ड सदस्य हा पेबॅकच्या नोंदणी तारखेपासून आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पावर्ड बाय पेबॅक अंतर्गत लाभ प्राप्त करू शकतो.

‘स्कीम समाप्ती तारीख’ म्हणजे आयसीआयसीआय बँक तिच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार ज्या दिवशी आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स स्कीम (स्कीम्स) संपुष्टात आणते ती तारीख.

‘वैध प्रभार’ म्हणजे कार्डावरील वस्तूंच्या किंवा सेवांच्या खरेदीसाठी कार्ड सदस्याला उद्भवलेला प्रभार किंवा आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स स्कीमच्या समावेशाच्या हेतूसाठी आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी समाविष्ट करण्यात आलेला इतर कोणताही प्रभार.

आयसीआयसीआय बँकेकडून देऊ करण्यात आलेल्या कोणत्याही प्रमोशनल स्कीमच्या कालावधीदरम्यान किंवा त्यानंतर, कार्डाचा वापर मागे घेण्यात आल्यास, रद्द करण्यात आल्यास, किंवा रद्द करण्यासाठी पात्र असल्यास, किंवा कार्ड खात्याला कसूरदार (डिलिक्विन्ट) खाते म्हणून संबोधण्यात आल्यास, त्यानंतर प्रमोशनल कालावधीदरम्यान देऊ करण्यात आलेली कोणतीही ऑफर/लाभ हे, यामध्ये गिफ्ट/सवलती/कॅश–बॅक समाविष्ट परंतु तिथपर्यंतच मर्यादित नाही, कार्ड सदस्यासाठी वस्तुतः आणि स्वयंचलितपणे रद्द होईल.

‘ॲनिव्हर्सरी वर्ष’ म्हणजे कार्ड जारी करण्यात आल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांचा कालावधी आणि त्यानंतरचा दर बारा–महिन्यांचा कालावधी.

1. आयसीआयसीआय बँकेच्या रिवॉर्ड्स स्कीमला लागू अटी व शर्ती:

- आयसीआयसीआय बँकेची रिवॉर्ड्स स्कीम ही प्रभावी तारखेपासून परिणामकारक होईल आणि प्रभावी तारखेला किंवा त्यानंतर, कार्ड सदस्याने/सदस्यांनी धारण केलेल्या निवडक आयसीआयसीआय बँक क्रेडिट कार्डांवर ती उपलब्ध असेल.
- आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स स्कीमअंतर्गत, आयसीआयसीआय बँक ही निवडक आयसीआयसीआय बँक क्रेडिट कार्डांवर कार्ड सदस्याला उद्भवलेल्या वैध प्रभारांसाठी आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पॉइंट्स प्रदान करेल.
- आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड पॉइंट्स अर्निंग सिस्टम ही रिवॉर्ड्स प्रदान करण्यासाठी ॲनिव्हर्सरी वर्षाचे पालन करेल.
- आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स स्कीमअंतर्गत मिळालेले आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड पॉइंट्स हे कार्ड सदस्याला पाठवण्यात आलेल्या मासिक विवरणामध्ये निर्देशित करण्यात येतील.
- कार्ड सदस्याने जमा केलेले त्याचे/तिचे आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड पॉइंट्स हे आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या रिडेम्प्शन (विमोचन) ऑफर्सकरिता रिडीम करता येऊ शकतील.

- आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड पॉइंट्सचे रिडेम्प्शन केल्यावर, असे रिडीम करण्यात आलेले आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड पॉइंट्स हे कार्ड खात्यामध्ये जमा झालेल्या आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड पॉइंट्समधून स्वयंचलितपणे कमी होतील किंवा डेबिट होतील.
- स्कीम समाप्ती तारखेपूर्वी कोणत्याही वेळी निवडक क्रेडिट कार्डाचा वापर मागे घेण्यात आल्यास, किंवा रद्द करण्यात आल्यास, किंवा रद्द करण्यासाठी पात्र असल्यास, किंवा कार्ड खाते कसूरदार खाते म्हणून संबोधित करण्यात आल्यास, कार्ड सदस्याकडे त्यावेळी जमा असणारे सर्व आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड पॉइंट्स हे वस्तुतः लगेचच व स्वयंचलितपणे रद्द होतील.
- कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँकेसोबतचे त्याचे/तिचे सदस्यत्व पुनःस्थापित केले, तरीही सदर रद्द झालेले आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड पॉइंट्स हे खात्यावर जमा करण्यात येणार नाहीत.
- स्कीम समाप्ती तारखेला, कार्ड सदस्याकडे जमा असलेले आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड पॉइंट्स जे निर्धारित कालावधीमध्ये रिडीम करण्यात आलेले नाहीत, ते रिवॉर्ड पॉइंट्स स्वयंचलितपणे रद्द होतील.

2. हँड-पिक्ड रिवॉर्ड्स स्कीमसाठी लागू अटी व शर्ती:

- हँड-पिक्ड रिवॉर्ड्स स्कीम्स या प्रभावी तारखेपासून परिणामकारक होतील आणि प्रभावी तारखेला किंवा त्यानंतर, कार्ड सदस्याने/सदस्यांनी धारण केलेल्या निवडक क्रेडिट कार्डांवर उपलब्ध असतील.
- हँड-पिक्ड रिवॉर्ड्स स्कीमअंतर्गत, आयसीआयसीआय बँकेला निवडक आयसीआयसीआय बँक क्रेडिट कार्डांवर कार्ड सदस्याला उद्भवलेल्या वैध प्रभारांसाठी हँड-पिक्ड रिवॉर्ड पॉइंट्स देण्यात येतील.
- हँड-पिक्ड रिवॉर्ड पॉइंट्स अर्निंग सिस्टम ही रिवॉर्ड्स प्रदान करण्यासाठी ॲनिव्हर्सरी वर्षाचे पालन करेल.
- हँड-पिक्ड रिवॉर्ड्स स्कीमअंतर्गत मिळालेले हँड-पिक्ड रिवॉर्ड पॉइंट्स हे कार्ड सदस्याला पाठवण्यात आलेल्या मासिक विवरणामध्ये निर्देशित करण्यात येतील.
- कार्ड सदस्याने जमा केलेले त्याचे/तिचे हँड-पिक्ड रिवॉर्ड पॉइंट्स हे आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या रिडेम्प्शन (विमोचन) ऑफर्सकरिता, ज्या आयसीआयसीआय बँकेच्या www.icicibank.com या वेबसाइटवर उपलब्ध हँड-पिक्ड रिवॉर्ड्स कॅटलॉगमध्ये उपलब्ध आहेत, रिडीम करता येऊ शकतील.
- हँड-पिक्ड रिवॉर्ड पॉइंट्सचे रिडेम्प्शन केल्यावर, असे रिडीम करण्यात आलेले हँड-पिक्ड रिवॉर्ड पॉइंट्स हे कार्ड खात्यामध्ये जमा झालेल्या हँड-पिक्ड रिवॉर्ड पॉइंट्समधून स्वयंचलितपणे कमी होतील किंवा डेबिट होतील.

- स्कीम समाप्ती तारखेपूर्वी कोणत्याही वेळी निवडक क्रेडिट कार्डाचा वापर मागे घेण्यात आल्यास, किंवा रद्द करण्यात आल्यास, किंवा रद्द करण्यासाठी पात्र असल्यास, किंवा कार्ड खाते कसूरदार खाते म्हणून संबोधित करण्यात आल्यास, कार्ड सदस्याकडे त्यावेळी जमा असणारे सर्व हँड–पिक्ड रिवॉर्ड पॉइंट्स हे वस्तुतः लगेचच व स्वयंचलितपणे रद्द होतील.
- कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँकेसोबतचे त्याचे/तिचे सदस्यत्व पुनःस्थापित केले, तरीही सदर रद्द झालेले हँड–पिक्ड रिवॉर्ड पॉइंट्स हे खात्यावर जमा करण्यात येणार नाहीत.

स्कीम समाप्ती तारखेला, कार्ड सदस्याकडे जमा असलेले हँड–पिक्ड रिवॉर्ड पॉइंट्स जे निर्धारित कालावधीमध्ये रिडीम करण्यात आलेले नाहीत, ते रिवॉर्ड पॉइंट्स स्वयंचलितपणे रद्द होतील.

1. आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पावर्ड बाय पेबॅक याकरिता लागू अटी व शर्ती:

आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पावर्ड बाय पेबॅक ही प्रभावी तारखेपासून परिणामकारक होईल आणि प्रभावी तारखेला किंवा त्यानंतर, कार्ड सदस्याने/सदस्यांनी धारण केलेल्या निवडक आयसीआयसीआय बँकेच्या क्रेडिट कार्डांवर ती उपलब्ध असेल.

पेबॅक खाते अद्ययावत करण्यासाठी आणि आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पावर्ड बाय पेबॅकच्या संबंधात कार्ड सदस्याला/सदस्यांना सेवा व लाभ प्रदान करण्यासाठी पेबॅक सदस्यत्व माहितीची देवाणघेवाण एलएसआरपीएल व त्यांचे सहयोगी यांच्यासोबत करण्यात येईल.

- आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पावर्ड बाय पेबॅक अंतर्गत, आयसीआयसीआय बँक ही निवडक आयसीआयसीआय बँक क्रेडिट कार्डांवर कार्ड सदस्याला उद्भवलेल्या वैध प्रभारांसाठी पेबॅक पॉइंट्स प्रदान करेल.
- आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पावर्ड बाय पेबॅक अंतर्गत मिळालेले पेबॅक पॉइंट्स हे कार्ड सदस्याला पाठवण्यात आलेल्या मासिक विवरणामध्ये निर्देशित करण्यात येतील.
- प्रत्येक देयक आवर्तनाच्या अखेरीस, अशा गत देयक आवर्तनासाठी वैध व्यवहारांवर कार्ज सदस्यांने मिळवलेले पेबॅक पॉइंट्स हे आयसीआयसीआय बँकेद्वारे कार्ड खात्यामधून कार्ड सदस्याच्या पेबॅक खात्यामध्ये हस्तांतरीत करण्यात येतील.
- कार्ड सदस्य हा/हे पेबॅक सदस्य झाल्यावर आणि पेबॅक रिवॉर्ड कॅटलॉगमध्ये उपलब्ध वस्तूकरिता (वस्तूंकरिता) पेबॅक कार्डाचा वापर करून त्याचे पेबॅक पॉइंट्स रिडीम करू शकेल. सदरचा तपशील पेबॅक सदस्याला/सदस्यांना एलएसआरपीएलद्वारे कळवण्यात येऊ शकेल किंवा सदरच्या अधिक तपशीलासाठी व पेबॅक सदस्य बनण्यासाठी, कार्ड सदस्य हा पेबॅक वेबसाइटला भेट देऊ शकतो. पेबॅक पॉइंट्सचे रिडेम्प्शन केल्यावर, असे रिडीम करण्यात

आलेले पेबॅक पॉइंट्स हे पेबॅक खात्यामध्ये जमा झालेल्या पेबॅक पॉइंट्समधून स्वयंचलितपणे कमी होतील किंवा डेबिट होतील.

- स्कीम समाप्ती तारखेपूर्वी कोणत्याही वेळी निवडक क्रेडिट कार्डाचा वापर मागे घेण्यात आल्यास, किंवा रद्द करण्यात आल्यास, किंवा रद्द करण्यासाठी पात्र असल्यास, किंवा कार्ड खाते कसूरदार खाते म्हणून संबोधित करण्यात आल्यास, कार्ड सदस्याकडे त्यावेळी जमा असणारे सर्व पेबॅक पॉइंट्स हे वस्तुतः लगेचच व स्वयंचलितपणे रद्द होतील.
- जरी कार्ड सदस्याने आयसीआयसीआय बँकेसोबतचे त्याचे/तिचे सदस्यत्व पुनःस्थापित केले, तरीही सदर रद्द झालेले पेबॅक पॉइंट्स कार्ड खात्यावर जमा होणार नाहीत.फ

स्कीम समाप्ती तारखेला, कार्ड सदस्याकडे जमा असलेले पेबॅक पॉइंट्स जे निर्धारित कालावधीमध्ये रिडीम करण्यात आलेले नाहीत, ते पेबॅक पॉइंट्स स्वयंचलितपणे रद्द होतील. तसेच, पेबॅकच्या वेबसाइटवर वेळोवेळी दिलेल्या अटी व शर्तींमध्ये पेबॅकने निश्चित केल्याप्रमाणे निर्धारित वेळेमध्ये पेबॅक पॉइंट्स रिडीम करण्यात न आल्यास, ते संपुष्टात येऊ शकतात आणि वापरासाठी अनुपलब्ध होऊ शकतात.

- स्कीम समाप्ती तारखेच्या समाप्तीला किंवा स्कीम समाप्ती तारखेपूर्वी कोणत्याही वेळी, निवडक क्रेडिट कार्डाचा वापर मागे घेण्यात आल्यास, किंवा रद्द करण्यात आल्यास, किंवा रद्द करण्यासाठी पात्र असल्यास, किंवा कार्ड खाते हे कसूरदार खाते असल्याचे संबोधित करण्यात आल्यास, कार्ड सदस्य हा पेबॅक सदस्य असणे चालू राहील आणि पेबॅक खात्यामधून पेबॅक सदस्यत्व माहिती काढून टाकण्यात येणार नाही.
- आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पावर्ड बाय पेबॅकअंतर्गत, येथे उल्लेख करण्यात आलेल्या अटी व शर्तींखेरीज, कार्ड सदस्याचे पेबॅक पॉइंट रिडेम्प्शनसाठी एलएसआरपीएलच्या अटींद्वारेही नियमन होईल. कृपया अधिक तपशीलासाठी www.payback.in ला भेट द्या. येथे विहित करण्यात आलेल्या अटी व पेबॅक वेबसाइटवर उपलब्ध अटी यांच्यामध्ये कोणताही विरोधाभास असण्याच्या बाबतीत, पेबॅक वेबसाइटवर उपलब्ध अटी अभिभावी राहतील. आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पावर्ड बाय पेबॅकशी संबंधित, कोणतेही विवाद हे, जर असल्यास, कोणत्याही स्वरुपामध्ये आयसीआयसीआय बँकेच्या कोणत्याही संदर्भाशिवाय किंवा तिच्याकडे मदतीसाठी धाव न घेता, कार्ड सदस्याद्वारे एलएसआरपीएलसोबत त्याचे थेटपणे निवारण करायचे आहे आणि आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पावर्ड बाय पेबॅकअंतर्गत कार्ड सदस्य व एलएसआरपीएल यांच्यामधील अशा कोणत्याही विवादासाठी आयसीआयसीआय बँक उत्तरदायी असणार नाही.
- पुढील अटी व शर्ती या आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स स्कीम, हँडपिक्ड रिवॉर्ड्स स्कीम तसेच आयसीआयसीआय बँक रिवॉर्ड्स पावर्ड बाय पेबॅक (येथे यानंतर एकत्रितपणे स्कीम्स आणि स्वतंत्रपणे संबंधित

स्कीम असे संबोधण्यात येते) यांना लागू असतील. संबंधित स्कीमच्या प्रभावी तारखेला कसूरदार झालेल्या किंवा तदनंतर स्कीम्सच्या कालावधीदरम्यान कसूरदार झालेल्या कोणत्याही कार्ड खात्यांच्या कार्ड सदस्यांनी स्कीम्स लागू असणार नाहीत.

आयसीआयसीआय बँक आपल्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार कार्ड सदस्याला/सदस्यांना अतिरिक्त रिवॉर्ड पॉइंट्स प्रदान करू शकते. स्कीम्सअंतर्गत आयसीआयसीआय बँकेद्वारे करण्यात येणारी रिवॉर्ड पॉइंट्सची मोजणी ही अंतिम, निर्णायक व कार्ड सदस्यावर बंधनकारक असेल आणि ती कोणत्याही विवादासाठी पात्र असणार नाही. शासनाला किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाला किंवा कायद्याद्वारे स्थापित मंडळाला (मध्यवर्ती, राज्य किंवा स्थानिक) प्रदेय असणारा कोणताही कर किंवा कोणतीही दायित्वे किंवा प्रभार हे, जे संबंधित स्कीमअंतर्गत रिवॉर्ड पॉइंट्सच्या रिडेम्प्शनद्वारे कार्ड सदस्याला उद्भवू शकतील किंवा उपार्जित होऊ शकतील, पुर्वोक्तप्रमाणे, पूर्णतः कार्ड सदस्याची जबाबदारी असतील. वस्तू/सेवा यांच्या आर्थिक मूल्यावर, स्रोतावरील कर वजावट (टीडीएस), जर असल्यास, कार्ड सदस्याद्वारे प्रदेय असेल.

येथे समाविष्ट कोणत्याही बाबीला स्कीम समाप्ती तारखेनंतर स्कीम चालू ठेवण्यासाठी किंवा समान स्वरुपाच्या किंवा नव्या स्कीमद्वारे आधीच्या स्कीम्सची जागा घेण्यासाठी आयसीआयसीआय बँकेवरील किंवा पेबॅकवरील आबंधन मानण्यात येणार नाही.

- रिवॉर्ड पॉइंट्सचे रिडेम्प्शन हे ऐच्छिक आहे आणि सर्व संबंधित प्रभार हे क्रेडिट कार्डाच्या वापराच्या सामान्य कार्यामध्ये कार्ड सदस्याद्वारे ऐच्छिकपणे उद्भवल्याचे मानण्यात येते.
- कार्ड सदस्य हा क्रेडिट कार्ड वापराच्या सामान्य कार्यामध्ये, कार्ड सदस्याला उद्भवलेल्या कोणत्याही कृती, दावे, मागण्या, दायित्वे, हानी, मागण्या, परिव्यय, शुल्क किंवा खर्च यांसाठी आयसीआयसीआय बँकेला जबाबदार धरणार नाही.
- आयसीआयसीआय बँकेद्वारे प्रेरित, कार्ड खाते समाप्त करणे किंवा कार्ड संपुष्टात आणणे/रद्द करणे किंवा संबंधित स्कीम संपुष्टात आणणे/रद्द करणे अशा बाबतीत संबंधित स्कीम्सअंतर्गत कार्ड सदस्याने कमावलेले रिवॉर्ड पॉइंट्स रद्द करण्याचा हक्क आयसीआयसीआय बँक राखून ठेवत आहे.
- आयसीआयसीआय बँक कार्ड सदस्याला कोणत्याही वेळी व कोणतीही पूर्व सूचना न देता, आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी सादर करण्यात आलेल्या स्कीम्स किंवा इतर कोणतीही रिवॉर्ड पॉइंट स्कीम यांच्या सर्व किंवा काही भागांमध्ये भर घालण्यासाठी, फेरफार, सुधारणा करण्यासाठी किंवा कमी–अधिक करण्यासाठी किंवा सदर स्कीम्स पूर्णतः मागे घेण्यासाठीचा हक्क स्पष्टपणे राखून ठेवत आहे. कार्ड सदस्य याची नोंद घेऊ शकतात की कार्ड पॉइंट्स उपार्जित होणे हे आयसीआयसीआय बँकेच्या विविध क्रेडिट कार्डांनुसार कमी–अधिक असेल आणि

आयसीआयसीआय बँकेने अन्यथा सूचित केले नसेल तर, संबंधित क्रेडिट कार्ड संपर्कव्यवहारांमध्ये त्याचा उल्लेख करण्यात येईल.

- केवळ प्रायमरी कार्ड सदस्याकडून रिवॉर्ड पॉइंट रिडेम्प्शनची करण्यात आलेली विनंती, येथील अटी व शर्तींप्रमाणे, विचारात घेण्यात येईल. कार्ड सदस्य रिटेल व्यवहारासाठी रिवॉर्ड पॉइंट/पॉइंट्स प्राप्त करेल. तथापि कार्ड सदस्य हा तदनंतर प्रत्यावर्तित झालेल्या रिटेल व्यवहारांवर रिवॉर्ड पॉइंट्स प्राप्त करण्यासाठी हक्कदार असणार नाही.
- आयसीआयसीआय बँक, आपल्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार, एकतर विशिष्ट कालावधीसाठी किंवा प्रमोशनल स्कीमसाठी/स्कीम्ससाठी किंवा विशिष्ट प्रोमोजसाठी/स्कीम्समाठी इतर कोणत्याही रिटेल व्यवहारावर/व्यवहारांवर बोनस रिवॉर्ड पॉइंट्स प्रदान करू शकते.
- पात्र प्रायमरी, सप्लिमेन्टरी किंवा मल्टिपल कार्डांच्या बाबतीत स्वतंत्र कार्ड खात्यामध्ये रिवॉर्ड पॉइंट्स उपार्जित होतील. सप्लिमेन्टरी कार्डावर आणि/किंवा कोणत्याही मल्टिपल कार्डावर (कार्डांवर) करण्यात आलेल्या रिटेल व्यवहारावर/व्यवहारांवर, जर असल्यास, प्रायमरी कार्ड सदस्याच्या कार्ड खात्यावर स्वयंचलितपणे रिवॉर्ड पॉइंट्स उपार्जित होतील.
- कॅश विड्रॉअल ॲडव्हान्सेस किंवा कार्डावर लागू असणारे इतर कोणत्याही प्रकारचे शुल्क/प्रभार, उदा. कोणतेही जॉइनिंग शुल्क, वार्षिक शुल्क, सप्लिमेन्टरी कार्ड शुल्क, मल्टिपल कार्ड शुल्क, शिल्लक हस्तांतरण शुल्क, ईएमआय व्यवहार, कॅश ॲडव्हान्स शुल्क, आदर न झालेल्या धनादेशांसाठी प्रभार, वित्तीय प्रभार, कसूर प्रभार, भरणा विलंब प्रभार, सेवा प्रभार आणि आयसीआयसीआय बँकेकडून वेळोवेळी आकारण्यात येणारे इतर कोणतेही शुल्क/प्रभार इत्यादी समाविष्ट परंतु तिथपर्यंतच मर्यादित नाही, यांचा समावेश असणाऱ्या व्यवहारांप्रती कार्ड सदस्य रिवॉर्ड पॉइंट्स मिळवण्यासाठी पात्र असणार नाही.
- प्रायमरी कार्ड सदस्याने एकदा का रिडेम्प्शनचा पर्याय वापरल्यावर, कोणत्याही कार्ड सदस्याच्या सांगण्यावरून तो रद्द होऊ शकणार नाही/मागे घेता येऊ शकणार नाही/त्यामध्ये बदल होऊ शकणार नाही.
- एकतर आयसीआयसीआय बँकेने देऊ केलेल्या किंवा मर्चन्ट पार्टनर/सहभागी पार्टनर यांच्यासोबतच्या आयसीआयसीआय बँकेच्या टाय अपद्वारे देऊ केलेल्या किंवा इतर कोणत्याही पार्टनरच्या लॉयल्टी प्रोग्रॅमद्वारे देऊ करण्यात आलेल्या कोणत्याही विशिष्ट स्कीमअंतर्गत/प्रमोशनल ऑफरअंतर्गत विनिमय केलेले रिवॉर्ड पॉइंट्स हे तदनंतर कार्ड खात्यामध्ये परत हस्तांतरीत करता येऊ शकत नाहीत किंवा कार्ड सदस्याच्या सांगण्यावरून रद्द होऊ शकत नाहीत, आयसीआयसीआय बँक ही कोणत्याही मर्चन्ट पार्टनर/सहभागी पार्टनरच्या कार्यक्रमाप्रती

किंवा अन्यथा जेथे रिवॉर्ड पॉइंट्सचे असे रुपांतरण/हस्तांतरण लागू आहे त्या ठिकाणी रुपांतरीत/हस्तांतरीत झालेल्या रिवॉर्ड पॉइंट्सची कोणतीही जबाबदारी स्वीकारत नाही.

- रिडेम्प्शन कॅटलॉगमध्ये देऊ करण्यात येणाऱ्या उत्पादनांची निवड करणे, उत्पादन समाविष्ट करणे किंवा ते काढून टाकणे हे आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयावर अवलंबून असेल आणि ते कोणत्याही सूचनेशिवाय बदलाच्या अधीन आहे.
- रिडेम्प्शन कॅटलॉगमधील किंवा संबंधित वेब पेजेसमधील वस्तू/सेवा यांची सर्व व्हिज्युअल्स ही केवळ सूचक आहेत. कार्ड सदस्याला देऊ करण्यात येणाऱ्या उत्पादनांच्या बाबतीत, मॅन्युफॅक्चररच्या उत्पादनाच्या पुरवठादाराने उत्पादन मागे घेतल्यास, ते रद्द केल्यास, त्यामध्ये सुधारणा केल्यास किंवा बदल केल्यास, त्यासाठी आयसीआयसीआय बँक जबाबदार असणार नाही.
- रिडेम्प्शनसाठी उपलब्ध सर्व उत्पादने/व्हाउचर्स/सेवा हे सदर उपलब्ध असण्याच्या आणि रिडेम्प्शनच्या वेळी मॅन्युफॅक्चररच्या वॉरन्टीजच्या/निर्बंधांच्या सापेक्ष आहे.
- आयसीआयसीआय बँक ही उत्पादनांची/व्हाउचर्सची/सेवांची गुणवत्ता, उपयुक्तता आणि योग्यता यांविषयी कोणतीही हमी देत नाही आणि कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही आणि सदर हे कोणत्याही प्रकारे सदोष असल्याचे आढळल्यास, आयसीआयसीआय बँक त्यासाठी जबाबदार असणार नाही. वस्तूंची डिलिव्हरी 10 कार्यकारी दिवसाच्या आत होण्यासाठी आयसीआयसीआय बँक प्रयत्न करेल. असे असले तरीही, वस्तूंच्या डिलिव्हरीच्या बाबतीत कोणताही विलंब झाल्यास किंवा हानी झाल्यास, त्यासाठी आयसीआयसीआय बँक उत्तरदायी असणार नाही. कार्ड सदस्याने कमावलेल्या रिवॉर्ड पॉइंट्सना कोणतेही रोख किंवा आर्थिक मूल्य असणार नाही आणि रोख रकमेसाठी त्यांचा विनिमय करता येऊ शकणार नाही.

  कोणत्याही स्वरुपाच्या कोणत्याही कारणास्तव, जेथे प्रतिबंधित असेल तेथे आणि/किंवा ज्यांच्यासाठी स्कीम्स देऊ करता येऊ शकत नाही अशा मर्चन्डाइझवर/उत्पादनांवर/सेवांवर स्कीम्स उपलब्ध असणार नाही.
- रिडेम्प्शन कॅटलॉगमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या वस्तू/सेवा हस्तांतरणीय नाहीत व त्यांचे रोखीकरण करता येणार नाही.
- आयसीआयसीआय बँक ही कोणतीही कारणे न देता किंवा कार्ड सदस्याला कोणत्याही प्रकारे कोणतीही पूर्वसूचना न देता स्कीम्ससाठी लागू सर्व किंवा कोणत्याही अटी व शर्तींमध्ये सुधारणा करण्याचा/बदल करण्याचा हक्क राखून ठेवत आहे.

आयसीआयसीआय बँक ही कोणतीही कारणे न देता किंवा कोणतीही पूर्वसूचना न देता स्कीम खंडित करण्याचा हक्कदेखील राखून ठेवत आहे. येथे समाविष्ट कोणतीही बाब स्कीम्स चालू ठेवण्यासाठी आयसीआयसीआय बँकेची बांधिलकी किंवा प्रतिनिधित्व दर्शवत नाही.

स्कीम्सअंतर्गत कार्ड सदस्याला देऊ करण्यात येणाऱ्या उत्पादनांच्या/सेवांच्या/रिवॉर्ड्सच्या संबंधातील संपर्कव्यवहार/नोटीस हे कार्ड सदस्याला सदर उत्पादनांची/सेवांची/रिवॉर्ड्सची डिलिव्हरी करण्याच्या 10 दिवसांच्या आतच विचारात घेण्यात येईल. 10 दिवसांनंतर करण्यात आलेला कोणताही दावा आयसीआयसीआय बँकेद्वारे विचारात घेण्यात येणार नाही. उत्पादने/सेवा/रिवॉर्ड्स यांसंबंधातील, विवादाची उपस्थिती, जर असल्यास, आयसीआयसीआय बँकेविरोधात दावा स्थापित करणार नाही.

- उत्पादने/सेवा/रिवॉर्ड्स यांच्या डिलिव्हरीच्या स्थितीचा डिलिव्हरीपश्चात 30 दिवसांपर्यंतच मागोवा घेता येऊ शकतो. डिलिव्हरी स्थितीसाठी तदनंतरचा कोणताही संपर्कव्यवहार विचारात घेण्यात येणार नाही.
- अटी व शर्ती या प्राथमिक अटी व शर्तींसोबत असतील आणि त्यांच्या जागी/त्यांना कमीपणा आणणाऱ्या नसतील.

येथे काहीही अंतर्भूत केलेले असले तरीही, स्कीम्सच्या परिणामासह किंवा स्कीम्सच्या परिणामी, त्यामुळे किंवा त्यासंबंधात विवाद उद्भवल्यास, जर असल्यास, ते मुंबईच्या सक्षम न्यायालयांच्या विशेष क्षेत्राधिकारांच्या अधीन असतील.

XXVI. प्रकटने

कार्ड सदस्य हा आयसीआयसीआय बँक, तिच्या समूह कंपन्या यांना त्याच्या/तिच्या आवेदनाशी संबंधित सर्व माहिती, डेटा किंवा दस्तऐवज यांची इतर आयसीआयसीआय समूह कंपन्या/बँका/वित्तीय संस्था/क्रेडिट ब्युरोज/एजन्सीज/वित्तीय संस्था/सांविधिक मंडळे/कर प्राधिकरणे/सेंट्रल इन्फॉर्मेशन ब्युरोज यांच्यासोबत विनिमय, देवाणघेवाण करण्यासाठी किंवा ते देऊन टाकण्यासाठी/आयसीआयसीआय बँकेला/तिच्या समूह कंपन्यांना गरजेचे व आवश्यक वाटेल त्याप्रमाणे सदर व्यक्तीद्वारे/व्यक्तींद्वारे सदर माहितीचा/डेटाचा वापर करण्यासाठी किंवा त्यावर प्रकिया करण्यासाठी अशा इतर व्यक्तींना किंवा अशा व्यक्तींसोबत नोंदणीकृत असणाऱ्या इतर बँका/वित्तीय संस्था/क्रेडिट प्रदाते/युझर्स यांना प्रकियायुक्त माहिती/डेटा/प्रोडक्ट्स सादर करण्यासाठी हमी देतो व प्राधिकृत करतो. कार्ड सदस्याने कोणतेही वित्तीय साहाय्य/सुविधा/वित्तीय/क्रेडिट सुविधा किंवा त्यावरील व्याज/प्रभार यांच्या पेमेन्टमध्ये किंवा परतफेडीमध्ये डिफॉल्ट करण्याच्या बाबतीत, आयसीआयसीआय बँकेकडे आणि/किंवा तिच्या संबंधात, कार्ड सदस्याचे नाव आणि/किंवा त्याचे संचालक/पार्टनर्स/सप्लिमेन्टरी कार्डधारक यांचे नाव व डिफॉल्टचा तपशील, लागू असल्याप्रमाणे, आयसीआयसीआय बँक व आरबीआय यांच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयाने त्यांना योग्य वाटेल त्या पद्धतीने व माध्यमाद्वारे डिफॉल्टर्स म्हणून उघड करण्याचा किंवा सादर करण्याचा बिनशर्त हक्क आहे.

आयसीआयसीआय बँक ही क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपनी (नियमने), अधिनियम, 2005 च्या परिभाषेमध्ये विवरणांद्वारे क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्युरोला (आरबीआयद्वारे विशेषरीत्या प्राधिकृत करण्यात आलेल्या) कार्ड सदस्याचा क्रेडिट इतिहास/रिपेमेन्ट रेकॉर्ड आणि/किंवा कार्ड सदस्याच्या देय स्थितीपश्चातचे दिवस याबाबतची माहिती उघड करेल.

क्रेडिट कार्डासाठी अर्जाची स्वीकृती ही कार्ड सदस्याच्या क्रेडिट योग्यतेबाबत कोणत्याही प्रतिकूल अहवालांच्या आधारावर आहे. आयसीआयसीआय बँक ही कार्ड खात्यामध्ये कोणतीही कसूर होणे किंवा कार्डाद्वारे अथवा अन्यथा कार्ड सदस्याची क्रेडिट सुविधा मागे घेणे यांबाबत आयसीआयसीआय बँक इतर बँकांना किंवा वित्तीय संस्थांना त्याबाबत कळवू शकेल. प्रतिकूल अहवाल प्राप्त होण्याच्या आधारावर (कार्ड सदस्याचे किंवा त्याच्या/तिच्या कौटुंबिक सदस्यांच्या क्रेडिट योग्यतेसंबंधात), आयसीआयसीआय बँक ही लिखित स्वरुपात सूचना देण्याच्या 15 दिवसांनंतर, क्रेडिट कार्ड रद्द करू शकते, ज्यमध्ये कार्ड खात्यावरील संपूर्ण थकित शिल्लक तसेच कार्डाच्या वापराद्वारे उद्भवलेले कोणतेही पुढील प्रभार हे, ज्यांची कार्ड खात्यावर अद्याप आकारणी करण्यात आलेले नाही, कार्ड सदस्याद्वारे त्वरित प्रदेय असतील. आयसीआयसीआय बँक ही ज्यांच्याकडून माहिती प्राप्त करते किंवा ज्यांना ती उघड करते, असा बँकेचे किंवा वित्तीय संस्थेचे नाव कार्ड सदस्याला उघड करण्याचे आबंधन आयसीआयसीआय बँकेवर असणार नाही.

आयसीआयसीआय बँक / समूह कंपन्या त्यांना प्रदान केलेले आवेदन फॉर्म्स व दस्तऐवज, यांमध्ये छायाचित्रे समाविष्ट, बाळगण्याचा, व ते परत न करण्याचा हक्क राखून ठेवत आहेत.

XXVII. ऋणाचे अभिहस्तांकन

आयसीआयसीआय बँकेकडे कार्ड सदस्याला कोणताही संदर्भ न देता किंवा न कळवता, आपल्या पसंतीच्या कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराला क्रेडिट कार्ड थकित व देय रक्कम, पूर्णतः किंवा अंशतः, हस्तांतरीत करण्याचा, अभिहस्तांकित करण्याचा व विक्री करण्याचा हक्क असेल. अशी सदर विक्री, अभिहस्तांकन किंवा हस्तांतरण असले तरीही, आयसीआयसीआय बँक ही कार्ड सदस्याविरोधात कार्यवाही करण्यासाठी पूर्णतः सक्षम असेल. कार्ड सदस्य हा थकित व देय रकमेचे असे कोणतेही अभिहस्तांकन, विक्री किंवा हस्तांतरण व वसुली यांच्यामुळे उद्भवलेल्या सर्व परिव्ययासाठी व खर्चासाठी उत्तरदायी असेल.

XXVIII. इतर

आयसीआयसीआय बँकेच्या क्रेडिट निकषांप्रमाणे ज्या कार्ड सदस्यांची खाती चांगल्या स्थितीमध्ये बाळगण्यात आलेली आहेत, त्या कार्ड सदस्यांना आयसीआयसीआय बँकेला योग्य वाटेल त्या शुल्कांसह व अटी व शर्तींसह काही सुविधा, सदस्यत्व व सेवा देऊ करण्याचा हक्क आयसीआयसीआय बँक राखून ठेवत आहे. आयसीआयसीआय बँक ही कार्ड सदस्याला कोणतीही सूचना न देता कोणत्याही वेळी आणि कार्ड सदस्याला कोणतेही दायित्व असल्याशिवाय, शुल्क माफ करण्याचा किंवा शुल्कामध्ये घट करण्याचा आणि ते मागे घेण्याचा हक्क राखून ठेवत आहे. या अटी व शर्तींचे उल्लंघन

केल्यामुळे, सदस्यत्व संपुष्टात येण्याची परिणती सदर सुविधा व सेवा स्वयंचलितपणे संपुष्टात येण्यामध्ये होईल. आयसीआयसीआय बँकेद्वारे असो, अथवा मर्चन्ट आस्थापनेद्वारे किंवा कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराद्वारे, सदर सुविधा, सदस्यत्व किंवा सेवा पार पाडण्यामध्ये कोणताही दोष असण्याच्या किंवा त्याचे उल्लंघन होण्याच्या किंवा सदरची कामगिरी न होण्याच्या बाबतीत, आयसीआयसीआय बँक ही कोणत्याही प्रकारे कार्ड सदस्याला उत्तरदायी असणार नाही. आयसीआयसीआय बँक / ॲफिलिएट्स यांच्याद्वारे पार पाडण्यात येणाऱ्या मार्केटिंगच्या हेतूंसाठी, कार्ड सदस्याने त्याच्या अर्जावर आणि सर्वेक्षणादरम्यान दिलेल्या माहितीचा, बाह्य स्रोतांकडून मिळालेल्या माहितीचा, यामध्ये ग्राहक अहवाल समाविष्ट, वापर करण्याचा हक्क राखून ठेवत आहे.

कार्ड सदस्यांकरिता मार्केटिंग ऑफर्स विकसित करण्यासाठी आयसीआयसीआय बँक ज्या कंपन्यांसोबत काम करेल त्या कंपन्यांद्वारे वापरली जाऊ शकणारी मेलिंग यादी विकसित करण्यासाठी आयसीआयसीआय बँक या माहितीचा वापर करू शकेल. आयसीआयसीआय बँक ही वेळोवेळी कार्डावर देऊ करण्यात येणाऱ्या पॉलिसीज, वैशिष्ट्ये व लाभ यांच्यामध्ये सुधारणा करण्याचा हक्क राखून ठेवत आहे आणि तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही स्वरुपामध्ये अशा कोणत्याही सुधारणांबाबत/बदलांबाबत कार्ड सदस्याला कळवू शकेल. सदर सुधारणा/बदल ज्या दिवशी करण्यात आले त्या तारखेपूर्वी कार्ड रद्द करण्यासाठी आयसीआयसीआय बँकेकडे परत करण्यात आले नसेल तर कार्ड सदस्य सदर सुधारणांद्वारे/बदलांद्वारे बद्ध राहील.

कार्ड सदस्याद्वारे आणि/किंवा त्याच्या कौटुंबिक सदस्याद्वारे क्रेडिटसाठी पुढील आवेदनांचे मूल्यनिर्धारण करण्याच्या हेतूंसाठी, आणि फसवणुकीला प्रतिबंध करण्यासाठी, कार्ड सदस्याच्या कार्ड खात्यावर नोंद करण्यात आलेल्या सर्व व्यवहारांच्या तपशीलाची देवाणघेवाण क्रेडिट रेफरन्स एजन्सीज, लेन्डर्स आणि/किंवा इतर एजन्सीज यांच्यासोबत करण्यात येऊ शकते. सेट-ऑफचा सर्वसाधारण हक्क किंवा कायद्याद्वारे किंवा इतर कोणत्याही कराराअंतर्गत मिळालेला इतर हक्क यांच्याखेरीज, आयसीआयसीआय बँक ही, सूचनेशिवाय, कार्ड खात्यावर स्थित असणाऱ्या शिलकीचा, कार्ड सदस्य आयसीआयसीआय बँकेसोबत व तिच्या समूह कंपन्यांसोबत बाळगत असलेल्या इतर कोणत्याही खात्यासोबत (खात्यांसोबत) संयोग साधू शकेल किंवा ते एकत्रित करू शकेल, आणि कार्ड खात्याअंतर्गत आयसीआयसीआय बँकेप्रती कार्ड सदस्याच्या समाधानामध्ये किंवा समाधानाप्रती अशा इतर खात्याच्या (खात्यांच्या) क्रेडिटसाठी स्थित असणारी रक्कम सेट-ऑफ करू शकेल किंवा हस्तांतरीत करू शकेल. कार्डासाठी आवेदन फॉर्ममध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे संपर्कव्यवहारासाठी कार्ड सदस्य हा त्याचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि ईमेल आयडी यांच्यामधील कोणत्याही बदलाबाबत आयसीआयसीआय बँकेला ताबोडतोब कळवेल. पत्त्यामधील सदर बदल हा आयसीआयसीआय बँकेच्या लक्षात आल्यास, आयसीआयसीआय बँक ही आपल्या नोंदींमधील कार्ड सदस्याचा पत्ता बदलण्याचा हक्क राखून ठेवत आहे. आयसीआयसीआय बँकेला संपर्कव्यवहारासाठीचा योग्य पत्ता कळवण्यात आल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी पूर्णतः

कार्ड सदस्याची आहे, आणि चुकीच्या पत्त्यामुळे कार्ड सदस्याचे कोणतेही नुकसान झाल्यास किंवा दायित्व उद्भवल्यास, आयसीआयसीआय बँक त्या सर्व दायित्वांचा अस्वीकार करते.

कार्ड सदस्याद्वारे घेण्यात आलेल्या सुविधांसाठी/सेवांसाठी आयसीआयसीआय बँकेने किंवा तिच्या ॲफिलिएट्सनी वेळोवेळी विहित केलेल्या सर्व अटी व शर्तींचे कार्ड सदस्य पालन करेल. देऊ करण्यात येणाऱ्या अशा फॅसिलिटीज/सेवा यांसाठी व यासंबंधात, आयसीआयसीआय बँक किंवा तिचे सहयोगी यांच्याद्वारे किंवा यांच्या वतीने स्थापित करण्यात आलेले , इंटरनेट, वर्ल्ड वाइड वेब, इलेक्ट्रॉनिक डेटा इंटरचेंज, कॉल सेंटर्स, टेलिसर्व्हिस ऑपरेशन्स (व्हॉइस, व्हिडिओ, डेटा किंवा त्यांचा संयोग) किंवा इलेक्ट्रॉनिक, कॉम्प्युटर, ऑटोमेटेड मशीन्स नेटवर्क यांच्या माध्यमातून किंवा टेलिकम्युनिकेशनच्या इतर माध्यमातून, दुरस्थ व्यवहार पार पाडण्यासाठी सुविधांद्वारे किंवा सुविधांमार्फत प्रभावी करण्यात आलेले असे सर्व व्यवहार हे वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे, सदर सुविधांसाठी/सेवांसाठी आयसीआयसीआय बँक किंवा त्यांचे सहयोगी यांच्याद्वारे विहित करण्यात आलेल्या अटी व शर्ती यांच्या अनुपालनाप्रती व अनुपालनामध्ये करण्यात आल्यावर ते कायदेशीरदृष्ट्या आबंधन व वैध व्यवहार स्थापित करतील.

(सी) क्रॉस करन्सी सेट-ऑफच्या बाबतीत, एका चलनामधून दुसऱ्या चलनामध्ये आबंधनाचे रुपांतरण करणे हे आयसीआयसीआय बँक आणि/किंवा तिच्या समूह कंपन्या यांच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार असेल.

XXX. विवादांचा समझोता

1. स्वयंचलित विवाद निवारण:

आयसीआयसीआय बँकेच्या संबंधित नोंदींची तपासणी करून स्वयंचलित प्रकारे किंवा स्वरुपामध्ये पूर्णतः किंवा अंशतः वैध (किंवा नाही) म्हणून निश्चित करण्यासाठी सक्षम वस्तुस्थितीविषयक प्रकरणांचा समावेश असणाऱ्या कार्डधारकाच्या तक्रारी, दावे, विवाद किंवा गाऱ्हाणी यांची तशा प्रकारे निश्चिती करण्यात येईल आणि अशा तक्रारीची/तक्रारींची स्वीकृती किंवा त्या नाकारणे (पूर्णतः किंवा अंशतः) हे अशा प्रकारे निश्चिती करण्यात आल्यावर पीडित कार्डधारकाला यथोचितरीत्या कळवण्यात येईल. तक्रार/तक्रारी पूर्णतः किंवा अंशतः वैध म्हणून स्वीकारण्यात येण्याच्या बाबतीत, आयसीआयसीआय बँक ही पीडित कार्डधारकाला यथोचित दिलासा प्रदान करेल.

2. अंतर्गत तक्रार निवारण प्रक्रिया: वर नमूद करण्यात आलेल्या स्वयंचलित प्रकाराद्वारे निवारण न झालेली तक्रार/तक्रारी, किंवा नमूद स्वयंचलित प्रकाराद्वारे केलेल्या निवारणाने कार्डधारकाचे समाधान न झाल्यास, स्वयंचलित प्रकार प्रभावी होण्यापूर्वी उद्भवलेल्या, आणि www.icicibank.com वर उपलब्ध ग्राहक तक्रार

निवारण पॉलिसीप्रमाणे निवारणासाठी मांडण्यास सक्षम असणाऱ्या तक्रारी या वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे, अशा पॉलिसीनुसार निवारणासाठी मांडता येऊ शकतात.

3. ऑनलाइन विवाद निवारण: या अटी व शर्तींमुळे किंवा त्यांच्या संबंधात उद्भवलेल्या तक्रारी (खाली नमूद वगळणुकींच्या सापेक्ष), बँकेने सुरू केलेले कोणतेही दावे किंवा कृती (एकत्रितपणे दावा/दावे असे संबोधले जाते) आणि कोणत्याही प्रकारचा इतर कोणताही दावा किंवा विवाद (कंत्राटामध्ये असो वा अन्यथा) हे, यामध्ये या अटींच्या अंतर्गत बांधकाम, अर्थ, अस्तित्व, वैधता, उल्लंघन, रिकॉल, वसुली किंवा समाप्ती यासंबंधी कोणतेही प्रश्न समाविष्ट, मध्यस्थी किंवा समेटाच्या प्रकियेद्वारे निवारणासाठी पाठवण्यात येऊ शकतात, आणि सदर प्रकिया ही एसएएमएच्या, एक स्वतंत्र ऑनलाइन विवाद निवारण संस्था, लागू मध्यस्थी किंवा समेट नियमांनुसार पार पाडण्यात येईल.

एसएएमए नियमांमध्ये निर्धारीत करण्यात आलेल्या कालावधीच्या आत किंवा <21> दिवसांच्या कालावधीच्या आत (जे आधी असेल ते), मध्यस्थी किंवा समेट प्रकियेद्वारे तक्रारीचे किंवा दाव्याचे निवारण न झाल्यास, एसएएमएच्या लागू नियमांच्या परिभाषेमध्ये, आणि लवाद व समेट अधिनियम, 1996 नुसार, लवाद कार्यवाहीच्या माध्यमातून तक्रार किंवा दावा निवारणासाठी पुढे पाठवण्यात येईल. अशी लवाद कार्यवाही ही एसएएमएद्वारे तिच्या www.sama.live वेबसाइटद्वारे/प्लॅटफॉर्मद्वारे किंवा मोबाइल ॲप्लिकेशनद्वारे ऑनलाइन पार पाडण्यात येईल (पुराव्याची नोंद करणे किंवा दस्तऐवजांच्या निविदा हे समाविष्ट), घडवण्यात येईल आणि प्रदान करण्यात येईल. लवाद न्यायाधिकरण हे लागू लवादीनुसार नियुक्त स्वतंत्र एकमेव लवादाने युक्त असेल. एसएएमएचे नियम. मुंबई हे लवाद कार्यवाहीचे स्थान असेल. लवादीच्या कार्यवाहीसाठीचा कायदा म्हणजे एसएएमएचे नियम असतील.

4. वरीलप्रमाणे, ऑनलाइन विवाद निवारण प्रकिया पुढीलसाठी लागू असणार नाही:

ए) सांविधिक, नियामक किंवा शासकीय प्राधिकरणांकडून किंवा त्यांच्यामार्फत प्राप्त झालेली कोणतीही तक्रार/तक्रारी. सांविधिक, नियामक व शासकीय प्राधिकरणाद्वारे किंवा मार्फत प्राप्त झालेल्या अशा तक्रारीला (तक्रारींना), आयसीआयसीआय बँकेने सदर प्राधिकरणाद्वारे अभिप्रेत असलेल्या प्रकारामध्ये व स्वरुपामध्ये संबोधित करणे व प्रतिसाद देणे आवश्यक आहे.

बी) त्रयस्थ पक्षकाराचे अवलंबित्व असणारी तक्रार/तक्रारी– आयसीआयसीआय बँक ही त्रयस्थ पक्षकाराकडून/पक्षकारांकडून माहिती किंवा स्पष्टीकरणे प्राप्त झाल्यावरच तक्रारीचा/तक्रारींचा आढावा घेऊ शकेल, मूल्यनिर्धारण करू शकेल व संबोधित करू शकेल.

सी) वर नमूद करण्यात आलेल्या स्वयंचलित विवाद निवारणाअंतर्गत किंवा बँकेच्या ग्राहक तक्रार निवारण पॉलिसीप्रमाणे निवारणासाठी प्रलंबित असलेली कोणतीही तक्रार/तक्रारी.

XXXI. या अटी व शर्तींमधील बदल

आयसीआयसीआय बँकेकडे कोणत्याही अटी व शर्ती, कार्डावर देऊ करण्यात येणारी वैशिष्ट्ये व लाभ, यामध्ये कोणत्याही मर्यादेशिवाय, कोणत्याही वेळी विद्यमान शिलकीवर, व्याज प्रभारांवर किंवा दरांवर आणि कोणत्याही वेळी परिगणनेच्या पद्धतीवर परिणाम करणारे बदल समाविष्ट, सुधारणा करण्याचा किंवा पुरवणीचा विवेकाधिकार आहे. कार्डाअंतर्गत असणाऱ्या सर्व रकमेची पूर्णतः परतफेड करण्यात येईपर्यंत कार्ड सदस्य हा या सुधारित अटी व शर्तींच्या अंतर्गत उद्भवलेल्या सर्व प्रभारांसाठी व इतर सर्व आबंधनांसाठी उत्तरदायी असेल. आयसीआयसीआय बँकेने ठरवल्याप्रमाणे इन्फिनिटीवर किंवा इतर कोणत्याही स्वरुपामध्ये प्रदर्शित करून आयसीआयसीआय बँक सुधारित अटी कळवू शकेल. कार्ड सदस्य हा इन्फिनिटीवर प्रदर्शित करण्यात आल्याप्रमाणे या अटी व शर्तींमधील सुधारणांसह त्यांचा नियमितपणे आढावा घेण्यासाठी जबाबदार असतील आणि कार्डाचा वापर करणे चालू ठेवून कार्ड सदस्याने सुधारित अटी व शर्ती स्वीकारल्या असल्याचे मानण्यात येईल. अटी व शर्तींच्या अंमलबजावणीच्या तारखेच्या एका महिन्याच्या आधी, पुर्वोक्तप्रमाणे, त्यांच्यामधील कोणत्याही बदलाबाबत कार्ड सदस्याला कळवण्यात येईल.

XXXII. नोटिसा

कार्ड सदस्याकडून थकित असलेल्या सर्व रकमेसह या अटी व शर्तींच्या अंतर्गत किंवा त्यासंबंधातील सर्व नोटिसा किंवा इतर संपर्कव्यवहार हे आयसीआयसीआय बँक लिमिटेड, आयसीआयसीआय फोन बँकिंग सेंटर, आयसीआयसीआय बँक टॉवर, 7 वा मजला, सर्वेक्षण क्र. 115/27, प्लॉट क्र.12, नानाक्रामगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद- 500032, भारत यांच्याकडे देण्यात येतील, अन्यथा नमूद केले नसेल तर पत्राद्वारे किंवा फॅक्समिलीद्वारे (हुबेहुब प्रतिकृतीद्वारे). अशी कोणतीही नोटीस किंवा इतर संपर्कव्यवहार हे पुढीलनुसार प्रभावी झाल्याचे मानण्यात येईल:

(i) पत्राद्वारे पाठवण्यात आल्यास, व्यक्तिशः डिलिव्हरी करण्यात आल्यास किंवा टपालाद्वारे पाठवण्यात आल्यास, जेव्हा पत्र परत घेणे हे प्रेषकाच्या (सेन्डरच्या) नियंत्रणापलीकडे असल्यास; आणि (ii) फॅक्समिलीद्वारे पाठवण्यात आल्यास, (योग्य फॅक्समिली क्रमांकासाठी पुष्टी प्राप्त झाल्यावर) वर पाठवण्यात आल्यास. तथापि, आयसीआयसीआय बँकेला वास्तविकतः प्राप्त होत नाही किंवा त्यांच्याकडून अभिस्वीकृती करण्यात येत नाही, तोपर्यंत आयसीआयसीआय बँकेप्रती कोणतीही नोटीस किंवा संपर्कव्यवहार प्रभावी होणार नाही. नोटीस किंवा संपर्कव्यवहार यावर करण्यात येऊ शकतात: (i) आयसीआयसीआय बँकेच्या नोंदींमध्ये असणाऱ्या आणि जेथे नोटिसा/संपर्कव्यवहार (आवेदन फॉर्ममध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे) पाठवायचे आहेत त्या कार्ड सदस्याच्या पत्त्यावर किंवा फॅक्समिली क्रमांकावर, आणि (ii) आयसीआयसीआय बँकेच्या प्रादेशिक/विभागीय/शाखा/कार्यालयीन पत्त्यावर किंवा फॅक्समिली क्रमांकावर (आवेदन

फॉर्ममध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे), किंवा कार्ड सदस्याने व आयसीआयसीआय बँकेने एकमेकांना लिखित स्वरुपात निर्देशित केलेल्या अशा इतर कोणत्याही पत्त्यावर किंवा फॅक्समिली क्रमांकावर. कार्ड सदस्य हा आयसीआयसीआय बँकेला लिखित स्वरुपात त्यांच्या संपर्क पत्त्यामधील किंवा तपशीलामधील बदल कळवण्यामध्ये अपयशी ठरण्याच्या बाबतीत, आवेदन फॉर्ममध्ये किंवा कार्ड सदस्याने शेवटी दिलेल्या पत्त्यावर नोटीस/संपर्कव्यवहार देणे याला आयसीआयसीआय बँकेकडे सदर नोटीस अनसर्व्हड (न बजावता परत येणे) परत आली तरीही, कार्ड सदस्याला योग्य व पुरेशी सेवा दिल्याचे मानण्यात येईल. कार्ड सदस्याच्या निवासाच्या किंवा कामाच्या ठिकाणी उपलब्ध वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित झालेली नोटीस ही तिच्या प्रकाशनापासून कार्ड सदस्याला देण्यात आलेली पुरेशी नोटीस असेल; परंतु आयसीआयसीआय बँकेविरोधात वर्तमानपत्रामधील नोटीस ही आयसीआयसीआय बँकेद्वारे अभिस्वीकृत करण्यात येईपर्यंत प्रभावी असणार नाही.

XXXIII. ग्लोबल इंडियन क्रेडिट कार्डाच्या अटी

या अटी (अटी) केवळ ग्लोबल इंडियन क्रेडिट कार्ड वापरणाऱ्या कार्ड सदस्यांसाठी लागू आहेत. या अटी व शर्ती क्रेडिट कार्डांच्या वापरासाठीच्या इतर अटी व शर्तींहून अधिक अशा आहेत (अटी व शर्ती). या अटी तसेच अटी व शर्ती यांच्यामध्ये कोणताही संघर्ष असल्यास, या अटी अभिभावी राहतील. ग्लोबल इंडियन क्रेडिट कार्डावर रोख रक्कम काढण्याला अनुमती नाही. ग्लोबल इंडियन क्रेडिट कार्डावर कोणतीही रोख मर्यादा प्रदान  करण्यात येणार नाही. कार्ड सदस्य आयसीआयसीआय बँकेला पेमेन्ट नियत तारखेला एकूण देय रक्कम प्रदान करेल. ग्लोबल इंडियन क्रेडिट कार्डावर एमएडीचा भरणा करण्याची कोणतीही सुविधा लागू असणार नाही. ग्लोबल इंडियन क्रेडिट कार्डांसाठीचे पेमेन्ट हे केवळ ईसीएस पद्धतीद्वारे करण्यात येईल.

XXXIV. व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाच्या अटी

या अटी व शर्ती ('अटी') आयसीआयसीआय बँक लिमिटेडद्वारे देऊ करण्यात येणाऱ्या व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड सुविधांच्या तरतुदींसाठी लागू आहेत व त्यांचे नियमन करतात. या अटी व शर्ती आयसीआयसीआय बँकेच्या क्रेडिट कार्ड सुविधांचे नियमन करणाऱ्या अटी व शर्ती, आयसीआयसीआय बँकेच्या इंटरनेट बँकिंग सेवांचे नियमन करणाऱ्या अटी व शर्ती आणि आयसीआयसीआय बँकेच्या बचत खात्यासाठीच्या अटी व शर्ती ('प्रायमरी अटी') यांच्याहून अधिक अशा आहेत आणि त्यांना कमीपणा आणणाऱ्या नाहीत.

या अटी व प्राथमिक अटी यांच्यामधील कोणत्याही असातत्याच्या व्याप्तीपर्यंत, या अटी अभिभावी राहतील. येथे वापरण्यात आलेल्या परंतु व्याख्या करण्यात न आलेल्या सर्व कॅपिटलाइज्ड संज्ञांना प्रायमरी अटींशी जोडण्यात आलेले संबंधित अर्थ असतील.

‘खाते/खाती’ म्हणजे आयसीआयसीआय बँकेच्या इंटरनेट बँकिंग सेवांचे नियमन करणाऱ्या अटी व शर्तींमधील व आयसीआयसीआय बँकेच्या बचत खात्यासाठीच्या अटी व शर्ती यांमधील अर्थातील व त्यामध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे खात्याची (खात्यांची) व्याख्या होय.

‘व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड’ म्हणजे प्रायमरी कार्ड सदस्याला त्याच्या/तिच्या विद्यमान कार्ड खात्यावर जारी करण्यात आलेले अतिरिक्त क्रेडिट कार्ड होय. हे ॲड–ऑन क्रेडिट कार्ड प्रायमरी कार्ड सदस्याच्या खात्याच्या/खात्यांच्या विभागामध्ये लॉग्ड इन केल्यावर, इलेक्ट्रॉनिक प्रतिमेमध्ये तयार करण्यात येईल व जतन करण्यात येईल. व्हर्च्युअल क्रेडिट कार्डासाठी कोणतेही वास्तविक प्लॅस्टिक जारी करण्यात येणार नाही.

‘व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड सदस्य’ म्हणजे ज्याला प्रायमरी अटी व अटींच्या सापेक्ष आयसीआयसीआय बँकेद्वारे ॲड–ऑन व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड जारी करण्यात आलेले आहे तो सदस्य.

व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड सुविधेसाठी अर्ज करून व ही सुविधा घेण्यासाठी सहमती दर्शवून, प्रायमरी कार्ड सदस्याने येथे याखाली उल्लेख केलेल्या अटींना सहमती दर्शवल्याचे व त्या स्वीकारल्याचे मानण्यात येते. प्रायमरी कार्ड सदस्य हा आयसीआयसीआय बँकेच्या लॉग्ड इन विभागामार्फत किंवा आयसीआयसीआय बँकेने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे अशा इतर कोणत्याही पद्धतीमार्फत आयसीआयसीआय बँकेद्वारे प्रदान करण्यात येणाऱ्या व्हर्च्युअल क्रेडिट कार्डासाठी आवेदन करेल. व्हर्च्युअल क्रेडिट कार्डामुळे प्रायमरी कार्ड सदस्याला त्याच्या पसंतीच्या क्रेडिट मर्यादेच्या आथर ऑनलाइन व्यवहार करणे शक्य होते, मात्र कोणत्याही परिस्थितीमध्ये कोणत्याही वेळी त्याच्या क्रेडिट मर्यादेच्या पलीकडे व्यवहार करता येत नाही.

व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाद्वारे करण्यात येणाऱ्या खरेदीचा तपशील विवरणामध्ये प्रदर्शित करण्यात येईल आणि प्रायमरी कार्ड सदस्याला स्वतंत्र विवरण पाठवण्यात येणार नाही. प्रायमरी कार्ड सदस्य हा व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाअंतर्गत उपलब्ध लिंकवर क्लिक करून व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाचे सद्याचे आणि गत विवरण/विवरणेदेखील पाहू शकतो. प्रायमरी कार्ड सदस्याने प्रायमरी कार्ड व व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड यांचा वापर करून उद्भवलेल्या खर्चाप्रती एकल पेमेन्ट करायचे आहे. कार्ड क्रमांक, व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाची मुदतसमाप्ती तारीख, सीव्हीव्ही इत्यादीसारखा व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाचा महत्त्वपूर्ण तपशील केवळ खात्याच्या लॉग्ड इन विभागामध्ये उपलब्ध व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड विभागामध्ये दृश्यनीय असेल. व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाची क्रेडिट मर्यादा ही प्रायमरी कार्डाप्रमाणे असेल. खात्याच्या लॉग्ड इन विभागामध्ये उपलब्ध व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड विभागाअंतर्गत संबंधित पर्यायांवर क्लिक करून व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाचे हॉट लिस्टिंग/ब्लॉकिंग करता येऊ शकते. व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड सदस्याने खाते/खाती बंद केल्यास, व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड अस्तित्वात असणे चालू राहील.

व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाचा वापर हा केवळ ऑनलाइन व्यवहारांपर्यंत निर्बंधित आहे.

प्रायमरी कार्ड सदस्य हे जाणतो की ऑनलाइन व्यवहारांच्या बाबतीत, व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाचा वापर करून केलेल्या खरेदीच्या वेळी प्रायमरी कार्ड सदस्याद्वारे चार्ज स्लिप्सवर स्वाक्षरी करण्यात येणार नाही. त्यानुसार, प्रायमरी कार्ड सदस्य हे स्वीकारतो की, कोणत्याही कारणास्तव, अशा खरेदीची किंवा प्रभाराची अधिकृतता किंवा वैधता यांच्या संबंधात कोणत्याही विवादाच्या बाबतीत, प्रायमरी कार्ड सदस्य हा सर्व स्थायी देय रकमेचा आयसीआयसीआय बँकेकडे भरणा करेल आणि तो कोणत्याही परिस्थितीमध्ये आयसीआयसीआय बँकेला उत्तरदायी/जबाबदार धरणार नाही. व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाचा वापराद्वारे पेमेन्ट स्वीकारण्यास कोणत्याही व्यापाऱ्याने नकार दिल्यास, त्यासाठी आयसीआयसीआय बँक जबाबदार राहणार नाही. व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाची सुविधा ही केवळ व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाला ऑनलाइन पेमेन्ट करण्याची सुविधा प्रदान करण्यासाठी आहे आणि ही सुविधा व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड सदस्याद्वारे पार पाडण्यात आलेल्या व्यवहाराचा दर्जा, सुरक्षितता किंवा वैधता यांची खातरजमा करत नाही.

व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाचा वापर करणे म्हणजे या अटी व शर्तींचा स्वीकार केल्याचे मानण्यात येईल. व्हर्च्युअल क्रेडिट कार्ड सदस्य हा पेमेन्टसाठीच्या या अटींद्वारे/अटींच्या अंतर्गत बद्ध असेल आणि तो/ती व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाच्या वापरावर देय व प्रदेय अशा सर्व प्रभारांच्या पेमेन्टची खातरजमा करेल. व्हर्च्युअल क्रेडिट कार्डाची सुविधा ही विशेष सुविधा असून ती आयसीआयसीआय बँकेने वेळोवेळी निर्धारित केलेल्या शुल्कासह/दरासह देण्यात येते.

XXXV. इन्स्टंट क्रेडिट कार्डाच्या अटी

1. या अटी व शर्ती (अटी) आयसीआयसीआय बँकेद्वारे प्रदान करण्यात येणाऱ्या इन्स्टंट क्रेडिट कार्डासाठी लागू आहेत व त्यांचे नियमन करतात आणि www.icicibank.com येथे उपलब्ध असल्याप्रमाणे आयसीआयसीआय बँकेच्या क्रेडिट कार्ड सुविधांचे नियमन करणाऱ्या अटी व शर्ती आणि आयसीआयसीआय बँकेच्या फिक्स्ड डिपॉझिटचे नियमन करणाऱ्या अटी व शर्ती ('प्रायमरी अटी व शर्ती') यांच्याहून अधिक अशा आहेत आणि त्यांना कमीपणा आणणाऱ्या नाहीत.या अटी व प्रायमरी अटी व शर्ती यांच्यामधील कोणत्याही असातत्याच्या व्याप्तीपर्यंत आणि, या अटी अभिभावी राहतील. येथे वापरण्यात आलेल्या परंतु व्याख्या करण्यात न आलेल्या सर्व कॅपिटलाइज्ड संज्ञांचा प्रायमरी अटी व शर्तींच्या अंतर्गत नमूद समान अर्थ असेल.
2. कार्डधारक म्हणजे अशी व्यक्ती जिने आयसीआयसीआय बँकेसोबत फिक्स्ड डिपॉझिट ठेवलेले आहे आणि त्या व्यक्तीने आयसीआयसीआय बँकेच्या इन्स्टंट क्रेडिट कार्डासाठी अर्ज केलेला आहे आणि त्याला येथे नमूद प्रायमरी अटी व शर्ती व अटी यांच्या सापेक्ष इन्स्टंट क्रेडिट कार्ड जारी करण्यात आलेले आहे. इन्स्टंट क्रेडिट कार्ड म्हणजे आयसीआयसीआय बँकेसोबत कार्डधारकाने बाळगलेल्या फिक्स्ड डिपॉझिटवर कार्डधारकाला आयसीआयसीआय बँकेद्वारे जारी करण्यात आलेले आयसीआयसीआय बँक इन्स्टंट क्रेडिट कार्ड होय.

3. इन्स्टंट क्रेडिट कार्ड प्राप्त करण्यासाठी पात्र होण्याकरिता, कार्डधारकाने आयसीआयसीआय बँकेसोबत किमान रु.10,000/- रकमेचे फिक्स्ड डिपॉझिट बाळगणे आवश्यक असेल.

4. इन्स्टंट क्रेडिट कार्डावरील क्रेडिट मर्यादा ही किमान क्रेडिट मर्यादा रु.8,500/- आणि कमाल रु.5 लाखांच्या सापक्ष, फिक्स्ड डिपॉझिट रकमेच्या पंच्च्याऐंशी टक्के (85%) इतके असेल. सदर क्रेडिट मर्यादा ही आयसीआयसीआय बँकेच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार वेळोवेळी बदलाच्या अधीन आहे आणि त्याबाबत आयसीआयसीआय बँकेला योग्य वाटेल त्या प्रकाराद्वारे व स्वरुपाद्वारे कार्डधारकाला कळवण्यात येईल.

5. नमूद करण्यात आलेल्या पद्धतीने आणि आयसीआयसीआय बँकेने वेळोवेळी नमूद केलेल्या संबंधित दस्तऐवजांची अंमलबजावणी करून कार्डधारकाने फिक्स्ड डिपॉझिट ठेवणे आवश्यक असेल. कार्डधारकाने केवळ आयसीआयसीआय बँकेच्या शाखेच्या ठिकाणी किंवा आयसीआयसीआय बँकेकडून संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार वेळोवेळी ठरवण्यात आल्याप्रमाणे व कळवण्यात आल्याप्रमाणे इतर कोणत्याही पर्यायी मार्गाद्वारे फिक्स्ड डिपॉझिट ठेवणे आवश्यक असेल. अशा प्रकारे उघडण्यात आलेले फिक्स्ड डिपॉझिट्स हे केवळ ऑटो रिन्युअल प्रकाराद्वारे उघडण्यात येईल. कार्डधारकाद्वारे/आयसीआयसीआय बँकेद्वारे कार्ड रद्द करण्यात येण्याच्या बाबतीत, इन्स्टंट क्रेडिट कार्डाशी जोडलेले फिक्स्ड डिपॉझिट हे फिक्स्ड डिपॉझिट ठेवण्याच्या वेळी कार्डधारकाद्वारे दिलेल्या सूचनांनुसार चालू राहील.

6. इन्स्टंट क्रेडिट कार्ड जारी केल्यावर, इन्स्टंट क्रेडिट कार्डाच्या समाप्तीपर्यंत किंवा फिक्स्ड डिपॉझिटच्या परिपक्वतेपर्यंत, यथास्थितीनुसार, आयसीआयसीआय बँक ही कार्डधारकाद्वारे बाळगण्यात आलेल्या फिक्स्ड डिपॉझिटच्या संपूर्ण रकमेवर, यामध्ये कार्डधारकाने कमावलेले व्याज समाविष्ट, धारणाधिकार चिन्हांकीत करेल.

7. अर्जदाराचे आयसीआयसीआय बँकेसोबत विद्यमान फिक्स्ड डिपॉझिट असण्याच्या बाबतीत, फिक्स्ड डिपॉझिट हे कार्डधारकाच्या इन्स्टंट क्रेडिट कार्डाशी जोडण्यात येईल आणि फिक्स्ड डिपॉझिट हे त्वरित प्रभावासह ऑटो-रिन्युअल मोडमध्ये रुपांतरीत करण्यात येईल. फिक्स्ड डिपॉझिटच्या ऑटो-रिन्युअलच्या वेळी लागू असणारा प्रचलित दर हा सदर फिक्स्ड डिपॉझिट रकमेवर लागू असेल.

8. कार्डधारक हा इन्स्टंट क्रेडिट कार्डाशी जोडलेल्या फिक्स्ड डिपॉझिटमधून कोणतीही आंशिक रक्कम काढू शकत नाही.

9. एचयूएफ्स, भागीदारी संस्था, अल्पवयीन व्यक्ती किंवा अर्जदाराद्वारे/अर्जदारांद्वारे संयुक्तपणे उघडण्यात /ठेवण्यात आलेली फिक्स्ड डिपॉझिट्स ही इन्स्टंट क्रेडिट कार्डासाठी हक्कदार असणार नाहीत. केवळ एका व्यक्तीच्या नावे असणारी फिक्स्ड डिपॉझिट्सच इन्स्टंट क्रेडिट कार्डासाठी पात्र असतील.

10. फिक्स्ड डिपॉझिट सुविधेसाठी नामनिर्देशन सुविधा उपलब्ध असेल.

11. फिक्स्ड डिपॉझिट संपुष्टात येण्याच्या/मागे घेण्याच्या/रद्द करण्याच्या बाबतीत किंवा कार्डधारक हा नियत तारखेपासून 60 दिवसांच्या आत थकित रकमेचा भरणा करण्यामध्ये असमर्थ ठरल्यास, किंवा अटींप्रमाणे आयसीआयसीआय बँकेने आकारलेले कोणतेही शुल्क, प्रभार किंवा इतर कोणतीही रक्कम यांसह इन्स्टंट क्रेडिट कार्डावरील थकित रक्कम ही कोणत्याही वेळी फिक्स्ड डिपॉझिट रकमेच्या 95% पेक्षा अधिक असल्यास, आयसीआयसीआय बँकेला उपार्जित व्याजासह संपूर्ण फिक्स्ड डिपॉझिट रकमेचे परिसमापन करण्याचा आणि इन्स्टंट क्रेडिट कार्डाअंतर्गत आयसीआयसीआय बँकेला प्रदेय असणाऱ्या थकित रकमेप्रती सदर रक्कम सेट–ऑफ (वजा) करण्याच हक्क आहे.

वर संदर्भ देण्यात आलेल्या वजावटीनंतर कोणतीही शिल्लक रक्कम कार्डधारकाला परत करण्यात येईल.

12. इन्स्टासेव्ह फिक्स्ड डिपॉझिट्सचे नियमन करणाऱ्या अटी व शर्तींनुसार, ई–केवायसी (इलेक्ट्रॉनिक– नो यूअर कस्टमर) पडताळणीच्या आधारावर वन–टाइम पासवर्डमार्फत (ओटीपी) उघडण्यात आलेले इन्स्टासेव्ह फिक्स्ड डिपॉझिट असणाऱ्या कार्डधारकांसाठी, इन्स्टासेव्ह फिक्स्ड डिपॉझिट्स व बचत खाते उघडण्याच्या 1 (एक) वर्षाच्या आत, वास्तविक केवायसी पडताळणी किंवा ग्राहक यथोचित कार्यतत्परता पूर्ण न करण्याची परिणती संबंधित बचत व इन्स्टासेव्ह फिक्स्ड डिपॉझिट खाते बंद करण्यामध्ये होईल. याची नोंद घ्यायची आहे की वरील घटनेच्या बाबतीत, इन्स्टासेव्ह फिक्स्ड डिपॉझिटवर कार्डधारकाद्वारे घेण्यात आलेले इन्स्टंट क्रेडिट कार्डदेखील बंद करण्यात येईल, आणि सदर इन्स्टासेव्ह फिक्स्ड डिपॉझिटप्रती चिन्हांकीत करण्यात आलेला धारणाधिकार काढून टाकण्यात येईल. तथापि, येथे किंवा इतर कोणत्याही दस्तऐवजामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरीही, अशा बाबतीत, आयसीआयसीआय बँकेला संपूर्ण फिक्स्ड डिपॉझिट रकमेचे, यामध्ये उपार्जित व्याज समाविष्ट, परिसमापन करण्याचा आणि इन्स्टंट क्रेडिट कार्डाच्या संबंधात आयसीआयसीआय बँकेला प्रदेय थकित रकमेप्रती सदर रक्कम सेट–ऑफ (वजा) करण्याचा हक्क आहे. वरील यथोचित जुळवणीनंतरची कोणतीही शिल्लक रक्कम कार्डधारकाला परत करण्यात येईल.

13. फिक्स्ड डिपॉझिटवर धारणाधिकार चिन्हांकीत करण्यात आल्यानंतर इन्स्टंट क्रेडिट कार्ड कार्यान्वित करण्यात येईल.

14. कोणत्याही एका वेळी केवळ एक इन्स्टंट क्रेडिट कार्ड हे कार्डधारकाला जारी करण्यात येईल. आयसीआयसीआय बँक लिमिटेड

कॉरपोरेट कार्यालय: आयसीआयसीआय बँक टॉवर्स, वांद्रे–कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई 400 051. डिस्क्लेमर:

'आयसीआयसीआय बँक, आपल्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार, आपल्या उत्पादनांच्या/सेवांच्या संबंधात, आवश्यक असल्याप्रमाणे किंवा गरजेचे असल्याप्रमाणे सदर अटींवर बाह्य सेवा प्रदात्याच्या/प्रदात्यांच्या किंवा एजन्टच्या/एजन्ट्सच्या सेवांचा वापर करू शकते.'

'आयसीआयसीआय बँक' आणि 'आय–मॅन' लोगोज हे आयसीआयसीआय बँक लि.चे ट्रेडमार्क व मालमत्ता आहेत. कोणत्याही बौद्धिक संपदेचा, किंवा येथे प्रदर्शित करण्यात आलेल्या इतर कोणत्याही मजकुराचा गैरवापर करण्याला सक्त मनाई आहे.